# भोम (फोंडा) गावातील लोकवाङ्मयाचा अभ्यास

## [Bhom (Ponda) Gavateel Lokvangmayacha Abhyas]

**एम.ए. (मराठी) पदवीसाठी सादर केलेली संशोधन प्रबंधिका**

**MAR-651 DISCIPLINE SPECIFIC DISSERTATION**

**मराठी अध्ययनशाखा**

शणै गोंयबाब भाषा आणि साहित्य महाशाळा

**गोवा विद्यापीठ**


अभ्यासक

**वैभवी संदीप नाईक**

हजेरी क्र. 22P0190030

पी. आर 201905502

मार्गदर्शक

**जयेश गावकर**

(सहायक प्राध्यापक)

शणै गोंयबाब भाषा आणि साहित्य महाशाळा

मराठी अध्ययनशाखा



गोवा विद्यापीठ

**शैक्षणिक वर्ष 2023 – 2024**

# BHOM (PONDA) GAVATEEL LOKVANGMAYACHA ABHYAS

**Submitted in partial fulfilment of Masters Degree**
**MA in Marathi**

**MAR-651 DISCIPLINE SPECIFIC DISSERTATION**

**Marathi Discipline**
Shenoi Goembab School of Language & Literature

**Goa University**

by

**Vaibhavi Sandeep Naik**

Seat No: 22P0190030

PRN: 201905502

Under the supervision of

**Jayesh Gaonkar**

(Assistant Professor)

**Marathi Discipline**

Shenoi Goembab School of Language & Literature

**Goa University**
**2023 – 2024**

## DECLARATION BY STUDENT

I hereby declare that the data presented in this Dissertation report entitled, "भोम (फोंडा) गावातील लोकवाङ्मयाचा अभ्यास" is based on the results of investigations carried out by me in the Marathi Discipline at the Shenoi Goembab School of Language & Literature, Goa University under the Supervision of Jayesh Gaonkar and the same has not been submitted elsewhere for the award of a degree or diploma by me. Further, I understand that Goa University or its authorities will be not be responsible for the correctness of observations/experimental or other findings given the dissertation.

I hereby authorize the University authorities to upload this dissertation on the dissertation repository or anywhere else as the UGC regulations demand and make it available to any one as needed.

Naik

(Vaibhavi Sandeep Naik)

Signature and Name of Student

Seat no: 22P0190030

Date: 16/04/2024

Place: Goa University

## COMPLETION CERTIFICATE

This is to certify that the dissertation report "**भोम (फोंडा) गावातील लोकवाङ्मयाचा अभ्यास**" is a bonafide work carried out by Ms. Vaibhavi Sandeep Naik under my supervision in partial fulfilment of the requirements for the award of the degree of **Master of Arts** in the Discipline Marathi Discipline at the Shenoi Goembab School of Language & Literature, Goa University.

**Jayesh Gaonkar**

Date: 16/04/2024

GOA UNIVERSITY ★ SHENOI GOEMBAB SCHOOL OF LANGUAGES & LITERATURE ★ TALEIGAON PLATEAU

Signature of Dean of the School

Dept Stamp

Date: 16/04/2024

Place: Goa University

# मनोगत

नवीन अभ्यासक्रमाचा भाग म्हणून पदव्युत्तर पदवीच्या द्वितीय वर्षासाठी पहिल्यांदाच प्रबंधिका लिहावी लागली. या प्रबंधिका लेखनासाठी मी 'भोम (फोंडा) गावातील लोकवाङ्मयाय अभ्यास' हा विषय निवडला. 'भोम' गावातील लोकसाहित्याचा अभ्यास आजतागायत झालेला नाही. वर्तमानात लोकवाङ्मयाचे संकलन आणि संशोधन झाले नाही; तर भावी पिढी लोकसाहित्यापासून वंचित राहणार आहे.

भोम गावाला लोकवाङ्मयाची संपन्न अशी परंपरा लाभलेली आहे त्यामुळे  या विषयावर अभ्यास करीत असताना मला अत्यंत आनंद होत आहे. या विषयावर अभ्यास करीत असताना अनेकांनी मला मदत केली, मल पाठिंबा दिला. त्या सर्वांचे मनःपूर्वक आभार मानण्यासाठी इथे मी प्रयत्न करीत आहे.

प्रा. जयेश गावकर, हे मला माझ्या संशोधन प्रबंधिकेचे मार्गदर्शक म्हणून लाभले. सरांनी मला खूप मदत केली. समाजातील लोक, त्यांचे जगणे, त्यांचे राहणीमान, त्याचबरोबर कोणत्याही उत्सव समारंभाच्या वेळी वेगळ्या दृष्टीकोणातून कसे पहावे, लोकसाहित्याचा कशाप्रकारे अभ्यास करावा याबद्दल उत्तम मार्गदर्शन आणि सूचना वेळोवेळी केल्या. त्यामुळे माझ्या अभ्यासाला योग्य असे वळण प्राप्त झाले त्यासाठी सरांचे मी ऋणी आहे.

माहिती संकलन करण्यासाठी माझ्यासोबत राहून मला मदत केलेले माझे मित्र मोहित गावडे आणि हर्षदा गावडे यांचे आभारी आहे. त्याचबरोबर काही प्राचीन स्थळांवर मला जाणे शक्य नव्हते त्या स्थळांवर जाऊन तेथील छायाचित्रे मिळविण्यासाठी मला माझ्या भाऊंनी म्हणजे गोवर्धन नाईक आणि मयूर नाईक यांनी खूप मदत केली त्याबद्दल त्यांचेही आभारी आहे. त्याचबरोबर गावातील ज्या ज्या माणसांनी मला संकलन करण्यासाठी आणि माहिती गोळा करण्यासाठी मदत केली त्यांचेही आभारी आहे.

या अभ्यासासाठी मला गोवा विद्यापीठाच्या ग्रंथालयांची मदत लाभली. गोवा विद्यापीठाच्या ग्रंथालयाच्या कर्मचाऱ्यांनी वेळोवेळी ग्रंथ उपलब्ध करून दिले त्याबद्दल मी त्यांची आभारी आहे त्याचबरोबर पणजीतील कृष्णादास श्यामा केंद्रीय ग्रंथालयाच्या कर्मचाऱ्यांनी सुद्धा ग्रंथ उपलब्ध करून दिल्याबद्दल मी त्यांचीही आभारी आहे. माझ्या या अभ्यासासाठी प्रत्यक्ष-अप्रत्यक्षपणे ज्या ज्या व्यक्तीने मला मार्गदर्शन, सहकार्य केले, प्रोत्साहन दिले त्या सर्वांचे मी मनःपूर्वक आभारी आहे.

सर्वप्रथम मी माझ्या आई बाबाचे आभार मानते कारण त्यांनी मला हा अभ्यास करण्यासाठी प्रोत्साहन दिले. त्यानंतर मी बाबूसो गावडे यांचा मनापासून आभार मानते कारण त्यांनी बुजुर्ग असून सुद्धा मला माहिती गोळा करण्यासाठी खूप मदत केली त्याचबरोबर त्यांनी भोम गावच्या संस्कृतीबद्दल सुद्धा मला माहिती सांगितली. त्याचबरोबर मला इतर माहिती गोळा करण्यासाठी मोहनदास गावडे, स्वप्निल नाईक, संकिता नाईक, शोभा भोमकर, प्रिती भोमकर, सिंतिया गावडे, मंदा नाईक, यशोदा नाईक, गमती गावडे, मिलण गावडे यांनी मदत केल्याबद्दल त्यांचे सुद्धा मनापासून आभारी आहे.

# ‘भोम (फोंडा) गावातील लोकवाङ्मयाचा अभ्यास’

## अनुक्रमणिका


| प्रकरण क्र. | प्रकरण | पृष्ठ क्र. |
|---|---|---|
| Declaration | | |
| Completion Certificate | | |
| मनोगत | | |
| १. | प्रास्ताविक | २ – ७ |
| २. | लोकसाहित्य संकल्पना स्वरुप आणि व्याप्ती | ८ – २४ |
| ३. | भोम गावातील लोकगीते | २५ – ४९ |
| ४. | भोम गावातील लोककथा | ५० – ६४ |
| ५. | भोम गावातील लोकनाट्य | ६५ – ७७ |
| ६. | भोम गावातील इतर संकीर्ण वाङ्मय | ७८ – ९२ |
| | समारोप | ९३ |
| | निष्कर्ष | ९४ |
| संदर्भ सूची | | ९६ |
| परिशिष्टे | | ९७ |

# प्रकरण १

# प्रास्ताविक

# प्रकरण १

## प्रास्ताविक

१.१ प्रस्तावना ........................................................................................................2

१.२ संशोधन विषयक समस्या ........................................................................................2

१.३ संशोधन विषयाची निवड........................................................................................3

१.४ संशोधन कार्याची उपयुक्तता/ आवश्यकता ...............................................................3

१.५ संशोधनाची उद्दिष्टे..................................................................................................3

१.६ संशोधनाचा आढावा ...............................................................................................4

१.७ संशोधनाची गृहितके ...............................................................................................5

१.८ संशोधन पद्धतीचा वापर ..........................................................................................5

१.९ व्याप्ती आणि मर्यादा................................................................................................6

# प्रकरण १

# प्रास्ताविक

## १.१ प्रस्तावना

'भोम गावातील लोकवाङ्मयाचा अभ्यास' असा प्रबंधिकेचा विषय असून फोंडा तालुक्यातील 'भोम' गावाच्या लोकवाङ्मयाचा अभ्यास केला जाणार आहे. लोकवाङ्मय हे मौखिक परंपरेतून पिढ्यान पिढया संक्रमित होत असते. त्याचा कर्ता हा अनामिक असतो आणि लोकवाङ्मयात काळानुसार परिवर्तन होत असते.

'लोकवाङ्मय' समाजजीवनाची गाथा आहे. लोकवाङ्मयातून समाजजीवनाचे प्रतिबिंब दिसून येते व ते अलिखित अक्षरवाङ्मय असून त्याची अस्मिता आगळी वेगळी असते.

भोम गावातील लोकगीतांतून दुःख, जीवन जगण्यासाठी करावे लागणारे संघर्ष यासारख्या भावना व्यक्त होतात. पण प्रसन्नता, आनंद, उत्साह, मस्करी, भक्तिमयता, या भावनांचे चित्रण जास्त प्रमाणात व्यक्त होते. त्याचबरोबर जीवनातील दुःख किंवा संघर्षाला विनोदी ढंगाने सांगण्याची पद्धतही पहायला मिळते.

भोम गावातील लोककथांमधून तत्कालीन समाजजीवनाचे, त्यांच्या मानसिकतेचे, धार्मिक समजुतीचे, संस्कृतीचे दर्शन घडते.

या प्रबंधिकेमध्ये भोम गावातील लोकगीते, लोककथा, लोकनाट्य, उखाणी, म्हणी यातून लोकजीवनात आविष्कृत होणाऱ्या भाव-भावनांच्या, रूढी-प्रथा, आचार-विचार-विधी, इत्यादी जीवनातील विशेषांचा अभ्यास केला जाणार आहे.

## १.२ संशोधन विषयक समस्या

'भोम' गावातील लोकसाहित्याचा अभ्यास आजतागायत झालेला नाही. सद्यपरिस्थिती पाहता गावातील साहित्य हळूहळू नष्ट होत चाललेले आहे. ते टिकवून ठेवणे ही काळाची गरज आहे. तसेच 'भोम' गावातील लोकवाङ्मयात वाङ्मयीन मूल्ये दडलेली आहे. संकलन न झाल्यामुळे ह्या मूल्यांचा शोध आजतागायत घेतलेला नाही. या अभ्यासाद्वारे तो शोध घेणे शक्य आहे.

## १.३ संशोधन विषयाची निवड

भारतात लोकवाङ्मयाचे मोठया प्रमाणात संकलन झालेले आहे. गोमंतकातही लोकसाहित्याभ्यासक संकलनाचे आणि संशोधनाचे महत्त्वाचे कार्य करत आहे. तरी आजतागायत 'भोम' गावातील लोकवाङ्माचे संकलन झालेले दिसत नाही. वर्तमानात लोकवाङ्मयाचे संकलन आणि संशोधन झाले नाही, तर भावी पिढी लोकसाहित्यापासून वंचित राहणार आहे. तसेच उपरोक्त केलेल्या विवेचनानुसार लोकवाङ्मयात वाङ्मयीन मूल्ये दडलेली आहे. सांस्कृतिक इतिहासाचा मोठा खजाना त्यांच्या साहित्यात दडलेला आहे. या अभ्यासाद्वारे या सगळ्या गोष्टींचा शोध घेता येईल म्हणून हा विषय निवडलेला आहे.

## १.४ संशोधन कार्याची उपयुक्तता/ आवश्यकता

१. लोकवाङ्मयाचे संकलन करून भावी पिढीसाठी लोकवाङ्मय जतन करून ठेवता येईल.
२. वाङ्मयीन मूल्यांचा शोध घेता येईल.
३. लोकवाङ्मयातून सांस्कृतिक इतिहासाचा शोध घेता येईल.
४. लोकवाङ्मयातून नीतिमूल्यांचा शोध घेता येईल.
५. लोकवाङ्मयातून स्त्री मनाचा शोध घेता येईल.
६. भाषिक अभ्यास करता येईल.

## १.५ संशोधनाची उद्दिष्टे

१. लोकवाङ्मयात दडलेल्या वाङ्मयीन मूल्यांचा शोध घेणे.
२. लोकवाङ्मयातून आविष्कृत झालेल्या सांस्कृतिक इतिहासाचा शोध घेणे.
३. लोकवाङ्मयात सांगितलेल्या नीतिमूल्यांचा अभ्यास करणे.
४. लोकवाङ्मयातून आविष्कृत झालेल्या स्त्री मनाचा शोध घेणे.
५. लोकवाङ्मयाचा भाषिक अभ्यास करणे.

## १.६ संशोधनाचा आढावा

विद्यापीठ पातळीवरील अभ्यासक्रमात लोकसाहित्याला स्थान मिळाल्यामुळे लोकसाहित्य विषयक संशोधनाला चालना मिळालेली आहे. गोमंतकामध्ये दुर्गेश माजिक यांनी आपल्या प्रबंधात लोकसाहित्याचे स्वरुप, लोकसाहित्याच्या व्याख्या, वर्गीकरण याविषयी चिकित्सा केलेली आहे. त्यात त्यांनी म्हटल्याप्रमाणे "लोकवाङ्मय हा समूहमनामुळे निर्माण होत असल्याने त्यामधे चैतन्य, जीवंतपणा हा बोली भाषेतून समोर येत असतो. ती समूहमनाची निर्मिती असल्याकारणाने कष्ट, थकवा दूर करण्यासाठी लोकगीतांची निर्मिती झाली". असे त्यांनी मांडलेले आहे. त्याचबरोबर जयंती नायक यांनी आपल्या 'कोकणी लोकवेदातली बायलेचे प्रतिमा एक समाजिक सांस्कृतिक अभ्यास' या प्रबंधामध्ये लोकगीतांतून, लोककथांतून, म्हणीतून स्त्रीची विविध रुपे दर्शविलेली आहे.

गोमंतकामध्ये अनेक अभ्यासकांनी लोकसाहित्यावर अभ्यास केलेला आहे. यात जेष्ठ अभ्यासक म्हणून विनायक खेडेकरांचा उल्लेख करावा लागतो. विनायक खेडेकरांनी गोव्यातील गावागावात फिरून तेथील लोकसाहित्याचे संकलन केले आहे. लोकसमाज, लोकजीवन आणि लोककला हे खेडेकरांचे आस्थेचे विषय आहेत. गोवा लग्नाख्यान, लोकसरिता : गोमंतकीय जनजीवनाचा समग्र अभ्यास, इत्यादी त्यांनी संशोधनपर ग्रंथ लिहिलेले आहेत.

त्याचबरोबर  जयंती नायक, पौर्णिमा केरकर, विनायक फडते आखाडकर, उल्हास प्रभूदेसाई, राजेंद केरकर, झीलू गावकर, डॉ. साईश देशपांडे, कमलाकर म्हाळशी, देविदास गावकर, अजित पैंगीणकर, इत्यादी यासारख्या गोमंतकीय अभ्यासकांचे योगदान सुद्धा महत्त्वाचे ठरते.

आजतागायत फोंडा तालुक्यातील भोम गावातील लोकवाङ्मयाचा अभ्यास झालेला नाही. त्याचबरोबर विद्यापीठ स्तरावरसुद्धा अभ्यास झालेला आढळत नाही. म्हणून 'भोम' गावातील लोकवाङ्मयाचे जतन करणे, लोकवाङ्मयात दडलेल्या भाषिक मूल्यांचा शोध घेणे आवश्यक आहे. म्हणून 'भोमा ( फोंडा ) गावातील लोकवाङ्मयाचा अभ्यास' हा विषय अभ्यासासाठी निवडलेला आहे.

## १.७ संशोधनाची गृहितके

१. ‘भोम’ गावातील लोकवाङ्ग्यामध्ये वाङ्ग्यीन मूल्ये दडलेली आहेत.

२. ‘भोम’ गावातील लोकवाङ्ग्याला प्राचीन परंपरा लाभलेली असून त्यातून सांस्कृतिक इतिहासाची उकल होते.

३. ‘भोम’ लोकगीतांतून आणि लोककथांमधून नीतिमूल्यांचे प्रभावी दर्शन घडते

४. ‘भोम’ गावातील लोकगीतांतून स्त्री मनाचा आविष्कार होतो.

५. ‘भोम’ गावातील लोकवाङ्मयात भाषिक वेगळेपणा दिसतो.

## १.८ संशोधन पद्धतीचा वापर

**१. वर्णनात्मक पद्धती**

संकलनातून मिळालेल्या माहितीची शास्त्रीय पद्धतीने मांडणी करून त्यांची वर्गवारी, विश्लेषण करुन चिकित्सा करणे असे या प्रबंधिकेचे स्वरूप असणार आहे. लोकगीतात, लोककथेत आलेला आशयाचे वर्णनात्मक पद्धतीने होणार आहे.

**२. क्षेत्रीय सर्वेक्षण पद्धती**

‘भोम गावातील लोकवाङ्मयाचा अभ्यास’ सदर प्रबंधिकेत होत असल्याने क्षेत्रीय अभ्यास पद्धतीचा आधार घेतला जाणार आहे. त्यात मुलाखती घेणे, प्रत्यक्ष भेटून माहिती गोळा करणे, त्याचबरोबर आधुनिक तंत्रज्ञानाचा वापर करुन संकलन करणे, छायाचित्रे मिळविणे, उत्सवाच्यावेळी प्रत्यक्ष सहभागी होणे व माहिती गोळा करणे, इत्यादीसाठी क्षेत्रीय सर्वेक्षण पद्धतीचा वापर केला जाणार आहे.

**३. कार्यान्वयी पद्धती**

लोकजीवनात लोकवाङ्ग्य विशिष्ट कारणामुळे येत असते. त्या कार्याचा शोध कार्यान्वयी अभ्यास पद्धतीचा आधार घेता येतो.

### ४. रचनानुसारी पद्धती

विशिष्ट पद्धतीने लोकवाङ्मयाची रचना केलेली आहे. त्यासाठी रचनानुसारी पद्धतीचा वापर केला जाणार आहे.

## १.९ व्याप्ती आणि मर्यादा

उपरोक्त संशोधन हे 'भोम' गावातील 'गावडा' आणि 'भंडारी' या दोन समाजापुरताच मर्यादीत असणार आहे. कारण 'लोक' ची वैशिष्ट्ये या दोन समाजात आढळतात.

**भोम फोंडा गावातील लोकवाङ्मयाचा अभ्यास** या प्रबंधिकेच्याद्वारे केला जाणार आहे. एकूण पाच प्रकरणाद्वारे याचा अभ्यास करून शेवटी निष्कर्ष आणि समारोप जोडला जाणार आहे.

प्रबंधिकेचे पहिले प्रकरण **लोकसाहित्य : संकल्पना स्वरूप आणि व्याप्ती** असे आहे. या प्रकरणामध्ये लोकसाहित्याचे स्वरूप, लोकसाहित्याची व्याप्ती, लोकसाहित्याचे महत्त्व, लोकसाहित्याची लक्षणे, इत्यादींचा अभ्यास केला जाणार आहे. त्याचबरोबर लोकवाङ्मयाचे स्वरूप, व्याख्या, इत्यादींचा सुद्धा अभ्यास केला जाणार आहे.

प्रकरण दुसरे **भोम गावातील लोकगीते** यामध्ये भोम गावातील एकूण लेकगीतांचा अभ्यास करण्यात येईल. फुगडीगीते, धालोगीते, लग्नगीते, बालगीते अशी लोकगीतांची विभागणी करून त्या लोकगीतांचा आशयनिष्ठ अभ्यास आणि वाङ्मयीन अंगाने अभ्यास करण्यात येईल.

प्रकरण तिसरे **भोम गावातील लोककथा** असे आहे. भोम गावात अनेक लोककथा आहेत ज्या छोट्या मुलांना सांगितल्या जातात. भोम गावात अनेक दैवतांच्या उत्पत्तींच्या कथा आहेत त्याचबरोबर त्यांच्या महिमा सांगणाऱ्या सुद्धा कथा आहेत. त्याचबरोबर अनेक प्राणिकथा, बोधकथा, इत्यादीं अशा अनेक लोककथा आहेत. या सर्वांचा आशयनिष्ठ अभ्यास, सांस्कृतिक अभ्यास आणि सामाजिक अंगाने अभ्यास केला जाणार आहे.

प्रकरण चौथे **भोम गावातील लोकनाट्य** याच्याद्वारे भोम गावातील गवळणकाला या लोकनाट्याचा अभ्यास करण्यात येईल. हा अभ्यास आणि सादरीकरणाच्या अंगाने केला जाणार आहे.

प्रकरण पाचवे **भोम गावातील इतर संकिर्ण वाङ्मय** असे आहे. भोम गावात म्हणी, उखाणे, वाक्प्रचार यासारखे लोकोक्ति आहेत. या सर्वांचा आशयनिष्ठ आणि सामाजिक जंगाने विचार करण्यात येईल.

अशा प्रकारे पाचही प्रकरणांच्या माध्यमांतून भोम गावातील लोकवाङ्मयाचा अभ्यास केला जाणार आहे. शेवटी निष्कर्ष जोडून या प्रबंधिकेची सांगत केली जाणार आहे.

# प्रकरण २

# लोकसाहित्य : संकल्पना, स्वरूप आणि व्याप्ती

# प्रकरण २

## लोकसाहित्य : संकल्पना स्वरूप आणि व्याप्ती

२.१ प्रस्तावना ........ ९

**२.२ लोकसाहित्याची संकल्पना ........ ९**

**२.३ लोकसाहित्याचे प्रयोजन ........ १०**

**२.४ लोकसाहित्याचे महत्त्व ........ १४**

**२.५ लोकसाहित्याचे स्वरूप ........ १४**

**२.५.१ लोकसाहित्याच्या व्याख्या** ........ १५-

**२.५.२ लोकसाहित्याची व्याप्ती** ........ १७

**२.५.३ लोकसाहित्याची लक्षणे** ........ १९

**२.६ लोकसाहित्यातील लोकवाङ्मय ........ २०**

**२.६.१ लोकवाङ्मयाचे स्वरूप** ........ २१

**२.६.२ लोकवाङ्मयाचे प्रकार** ........ २१

**२.७ निष्कर्ष ........ २३**

**संदर्भ ........ २३**

# प्रकरण २

# लोकसाहित्य : संकल्पना स्वरूप आणि व्याप्ती

## २.१ प्रस्तावना

लोकसाहित्याचे अभ्यासक्षेत्र हे खूप व्यापक आहे. लोकसाहित्य या विषयाची अनेक अभ्यासकांनी वेगवेगळया अंगाने आपापल्या परीने विचार करून त्यावर अभ्यास करून लोकसाहित्य ही संज्ञा स्पष्ट केलेली आहे. जागतिक पातळीवर लोकसाहित्याचे महत्त्व सिद्ध झालेले आहे.

लोकसाहित्य हा समूहमनाचा आविष्कार असतो. लोकसाहित्यातून अभिव्यक्त झालेले मानवी जीवन व्यक्तिकेंद्रित नसून समूहकेंद्रित असते. लोकांचे वागणे, जगणे, इत्यादी लोकजीवनाचे दर्शन लोकसाहित्यातून घडते. आदिम काळापासून लोकसाहित्याचा प्रवाह प्रवाहित राहिलेला आहे. एका पिढीकडून दुसऱ्या पिढीकडे प्रत्यक्ष किंवा अप्रत्यक्षपणे लोकसाहित्याच्या माध्यमातून संस्कार झालेले आहेत आणि हे संस्कार आजही मोठ्या श्रध्देने जोपासले जात आहेत.

लोकांचे साहित्य म्हणजे लोकसाहित्य असे म्हटले जाते. लोकसाहित्याची निर्मिती ही लोकांकडून आपोआप होत असते व मौखिक परंपरेने एका पिढीपासून दुसऱ्या पिढीकडे संक्रमित होत असते. लोकसाहित्याचा आविष्कार मौखिक स्वरुपाचा आहे. मौखिक परंपरेने अलिखित स्वरूपात चालत आलेले वाङ्मय म्हणजे लोकवाङ्मय होय.

## २.२ लोकसाहित्याची संकल्पना

मराठीत 'लोकसाहित्य' हा शब्द इंग्रजीतील 'Folk Lore' या शब्दासाठी वापरला जातो. 'Folk' साठी 'लोक' तर 'Lore' साठी 'साहित्य' हे पद वापरले जाते. १८४६ साली विल्यम जॉन थॉमस यांनी प्रथम 'Folk Lore' ही संज्ञा वापरली. 'Folk Lore' ही व्यापक संकल्पना आहे. त्यात लोककथा, लोकगीते, लोकनाट्ये यांसारखी वाङ्मयीन रूपाजवळ जाणारी आविष्काररूपे, म्हणी, वाक्प्रयोग, तसेच विधिविशेष श्रद्धा, समजुती, रुढी, सण-समारंभ, उत्सव, कर्म- कौशल्ये यांचा समावेश 'Folk Lore' या संज्ञेत होतो. त्यामुळे

मराठीत या संज्ञेविषयी एकमत नाही. लोकविद्या, लोकवार्ता, लोकवाङ्मय अशा काही संज्ञा या शब्दासाठी सुचविल्या गेल्या आहेत.

दत्तो वामन पोतदार यांनी 'लोकविद्या' ही संज्ञा सुचविली. तर, प्रभाकर मांडे यांनी प्रथम 'लोकवाङ्मय' आणि नंतर 'लोकसाहित्य' हीच संज्ञा वापरली. दुर्गा भागवत यांनी सुद्धा लोकसाहित्य हा पारिभाषिक शब्द वापरून त्यातील अर्थाचे व्यापकत्व स्पष्ट केले. हळूहळू मराठीत 'Folk Lore' साठी 'लोकसाहित्य' ही संज्ञा रूढ झाली. लोकसाहित्य हा सामासिक शब्द 'लोक' आणि 'साहित्य' या दोन पदांच्या संयोगाने बनलेला आहे. 'लोकसाहित्य' या संकल्पनेत समाज विशेषतः विशिष्ट समाज या अर्थाने 'लोक' या शब्दाची योजना केलेली दिसते.

## २.३ लोकसाहित्याचे प्रयोजन

लोकसाहित्याद्वारे कळत नकळत का होईना, पण अनेक महत्त्वाची कार्ये पार पाडली जातात. विशेषतः तळागाळापर्यंत लोकसाहित्य पोहचत असल्यामुळे त्याची व्याप्ती जास्त असते. म्हणूनच लोकसाहित्याचे महत्त्व अजूनच वाढते. लोकसाहित्याच्या प्रयोजनासंबंधी विचार करता पुढील गोष्टी प्रामुख्याने लक्षात येतात.

### १. नीतीशिक्षण

लोकसाहित्यात दिसणाऱ्या समाजातील प्रचलित रूढी, परंपरा, प्रथा, नीतीकथा, प्राणीकथा याद्वारे उच्च प्रकारचे नीतीशिक्षण समाजाला मिळत असते. समाजात कसे वागावे, पारंपरिक आचारविचार, पेहराव, राहणी, खाद्यपदार्थ याविषयीच्या संकेतांविषयी माहिती लोकसाहित्यातून समाजाला मिळते, संस्कृतीचे वहन लोकसाहित्यातून होत असल्यामुळे व्यक्तीच्या स्वैरतेला आळा बसतो. सामाजिक संकेतांचे, परंपरांचे पालन आपल्याला करायचे आहे, ही भावना लहानथोरांपर्यंत सगळयांच्या मनात निर्माण होते. समाजात कोणते कृत्य मान्य आहे, कोणते निषिद्ध आहे, याची माहिती मिळते. ही सगळी ज्ञानगंगा एका पिढीकडून दुसऱ्या पिढीकडे संक्रमित होत असते.

**२. अनौपचारिक शिक्षणाचे माध्यम**

परंपरागत व्यावसायिक कौशल्ये जसे विविध प्रकारच्या गाठी बांधण्याचे कौशल्य, मांडे, बाशिंग बनविण्याचे कौशल्य, कलात्मक आविष्कार, जसे लोकनृत्य, लोकचित्रे यांचे कुठलेही प्रशिक्षण वर्ग नसताना हे ज्ञान एका पिढीकडून दुसऱ्या पिढीकडे संक्रमित होत असते. कुंभार, सुतार, लोहार, चांभार यांचे हस्तकौशल्य हेसुद्धा कुठेही न शिकता पुढच्या पिढीपर्यंत पोचते. जातिअंतर्गत सांकेतिक बोली, क्षेत्रदेवता, लोकदेवतांची परंपरा असे संस्कृतीचे शिक्षण लोकसाहित्याच्या स्वरूपात प्रवाहीपणे पुढेपुढे वाहत राहते. लोकसाहित्याच्या अशा स्वरूपाच्या संक्रमणामुळे समाजजीवनात परंपरासातत्य असते.

**३. राष्ट्रीय ऐक्य**

अनेक सण, उत्सव, धार्मिक विधी परंपरागत पद्धतीने साजरे केले जातात. त्यामुळे एकटेपणाची भावना लोप पावते. माणूस हा तसाही समाजशील प्राणी आहे, म्हणूनच एकत्रितरीत्या आनंद, दुःख व्यक्त करणे त्याला आवडते. लोकपरंपरा याचसाठी निर्माण झाल्या असाव्यात. सर्वांसोबत सण, समारंभ साजरे केल्याने लोकसमुह एका समान नात्याने एकत्र बांधला जातो. आपण एकटे आहोत ही भावना नष्ट होऊन आपण लोकसमूहाचे घटक आहोत ही जाणीव निर्माण होते. अर्थातच त्यामुळे राष्ट्रीय ऐक्य निर्माण होण्यास हातभार लागतो. मानसिक ताणाचा निचरा होतो.

**४. सामाजिक संस्थांचा आधार**

समाजात परंपरेने चालत आलेल्या सामाजिक संस्थांना लोकसाहित्यामुळे आधार लाभतो. कुटुंबसंस्था, विवाह संस्था यांच्या विधींमध्ये थोडाफार बदल होत असला तरीही त्याचे मूळ स्वरूप कायम राहते. निरनिराळ्या सामाजिक संस्था तसेच धार्मिक संस्थांचे स्वरूप, त्यांचे कार्य याची माहिती लोकसाहित्यातून मिळत असते.

**५. स्वप्नरंजन**

लोकसाहित्यामुळे माणसाला काही क्षणांपुरता का होईना अद्भुतरम्यतेत प्रवेश मिळतो. जीवनातील दुःख, चिंता, निराशा, अपयश यांतून काही काळापुरता मुक्ती मिळाल्याने त्याच्या मनातील ताण नाहीसे होतात. लोकनृत्यातील सहभागामुळे त्याच्या शरीराला आणि मनाला तजेला मिळतो.

लोककलांमुळे तो थोड्यावेळासाठी का होईना आपल्या मनाचा राजा होतो. या भावनेमुळे त्याला वेगळा आत्मविश्वास मिळतो. त्याचप्रमाणे 'लोकसाहित्य हे सामाजिक निषेधाचे वाहक आहे. लोकगीते, लोककथा, उखाणे, होळीचा फगवा, दिवाळीचे डोयरे, पोळ्याच्या झडत्या, लग्नातील थट्टामस्करी या प्रसंगांद्वारे व्यक्ती स्वतःची तसेच समाजाची प्रतिक्रिया नोंदवतो. ती समूहाची निर्मिती असल्यामुळे त्यावर कोणी आक्षेपही घेऊ शकत नाही."

**६. मनोरंजन**

आबालवृद्धांचे मनोरंजन करणारे असेही लोकसाहित्याचे स्वरूप आहे. लोककथा, लोकगीते, म्हणी, उखाणे, यातील कितीतरी भाग मनोरंजनासाठी निर्माण केलेला आहे. विधीनाट्यात विधीचा भाग असला तरी त्यातील नाट्यात्मकतेमुळे त्यात रंजकत्व निर्माण झालेले असते. लोकनृत्य, खेळ यांतून शारीरिक वा मानसिक आनंद मिळतो. पहेलिका, उखाणे यातून बौद्धिक क्रीडेला चालना मिळते.

डॉ. गंगाधर मोरजे म्हणतात, 'लोकसाहित्य प्रायोगिक कला आहे. ते विशिष्ट लोकसमूहाचे मनोरंजन करण्याचे त्यांना आल्हाद देण्याचे कार्य करते. कलांच्या आस्वादन प्रक्रियेत आणि लोकसाहित्यातील आस्वादन प्रक्रियेत थोडी भिन्नता जाणवते. लोकसाहित्य निर्मितीचे व आस्वादाचे प्रयोजन सारखे व वेगवेगळे असू शकेल, पण लोकसाहित्याचा प्रयोग करणारा आपल्या परीने तो प्रयोग रंजक करीत असतो, हे नाकारता येत नाही. त्याच्या परीने ती कलानिर्मिती असते व ज्या लोकसमूहासमोर ती सादर केली जाते, तो लोकसमूहही 'कला' म्हणून त्या प्रयोगाचा आस्वाद घेत असतो.

### ७. जनसंपर्काचे प्रभावी माध्यम

प्रबोधन, धर्मजागरण आणि करमणुकीबरोबरच लोकसाहित्याने जनसंपर्काचे माध्यम म्हणून भारतीय जीवनात मोलाची कामगिरी केली आहे. लोककलांना जातीधर्माचे बंधन नसते. संत एकनाथ महाराजांनी भारूडासारख्या लोककलाप्रकाराचा तत्कालीन सामाजिक आणि धार्मिक जागृतीसाठी समर्थपणे वापर केला. महात्मा फुले यांनी प्रबोधनासाठी लोकसाहित्याचाच आकृतिबंध स्वीकारला. कीर्तनकार, शाहीर यांनीही लोककलांद्वारे भारतात नवजागृती आणण्यासाठी प्रयत्न केले. आधुनिक तंत्रज्ञानाच्या युगात आकाशवाणी, दूरदर्शन, वर्तमानपत्रे अशी प्रभावी माध्यमे असली तरीही माणसाच्या चैतन्ययुक्त वाणीचा प्रत्यक्ष संपर्काचा प्रभाव समोरच्या समुहावर पडतो. तो प्रभाव निर्जीव यंत्रातून पडत नाही. त्या सादर करणाऱ्याबद्दल लोकसमूहाला आपलेपणाची भावना असते. हा सजीवांचा सजीवांशी असलेला व्यवहारजनसंपर्काच्या दृष्टीने निश्चितच प्रभावी ठरतो.

### ८. कलाप्रकारांचे उगमस्थान

विविध कलाप्रकार लोकसाहित्यातून जन्माला आलेले आहेत पुढे त्याच्यात कलात्मक प्रयोगांचा प्रवाह मिसळल्याने त्याचे बदललेले स्वरूप आज आपण पाहतो. उदा. परंपरेने चालत आलेली लोकगीते, लोककथा, चित्रकला, नृत्य, संगीत, लोकनाट्य यांच्यात आधुनिक कलांची बीजे निश्चितच दिसतात. उलट ज्यावेळी एखाद्या कलाप्रकारात साचलेपणा येतो, तेव्हा लोकसाहित्यातून किंवा लोककलेतून संजिवनी मिळालेली आपण पाहती. जसे वारली पेंटिगला आलेले चांगले दिवस, नाट्यामध्ये लोकसाहित्यातील मिथके, पात्रे किंवा संदर्भ वापरणे, तमाशा, लावणी यांना आलेले चांगले दिवस या दृष्टीने कलाप्रकारांच्या विकासात लोकसाहित्याचा मोठा वाटा आहे.

लोकसाहित्य हे एखाद्या नदीच्या प्रवाहाप्रमाणे अनेक अज्ञात प्रवाहांच्या एकरूपतेतून निर्माण होते. लोकसाहित्याचे स्वरूप विशाल, व्यापक, मनोहर आहे. एकप्रकारचे स्वाभाविक जीवनदर्शन घडविणारा तो एक महान कल्पवृक्ष आहे. म्हणूनच जोपर्यंत समाज आणि मानवाचे अस्तित्व आहे, तोपर्यंत लोकसाहित्य जिवंत राहणार, यात शंका नाही.

## २.४ लोकसाहित्याचे महत्त्व

'इंग्रजीत लोकसाहित्याला 'फोकलोर' (Folklore) असा शब्द आहे. ही संज्ञा थॉमस या अमेरिकेतील जागतिक कीर्तीच्या अभ्यासकाने इ. स. १८४६ साली प्रचारात आणली. 'फोक' शब्दाचा अर्थ लोक, जनलोक असाच आहे." जनजीवनातील आणि जनमानसातील भावना, कल्पना, विचारप्रवाह, रूढी, आदर्श यांचे दर्पण म्हणजे लोकसाहित्य भारतीय परंपरा आणि संस्कृती या दृष्टीने लोकसाहित्याचे स्थान उच्च आहे.

लोकसाहित्याची तुलना ही वेद, पुराणे, श्रुती, स्मृती, शास्त्रे, इतिहास यांच्याशी केली जाते त्याचे वैशिष्ट्य म्हणजे ते लिखित, ग्रंथित वा लिपिबद्ध नाही. तर ते निसर्गनिर्मित मानवांच्या प्रकृतीशी पूर्णतः संबंधित आणि जीवनाशी समर्पित राहून प्रवर्तित झालेले आद्य अलिखित अक्षर वाङ्मय आहे. श्रीमती दुर्गा भागवत लोकसाहित्याचे महत्त्व विशद करताना म्हणतात, 'लोकसाहित्य ही उच्च दर्जाची श्रुती आहे. उदात्त संहिता आहे. प्रभावी लोकगाथा आहे, आणि अलिखित पण अभिजात व अक्षरवाङ्मयात मोडणारा भारतीय जीवन संस्कृतिदर्शक, प्रेरक इतिहास आहे. तो अमर आहे यात संदेह नाही. लोकसाहित्याचा अभ्यास म्हणजे संस्कृतीच्या अभिसरणाचा अभ्यास आहे. संस्कृतीचे सातत्य आणि तिच्यात होणारे बदल त्याचे निरीक्षण करावयाचे झाले तर ते लोकसाहित्यात करावे लागते."

## २.५ लोकसाहित्याचे स्वरूप

'लोकसाहित्य' हा लोकमानसाचा आविष्कार आहे. लोकसाहित्याचा कर्ता हा अज्ञात असतो व हे साहित्य एका पिढीपासून दुसऱ्या पिढीकडे संक्रमित होत असते. लोकसाहित्य हे अलिखित स्वरूपाचे असते. त्याचबरोबर लोकसाहित्य हे एका व्यक्तिचे नसून ती समूह मनाची निर्मिती असते.

लोकसंस्कृती आणि लोकधर्म टिकवणे, त्यात सातत्य राखणे या भावनेतून लोकसाहित्याचे संकलन व संपादन होते. लोकसाहित्याची निर्मिती ही कोणतेही एक उद्दिष्ट डोळ्यासमोर ठेवून केलेली नसते तर ती सहजता, आपोआप, नकळत झालेली असते.

## २.५.१ लोकसाहित्याच्या व्याख्या

- **जोनास बॅलीस**

जोनास बॅलिस यांच्या मते, 'लोकसाहित्य हे आदिमानवनिर्मित असून परंपराप्राप्त असते. याचबरोबरच सुसंस्कृत मानवाने देखील निर्मिलेले असते. ही निर्मिती ध्वनी आणि शब्द यांच्याव्दारा पद्य किंवा गद्य स्वरूपात केली जाते. लोकसाहित्यात लोकविश्वास, लोकभ्रम, लोकरुढी, लोककलाप्रकार; त्याचप्रमाणे नृत्य, नाट्य, इत्यादींचा अंतर्भाव होतो. लोकसाहित्य हे लोकसमूहाच्या अविष्कराचे शास्त्र नाही, तर लोकसमूहाच्या परंपरागत चालत आलेल्या जीवनाच्या आविष्केराचे शास्त्र आहे.'[i]

- **मारियस बार्डी**

मारियस बार्डी यांनी लोकसाहित्याची संकल्पना स्पप्र करताना त्याची व्यापकता दर्शविली आहे. 'विविध व्यवसायांचे ज्ञान, अनुभूती, शहाणपण, कौशल्य, सवयी आणि रुढी तसेच व्यवहार यासंबंधीचे ज्ञान शब्दाने किंवा कृतीने एका पिढीकडून दुसर्या पिढीपर्यंत चालत येते. त्या सर्वांस लोकसाहित्य म्हणावे.'[ii]

- **जॉर्ज फॉस्टर**

'लोकसाहित्य हा शब्द लवचिक अर्थाचा असून त्यात लोकसमूहाच्या अलिखित किंवा मौखिक स्वरूपाच्या भाषाविष्काराचा समावेश होतो.'[iii]

- **गास्टर**

गास्टर यांच्या मते, 'लोकसाहित्य हे लोकांच्या संस्कृतीचा एक महत्त्वाचा घटक असून तो लोकांकडून विचारपूर्वक किंवा अजाणता संरक्षिला जातो. लोकासाहित्य हे लौकिक परंपरांचा निधी असते. लोकजीवनाचा सर्वसंग्राहक असा तो घटक असतो. लोकसाहित्य हे कला व वाङ्मय यांचा स्रोत असतो. ते लोकांचे, लोकांनी निर्माण केलेले आणि लोकांसाठी असते. त्यातून लोकांची प्रकृती आणि सर्जनक्षमता प्रकट होते; त्याचप्रमाणे त्यात व्यक्तिविशिष्टत्व नसते, तर समूहनिर्मित सर्जनक्षमता प्रभावी असते.'[iv]

- **हार्सकोविट्स्**

या मानववंशशास्त्रज्ञाच्या मते, ‘लोकसाहित्य पूर्वयुगीन सुसंस्कृत आणि सुशिक्षित समाजाचे सांस्कृतिक अवशेषरूप असते. या सांस्कृतिक अवशेषासंबंधीच्या कुतूहलातूनच त्याचा अभ्यास होतो. लोकसमूहाच्या अलिखित साहित्यालाच लोकसाहित्य म्हणावे.’[v]

- **कुराथ**

गरट्रड पी. कुराथ यांनी 'लोकसाहित्य ही प्रामुख्याने सामूहिक निर्मिती असून, परंपरेने चालत आलेली असते,' असे प्रतिपादन केले आहे.[vi]

- **डॉ. प्रभाकर मांडे**

'लोकामध्ये प्रचलित असलेल्या मौखिक परंपरा म्हणजेच लोकसाहित्य असते. लोकसाहित्य लोकांचे असते, व्यक्तीचे कधीही नसते. [vii]

- **गंगाधर मोरजे**

'लोकसाहित्य हे केवळ मौरिवक स्वरूपात परंपरेने चालत आलेला वाङ्मयप्रकार नाही. उलट मौखिक आशय विधिसंबधित कृती व अभिनय याच्याद्वारा सादर केलेला तो प्रयोग असतो, तो प्रयोग श्राव्य व दृश्य असतो. म्हणजेच 'लोकसाहित्य' ही प्रयोगात्मक कला आहे.’[viii]

- **डॉ. ना. गो. नांदापूरकर**

'लोकसाहित्य म्हणजे माझ्या दृष्टीने तरी लोकांनी निर्माण केलेले आणि मौरिवक परंपरेने आलेले वाङ्मय होय, याचा कर्ता लोकच, अर्थात अज्ञात अशी लोकमानसातील व्यक्ती. यास्तव लोकांनी केलेले, लोकभाषेत केलेले आणि लोकांच्या परंपरेने चालत आलेले जे वाङ्मय तेच लोकवाङ्मय होय. वाङ्मयाच्या या प्रकारात लोककथा, कहाण्या, आहाणे, उखाणे आणि लोकगीते येतात.'[ix]

- **डॉ. सरोजिनी बाबर**

'विविध प्रकारांच्या जातिवंत स्वरविलासांनी शिणगारलेले व अशिक्षितांनी कितीक वर्षांमागे रचले असताही पाठांतराच्या बळावर पिढ्यान् पिढ्या आपल्या नवनवोन्मेषशालिनी तेजाने पुढच्या पिढीला उत्तेजित करणारे ते लोकसाहित्य.'[x]

## २.५.२ लोकसाहित्याची व्याप्ती

लोकसाहित्य अभ्यासाची व्याप्ती ही मर्यादीत असल्याची दिसत नाही ती खूप विस्तारलेली आहे. डॉ. प्रभाकर मांडे यांनी आपल्या 'लोकसाहित्याचे स्वरूप' या ग्रंथात १) मौखिक परंपरा, २) भौतिक संस्कृती, ३) लोकरुढी, विधी, समजुती, इत्यादी, ४) प्रयोगसिद्ध लोककला असे वर्गीकरण केलेले आहे.

## मौखिक आविष्कार

जे शब्दबद्ध किंवा वाणीमय आहे यांचा समावेश मौखिक आविष्कारामध्ये केला जातो. मौखिक आविष्कारामध्ये दोन घटक आहे ते म्हणजे गद्य आणि पद्य. पद्य याच्या अंतर्गत लोकगीतांचा समावेश होतो. त्यात फुगडी गीते, धालोगीते, धनगरगीते, इत्यादी समाविष्ट आहे. त्याचबरोबर लावण्या, पोवाडे, अभंग, ओव्या, बालगीते, दैवतगीते, भजने, भारुडे, इत्यादींचा सुद्धा समावेश होतो. गद्यामध्ये लोककथा याच्याअंतर्गत परीकथा, दैवतकथा, इत्यादींचा समावेश केला जातो. त्याचबरोबर म्हणी, वाक्प्रचार, उखाणे, इ. यांचा सुद्धा समावेश केला जातो. या सर्व गोष्टीं मौखिक परंपरेने एका पिढीपासून दुसऱ्या पिढीकडे संक्रमित होत असते. त्याचबरोबर याचा कर्ता अज्ञात असतो.

## भौतिक संस्कृती

परंपरेने चालत आलेल्या लोकाविष्कारांचा वारसा भौतिक संस्कृतीमध्ये येतो. यांत्रिकीकरणापूर्वी जे लोकजीवन होते, जी लोकसंस्कृती होती या सर्वांचा समावेश भौतिक संस्कृतीमध्ये केला जातो.

यामध्ये परंपरेने सुतार, लोहार, सोनार, कुंभार, इत्यादींची कौशल्य आणि तंत्राचा इथे समावेश होतो. त्याचबरोबर शेतात कामे करण्याच्या पद्धती, मातीची भांडी तयार करण्याच्या पद्धती, घर बांधणे, घर सजविणे,

इत्यादींचा समावेश होतो. भौतिक संस्कृतीमध्ये वाङ्मय हा भाग येत नाही. एका पिढीपासून दुसऱ्या पिढीकडे परंपरेने चालत आलेली जी कौशल्ये आहे.

## लोकरुढी, विधी, समजुती, इत्यादी

लोकसाहित्याचा तिसरा आणि बराच मोठा असलेला विभाग म्हणजे लोकरुढी, विधी, लोकसमजुती, लोकश्रद्धा आणि लोकभ्रम हा होय. पारंपारिक जीवन जगणाऱ्या लोकांच्या लोकमनात असलेल्या कल्पना, भाव-भावन श्रद्धा यांचा आविष्कार कृतिद्वारा केला जातो. समूहाने केलेल्या कृतींचा अंतर्भाव यामध्ये होतो, परंपरेने ज्या विधी, रुढी चालत आलेल्या आहे यांचा समावेश यामध्ये होतो. रुढी आणि विधी यांच्या मुळाशी काही लोकविश्वास, लोकभ्रम किंवा लोकसमजुती असतात, या सर्वांचा समावेश लोकसाहित्यात केलेला आहे.

जन्म, लग्न, बारसे, इ. विधी त्याचबरोबर दृष्ट काढणे, बाहेर बाधा होऊ नये म्हणून केल्या जाणाऱ्या कृती, जादू-टोणा, करणी या सर्वांच्या मागे कुठली तरी समजूत असते. या समजुतींचा, लोकविश्वासांचा आणि त्यानुसार केल्या जाणाऱ्या कृतींच्या मागे परंपरा असते.

सण- उत्सव, जत्रा-यात्रा या प्रमाणेच गावात साजरे केले जाणारे सामुदायिक उत्सव, विधी, ग्रामदेवतांची कृपा असावी म्हणून केलेला विधी, त्यांच्याविषयी असलेल्या लोकमनातील श्रद्धा, भय यातून केले जाणारे नवस, व्रत-वैकल्ये अशा असंख्य बाबी लोकजीवनात परंपरेने प्रचलित असतात, या सर्वांचा समावेश लोकसाहित्याच्या या विभागात होतो.

## प्रयोगसिद्ध लोककला

लोकसाहित्यामध्ये लोककलांना विशेष महत्त्व असते. लोकजीवनात निरनिराळया विधीच्या निमित्ताने होणारी लोकनृत्ये, खेळ म्हणून खेळली जाणारे नृत्य खेळ तसेच मनोरंजनासाठी केली जाणारी लोकनाट्य, लोकसंगीत, सण-उत्सव विधी प्रसंगी भिंतीवर रेखाटली जाणारी चित्रे, घरापुढील रांगोळी, नागपंचमी अशा प्रसंगाच्या निमित्ताने होणारी सर्व प्रयोगरुपे म्हणजे प्रयोगात्म किंवा प्रयोगसिद्ध लोककला असून या सर्वांचा समावेश लोकसाहित्यात होतो. प्रयोगसिद्ध लोककलामध्ये प्रत्यक्ष सादरीकरण केले जाते.

लोकसंख्येच्या या चार विभागात लोक जीवनातील पारंपरिक चालत आलेल्या सर्व विशेषांचा समावेश होतो असे नाही, जीवनाच्या विविध अंगाने लोकसाहित्य प्रकट होत असते. त्याचे माध्यम लोकभाषा, कृती अभिनय, हे असते या सगळयांचा समावेश लोकसाहित्यात करावा लागतो. लोकसाहित्य एक व्यापक अशी संकल्पना असल्याने तीची सीमा निश्चित करणे अवघड जाते.

## २.५.३ लोकसाहित्याची लक्षणे

१. लोकसाहित्याचा कर्ता हा अज्ञान असतो.

२. लोकसाहित्य हे अलिखित स्वरूपात असून मौखिक परंपरेने ते पुढे जात असते.

३. पारंपरिकता हा लोकसाहित्याचा प्रभावी गुण असतो.

४. लोकसाहित्याचा काळ हा कालातित वर्तमान असून पर्यायाने तो नोहमीच सजीव वाटतो.

५. लोकसाहित्य समूह मनाची निर्मिती असते. लोकसाहित्य हे व्यक्ति विशिष्ट न राहता समश्रीचे होते. येथेच ते ललित साहित्याहून वेगळे ठरते.

६. लोकसाहित्य हा लोक संस्कृतीचा आरसा असल्याने लोकसंस्कृतीच्या अध्ययनासाठी लोकशाहीत सुलभ ठरते.

७. लोकसाहित्य हा लोकमानसाचा अविष्कार आहे.

८. लोकसाहित्यात परंपरा टिकवणे आणि त्या पुनरुपजीवीत करणे ह्या क्रिया घडतात. लोकसाहित्य हे परिवर्तनशील असते लवचिक असते.

९. लोकसाहित्य हे लोक भ्रमातून किंवा आभासी सृष्टीतून निर्माण झालेले असते.

१०. लोकसाहित्य हे कला आणि वाक्य याचा प्रभावी स्तोत्र आहे.

११. लोकसाहित्य हे कोणत्याही संस्कृतीच्या अभिसरणाबरोबर त्याच्या अभ्यासाचे हे साधन ठरते.

१२. लोकसाहित्याचे संपादन, विकसन, संक्रमण हे पिढ्यान पिढ्या सहज व स्वाभाविकपणे चाललेले असते.

१३. लोकसाहित्यत्यात टिकून राहण्याची प्रवृत्ती दिसते, लोकसाहित्य समाजात होणारे नवनवीन बद्दल आत्मसात करते.

१४.लोकसाहित्य हा लोकसमुहाचा भावनिक अविष्कार आहे. लोकसाहित्य हा केवळ शाब्दिक आविष्कार ठरू शकत नाही.

## २.६ लोकसाहित्यातील लोकवाङ्मय

लोकवाङ्मय हे लोकसाहित्याचे एक अंग आहे. लोकसाहित्यात लोकवाङ्मयाबरोबरच रुढी, परंपरा, विधी, लोकभ्रम, इत्यादींचाही समावेश होतो. लोकवाङ्मयाची निर्मिती ही लोकजीवनातून होते व लोकवाङ्मयातून लोकजीवनाचा आविष्कार घडतो. लोकवाङ्मयातून समाजाची जीवनशैली, त्यांची भाव-भावना, इत्यादींचे दर्शन घडते.

लोकवाङ्मयात आदिम जीवनाचे काही अवशेष सुद्धा जतन आणि रिकवून ठेवलेले दिसतात. स्त्री जीवनाच्या भाव- भावना त्यांच्या आंतरीच्या जिव्हाळयाने भरलेले जीवन, पुरुषांच्या जीवनातील श्रम, लहान मुलांचे बोबडे बोल, आदी या सर्व गोष्टी लोकवाङ्मयात आढळतात.

ओवीगीते, सण- उत्सव या प्रसंगी गाणारी गीते, विधीगीते, फुगडीगीते, लोककथा, लोककथागीते, कोडी, उखाणे, म्हणी, इत्यादी विविध प्रकार लोकवाङ्मयात दिसून येतात.

लोकवाङ्मयाची भाषा ही लोकांची दैनंदिन जीवनात वापरली जाणारी भाषा असते. त्यामुळे तिला बोली भाषेचे रूप आलेले असते. बोली भाषा ही मौखिक रूपात असल्या कारणाने ती बंधनरहित, मुक्त, जीवंत अशी वाटणारी भाषा असते. लोकवाङ्मयात जे शब्द असतात त्यांचे अर्थ आणि त्यांचा उच्चार यांना लोकजीवनाचे संदर्भ जोडलेले असतात.

वर्तमानात प्रचलित नसलेले कित्येक शब्द लोकगीतांतून, लोककथांतून आढळतात. त्यांच्या आधारे आपल्याला प्राचीन भाषेचे स्वरूप पाहता येऊ शकते.

## २.६.१ लोकवाङ्मयाचे स्वरूप

लोकवाङ्मय हे मौखिक परंपरेने एका पिढीकडून दुसऱ्या पिढीकडे संक्रमित होत असते. लोकवाङ्मयाला कित्येक शतकांची परंपरा लाभलेली असते त्याचबरोबर काळानुसार ते परिवर्तित सुद्धा होत असते पण त्याचा मूळ गाभा मात्र कायम राहतो.

लोकवाङ्मयाचा कर्ता हा अज्ञात असतो त्यामुळे त्यातून समूहभावनांचा आविष्कार घडत असतो. लोकवाङ्मय आणि लोकजीवन यांच्या मध्ये परस्पर संबंध आहेत त्यामुळे लोकवाङ्मयातून लोकजीवनाचा आविष्कार घडत असतो. लोकवाङ्मयाची व्याप्ती ही व्यापक असून एकूण लोकजीवनाचे अनेक संदर्भ शोधता येतात.

लोकवाङ्मयातून इतिहासाचा शोध घेता येतो त्याचबरोबर मानवी जीवनाचे भूतकालीन स्वरूप सुद्धा पहायला मिळतो. लोकवाङ्मय हे क्रियेशी, विधीशी संबंधित असते. लोकवाङ्मयाची भाषा ही लोकांची नियमीत व्यवहारातील वापरणारी बोलीभाषा असते त्यामुळे ही भाषा जिवंत वाटते.

## २.६.२ लोकवाङ्मयाचे प्रकार

पारंपरिक लोक जीवनाच्या वाङ्मयात कथा, लोकगीते, म्हणी, उखाणी, वाक्प्रचार, लोकनाट्य यासारखे लोकवाङ्मयाचा समावेश होतो. हा वाङ्मयीन आविष्काराचा भाग बराच मोठा असून व्यापलेला आहे.

### १. लोकगीते

लोकसाहित्य हे अतिशय समृद्ध असून त्यातील बराचसा भाग हा लोकगीतांनी व्यापलेला आहे. लोकगीतांना शेकडो वर्षांची परंपरा लाभलेली असून मौखिक स्वरूपाने एका पिढीपासून दुसऱ्या पिढीकडे संक्रमित होत असते. या गीतांमधून लोकांची मानसिकता, विचारप्रणाली, नीतिधर्म, इत्यादींचे चित्रण केले जाते.

### २. लोककथा

लोककथा या मौखिक परंपरेने एका पिढीपासून दुसऱ्या पिढीकडे संक्रमित होत असतात. लोकसाहित्यात लोककथांचे स्थान अतिशय महत्त्वाचे आहे. ज्या काळात मनोरंजनाची कोणतीच साधने उपलब्ध नव्हती; तेव्हापासून कथा रंजनाचे महत्त्वाचे कार्य करीत आहेत. लोककथा या मौखिक परंपरेने अगदी अनादी काळापासून चालत आलेल्या आहेत.

### ३. लोकनाट्य

लोकनाट्याचे स्वरूप मौखिक परंपरागत आहे. ‘लोकनाट्य’ हा शब्द अनेक प्रकारच्या पारंपरिक नाट्यविधीसाठी ढोबळ मानाने वापरला जातो. कोणतेही ‘लोकनाट्य’ लिखित स्वरूपात आढळत नाही. त्याचा कर्ता कोण हे देखील खात्रीपूर्वक सांगत येत नाही. लोकनाट्याचे सर्वात महत्त्वाचे वैशिष्ट्य म्हणजे ते कमीत कमी खर्चात, जास्तीत जास्त आकर्षक व परिणामकारकरित्या सादर केले जाते.

### ४. उखाणी

उखाणे म्हणजे एकप्रकारचे बौद्धिक कोडे होय. प्राचिन काळापासून कोड्यांची परंपरा ही अस्तित्वात आहे. मनोरंजन करणे, बुद्धीला आवाहन करणे, त्याचबरोबर ज्ञानात भर घालणे असे अनेक उद्देश या कोड्यांच्या मागे आहेत. उखाणे घालण्याची किंवा घेण्याची परंपरा फार प्राचीन आहे. उखाणा कधी भव्य दिव्य विचार बोलून दाखवितो तर कधी थट्टा-मस्करी करतो तर कधी ऐकणाऱ्या व्यक्तीला कोड्यात टाकतो.

### ५. म्हणी

म्हणी म्हणजे समाजाचा आरसा होय. म्हणींच्या द्वारे समापाला शिकवण देण्याचे कार्य केले जाते. म्हणी ह्या सुटसुटीत असल्या तरीही त्यामध्ये मोठा अर्थ दडलेला असतो. म्हणी ह्या मोठ्या किंवा लांबलचक असत नाही तर त्या मोजक्या शब्दात व सुटसुटीत असतात.

### ६. वाक्प्रचार

वाक्प्रचार हे म्हणीं प्रमाणेच असतात. म्हणीपेक्षा वाक्प्रचारात मोजक्या व कमी शब्दांचा उपयोग केलेला असतो. 'वाक्' म्हणजे 'वाणी' आणि 'प्रचार' म्हणजे रूढी किंवा 'प्रघात'. त्यामुळे रूढीच्या लोकभाषेत रूळलेल्या भाषिक प्रयोगाला 'वाक्प्रचार' असे म्हणतात. एका विशिष्ट अर्थासाठी विशिष्ट शब्दांची जी योजना असते तिला वाक्प्रचार असे म्हणतात.

## २.७ निष्कर्ष

१. Folklore या इंग्रजी शब्दाचा पर्यायी शब्द म्हणून लोकसाहित्य ही संज्ञा सर्वप्रथम दुर्गा भागवत यांची सुचविली.
२. लोकसाहित्य हा शब्द ‘लोक’ आणि ‘साहित्य’ या दोन संज्ञेपासून तयार झालेला आहे.
३. लोकसाहित्य याचा कर्ता अनामिक असून ते अलिखित स्वरूपाचे असते.
४. लोकसाहित्यात एका पिढीतील संचित ज्ञान दुसऱ्या पिढीकडे संक्रमित होते.
५. लोकसाहित्य ही समूह मनाची निर्मिती असते.
६. लोकवाङ्मयाची भाषा ही लोकांची दैनंदिन जीवनात वापरली जाणारी भाषा असते.
७. वर्तमानात प्रचलित नसलेले कित्येक शब्द लोकवाङ्मयात आढळतात.

## संदर्भ

---

[१] मांडे प्रभाकर. “लोकसाहित्याचे स्वरूप”. गोदावरी प्रकाशन औरांगाबद. पाचवी आवृत्ती : २८ सप्टेंबर २००९. पृ. क्र. १५

[२] कालभूत डॉ. पुरुषोत्तम. “लोकसाहित्य स्वरूप आणि विवेचन”. विजय प्रकाशन नागपूर. पहिली आवृत्ती : १० जानेवारी २००७. पृ. क्र. १६

[३] कालभूत डॉ. पुरुषोत्तम. “लोकसाहित्य स्वरूप आणि विवेचन”. विजय प्रकाशन नागपूर. पहिली आवृत्ती : १० जानेवारी २००७. पृ. क्र. १६

[४] मांडे प्रभाकर. “लोकसाहित्याचे स्वरूप”. गोदावरी प्रकाशन औरांगाबद. पाचवी आवृत्ती : २८ सप्टेंबर २००९. पृ. क्र. १९

[५] कालभूत डॉ. पुरुषोत्तम. “लोकसाहित्य स्वरूप आणि विवेचन”. विजय प्रकाशन नागपूर. पहिली आवृत्ती : १० जानेवारी २००७. पृ. क्र. १६

[६] कालभूत डॉ. पुरुषोत्तम. “लोकसाहित्य स्वरूप आणि विवेचन”. विजय प्रकाशन नागपूर. पहिली आवृत्ती : १० जानेवारी २००७. पृ. क्र. १७

[७] कालभूत डॉ. पुरुषोत्तम. “लोकसाहित्य स्वरूप आणि विवेचन”. विजय प्रकाशन नागपूर. पहिली आवृत्ती : १० जानेवारी २००७. पृ. क्र. १७

[८] कालभूत डॉ. पुरुषोत्तम. “लोकसाहित्य स्वरूप आणि विवेचन”. विजय प्रकाशन नागपूर. पहिली आवृत्ती : १० जानेवारी २००७. पृ. क्र. १७

[९] कालभूत डॉ. पुरुषोत्तम. “लोकसाहित्य स्वरूप आणि विवेचन”. विजय प्रकाशन नागपूर. पहिली आवृत्ती : १० जानेवारी २००७. पृ. क्र. १७

[x] कालभूत डॉ. पुरुषोत्तम. “लोकसाहित्य स्वरूप आणि विवेचन”. विजय प्रकाशन नागपूर. पहिली आवृत्ती : १० जानेवारी २००७. पृ. क्र. १७

# प्रकरण ३

# भोम गावातील लोकगीते

## प्रकरण ३

# भोम गावातील लोकगीते

३.१ प्रस्तावना ........ २७

३.२ लोकगीतांचे स्वरूप ........ २७

३.२.१ व्याख्या ........ २८

३.२.२ लोकगीतांची लक्षणे ........ २९

३.२.३ लोकगीतांचे वर्गीकरण ........ २९

३.३ फुगडीगीते ........ ३०

३.३.१ आशयनिष्ठ अभ्यास ........ ३१

३.३.२ भाषिक अभ्यास ........ ३६

३.४ धालो ........ ३७

३.४.१ धालोगीते ........ ३७

३.५ लग्नगीते ........ ४०

३.५.१ भाषिक अभ्यास ........ ४३

३.६ बालगीते ........ ४४

३.६.१ आशयनिष्ठ अभ्यास ........ ४५

३.६.२ भाषिक अभ्यास ........ ४७

३.७ समारोप ........ ४७

३.८ निष्कर्ष ........ ४८

**संदर्भ** ........................................................................................................ ४८

# प्रकरण ३

# भोम गावातील लोकगीते

## ३.१ प्रस्तावना

लोकसाहित्यातील एक महत्त्वाचा भाग म्हणजे मौखिक परंपरा किंवा लोकवाङ्मय होय. लोकगीतांची परंपरा ही फार प्राचीन परंपरा आहे. जेव्हापासून समाज अस्तित्वात आला असावा तेव्हापासून लोकगीताची परंपरा ही सुरु झाली असावी. भोम गावात सुद्धा लोकगीतांची संपन्नता पहायला मिळते. याच्या अंतर्गत फुगडीगीते, धालोगीते, लग्नगीते हे मुख्य प्रकार आढळतात.

भोम गावातील लोकगीतांतून दुःख, जीवन जगण्यासाठी करावे लागणारे संघर्ष यासारख्या भावना व्यक्त होतात. पण प्रसन्नता, आनंद, उत्साह, मस्करी, भक्तिमयता, या भावनांचे चित्रण जास्त प्रमाणात व्यक्त होते. त्याचबरोबर जीवनातील दुःख किंवा संघर्षाला विनोदी ढंगाने सांगण्याची पद्धतही पहायला मिळते. उदाहरणार्थ,

**दारातली कापशिण नडन माजी राक्षिण**

**चाडियों करताली गो बाय गो चाडियों करताली**

## ३.२ लोकगीतांचे स्वरूप

लोकसाहित्य हे अतिशय समृद्ध असून त्यातील बराचसा भाग हा लोकगीतांनी व्यापलेला आहे. लोकगीतांना शेकडो वर्षांची परंपरा लाभलेली असून मौखिक स्वरूपाने एका पिढीपासून दुसऱ्या पिढीकडे संक्रमित होत असते. या गीतांमधून लोकांची मानसिकता, विचारप्रणाली, नीतिधर्म, इत्यादींचे चित्रण केले जाते.

समाजातील रुढी,परंपरा, चालीरीती, मानवी संबंध यांचा आविष्कार लोकगीतांतून आढळतो. त्यामुळे समाजजीवन आणि संस्कृतीचे आकलन करण्यासाठी ही गीते उपयुक्त ठरतात. कौटुंबिक व सामाजिक जीवनाचे

चित्रण, लोकांच्या श्रद्धा, समजुती, सण-समारंभ यातून परंपरेने चालत आलेल्या संस्कृतीचे दर्शन घडते. त्याचबरोबर लोकगीतातून नैतिक संस्कारही केला जातो.

### ३.२.१ व्याख्या

लोकगीतांची व्याख्या अनेक अभ्यासकांनी केलेल्या आहेत.

**वि. का. राजवाडे** यांच्या मते " (लोकगीते) समाजात एकसमयावच्छेदाने बहुतेक सर्वांना सुचतात. अमुक एका व्यक्तीची कारागिरी त्याच्यात दिसणे शक्य नसते. लोकगीते उत्सवप्रसंगी, भक्तीभावाने, तल्लीनता प्राप्त झाली असता व सामाजिक मन एकतान झाले असता निर्माण होतात. अर्थात कोणाही एका व्यक्तीला अशा गीतांवर हक्क सांगता येत नाही."[i]

**डॉ. सरोजिनी बाबर** यांच्या मते," विविध प्रकारच्या जातिवंत स्वरविलासांनी शिणगारलेले व अशिक्षितांनी कित्येक वर्षांमागे रचले असतानाही केवळ पाठांतराच्या बळावर पिढ्यान् पिढ्या आपल्या नवनवोन्मेषशाली तेजाने पुढच्या पिढीला उत्तेजित करणारे भावगीत म्हणजे लोकगीत होय. हे लोकगीत म्हणजे सामान्य माणसाच्या सामुदायिक जीवनाची अभिव्यक्ती होय."[ii]

**नामदेव व्हटकर** लोकगीतासंबंधीचे विवेचन करताना म्हणतात, " सामान्य श्रमिक वर्गाने श्रमपरिहारासाठी, कामाचे काठिण्य वाटू नये म्हणून अथवा आनंदाभिव्यक्ती व करमणुकीसाठी म्हटलेली गाणी म्हणजे लोकगीते. ती स्वयंपूर्ण असून पिढ्यान् पिढ्या हे धन हस्तेपरहस्ते वाटचाल करीत असते."[iii]

**डॉ. मांडे** यांच्या मते, " लोकगीत म्हणजे लोकसमूहाचे अलिखित आणि मौखिक परंपरेने चालत आलेले आदिकालीन, स्वयंस्फूर्त व संगीतमय गीत होय. लोकगीतेही समाजात एकसमयावच्छेदेकरून बहुतेक सर्वांना सुचतात आणि म्हणून कोणा एकाल व्यक्तीची कारागिरी दिसणे शक्य नसते. लोकगीतेही उत्सवप्रसंगी, भक्तिभावाने तल्लीनता प्राप्त झालीअसता व सामाजिक मन एकतान झाले असता निर्माण होतात."

अशाप्रकारे अनेक व्याख्या अनेक अभ्यासकांनी केलेल्या आहेत. परंतु कुठल्याही एका व्याख्येतून लोकगीताचे समग्र स्वरूप समजू शकत नाही. वेगवेगळया अभ्यासकांनी वेगवेगळया अंगावर प्रकाश

टाकण्याचा प्रयत्न केला आहे. त्यामुळे कुठलीही एक व्याख्या प्रमाणभूत मानता येणार नाही. लोकगीत हे भावगीतासारखे असते. त्याचा कर्ता अनामिक किंवा अज्ञात असतो, त्याची निर्मिती निरक्षरांकडून होते आणि त्याला प्राचीन परंपरा असते. लोकगीत नवेही असत नाही व जुनेही असत नाही; त्याची मुळे भूतकाळात खोलवर रूजलेली असतात. लोकगीतांना लोकताहित्याचा आत्मा मानले जाते. या गीतांची निर्मिती सामूहिक आणि उत्स्फूर्त असते. लोकगीताची भाषा ही लोकभाषा असते.

## ३.२.२ लोकगीतांची लक्षणे

१. लोकगीते परंपरेने चालत आलेली असून त्यांचे कर्तृत्व कोणत्याही एका व्यक्तीला देतायेत नाही. यादृष्टीने ती अनामिकांची असतात.
२. लोकगीतांची निर्मिती होणे व लोप पावणे या दोन्हीही क्रिया एकाच वेळी चालू असतात. लोकगीतांची जडणघडण सतत चालू असते. ते जुनेही नसते आणि नवेही नसते.
३. लोकगीतांत लोकसमूहाच्या भावविश्वाचा, विचारविश्वाचा आणि कल्पनाविश्वाचा आविष्कार असतो. त्यात लोकमानसाची अभिव्यक्ती झालेली असते.
४. लोकगीते ही लोकसमूहाची निर्मिती असल्यामुळे त्यांतून समूहमनाला आवाहन असते. व्यक्तिमनाच्या निराळेपणाचा त्यांतून आविष्कार झालेला नसतो.
५. लोकगीतांना काळाचे बंधन नसते. ती कालातीत असतात. विशिष्ट भूप्रदेशात प्रचलित असलेल्या लोकगीतांत तेथील जीवनविशेषांचे दर्शन घडते.
६. लोकगीतांतून लोकजीवन अभिव्यक्त होते. लोकजीवनाला आकार देण्याचे कार्यही त्याद्वारे घडते. लोकगीतांत सामूहिक कल्याणाची दृष्टी असते. लोकगीतांना व्यक्तीच्या आणि समूहाच्या जीवनात महत्त्वपूर्ण स्थान असते. एकप्रकारे जीवनाची आंतरिक गरज त्यातून भागविली जाते.

## ३.२.३ लोकगीतांचे वर्गीकरण

लोकगीतांचे स्वरूप-विशेष लक्षात घेण्यासाठी लोकगीतांचे वर्गीकरण महत्वाचे ठरते. अनेक अभ्यासकांनी लोकगीतांचे वर्गीकरण करण्याचा प्रयत्न केलेला आहे. **श्री पारीख** यांनी लोकगीतांचे वृस्तृत

वर्गीकरण करण्याचा प्रयत्न केलेला आहे त्यांनी एकूण १७ वर्ग केलेले आहेत. हिंदी लोकसाहित्याचे अभ्यासक **डॉ. सत्येंद्र** यांनी लोकगीतांचे केलेले वर्गीकरण अधिक सुसंगत आहे. त्यांनी पुरुषांची लोकगीते आणि स्त्रियांची लोकगीते असे दोन प्रमुख भाग करून पुन्हा त्यातील प्रत्येक भागाचे सविस्तर वर्गीकरण केलेले आहेत.

मालवी लोकसाहित्याचे अभ्यासक **डॉ. श्याम परमार** यांनी लोकगीतांचे एकूण पाच वर्ग केलेले आहेत. ते असे- १. जाती-जमातीची लोकगीते २. संस्कार, रुढी-प्रभाविषयक गीते ३. धर्माचरणविषयक लोकगीते ४. विशिष्ट कार्याशी संबंधित लोकगीते ५. रसाविष्कारयुक्त लोकगीते

**श्रीमती दुर्गा भागवत** यांनी अलेक्झांडर क्रॉप या अभ्यासकांनी गृहित धरलेल्या तत्त्वांचा आधार घेऊन लोकगीतांचे एकूण सात वर्ग केलेले आहे.

**डॉ. प्रभाकर** मांडे यांनी लोकगीतांचे एकूण तीन मुख्य वर्ग केलेले आहेत ते असे- मुलांची गीते,स्त्री गीते, पुरुषांची गीते आणि मग त्यांत उपवर्ग केलेले आहेत.

डॉ. प्रभाकर मांडे यांनी केलेले लोकगीतांचे वर्गीकरण हे सर्वसमावेशक आहे त्याचबरोबर लोकगीतांच्या स्वरूप- विश्लेषणावर अधिक प्रकाश टाकणारे आहे. स्त्रियांची व पुरुषांची लोकगीते ही एकत्र करता येत नाहीत. श्रमगीते ही स्त्रियांची आणि पुरुषांची दोन्होंची असतात, त्यामुळे प्रभाकर मांडे यांनी स्त्रीगीते आणि पुरुषगीते हे वर्ग करून त्यांचे उपवर्ग केलेले आहेत. एकूण लोकगीतांचा सर्वच भाग या वर्गीकरणात समावेश झालेला आहे. त्यामुळे डॉ. प्रभाकर मांडे यांनी केलेले लोकगीतांचे वर्गीकरण सर्वसमावेशक आहे.

## ३.३ फुगडीगीते

फुगडी हे गोव्यातील एक लोकनृत्य आहे. फुगडी हा एक कला प्रकार आहे. फुगडीचा जन्म हा धालाच्या मांडावर झालेला आहे असे मानले जाते. फुगडी गीतामधून स्त्रियांचे जे जगणे आहे ते जगणे प्रतिबिंबित झालेले दिसून येते. समाज, संस्कृती, कुटुंब ह्या सगळ्यांचे प्रतिबिंब फुगडीगीतातून दिसून येते. या फुगडीगीतांच्याव्दारे स्त्रियां आपल्या मनाच्या व्यथा त्याचबरोबर आनंद सुद्धा व्यक्त करतात.

फुगडीचे अनेक प्रकार आहेत. उभी फुगडी, आडवी फुगडी, झिनोळी फुगडी, रगड़ो, होडी, पाखो, झिम्मा फुगडी, बेडूक फुगडी, फेर फुगडी, इत्यादी. भोम गावात सुद्धा ह्या प्रकारच्या फुगडया घातल्या जातात.

## ३.३.१ आशयनिष्ठ अभ्यास

फुगडीगीते ही अगदी साध्या व सोप्या भाषेत असतात मात्र ह्या मध्ये मोठा अर्थ दडलेला असतो. स्त्रिया प्रत्यक्षात जे सांगू शकत नाही ते ती गीताच्या माध्यमातून व्यक्त करतात. कोणत्याही शुभकार्याची सुरुवात ही गणेश पुजनाने होते तशीच फुगडीत सुद्धा गणेशाची उपासना करूनच फुगडीचा आरंभ होतो.

**श्रीगणेशा म्हादेवा काय गवर जाता माहेरा काय गवर जाता माहेरा**

**जाता तैशी जाऊ दे कपळ भर टिळा तिला लावू दे ॥**

श्रीगणेशाला नमन करून या फुगडीची सुरुवात होते. या फुगडीत गौरी म्हणजे पार्वती आपल्या माहेरी जाते. तेव्हा तिला सौभाग्यवतीचे सर्व अलंकार परिधान करून जाऊ द्या असे सांगतात. यामध्ये गौरीची उपमा स्त्रियांना दिलेली आहे. समाजाचा असा समज आहे की स्त्रियां जेव्हा आपल्या माहेरी जातात तेव्हा तिने नटून थटून आपला श्रृंगार करूनच जावे. यावरून माहेरांच्या लोकांना समजेल की ती आपल्या सासरी सुखी आहे.

फुगडीगीताच्या व्दारे स्त्रियां श्री विघ्नहर्ता समोर आपला सौभाग्य अखंड राहू दे अशी प्रार्थना स्त्री करते. स्त्रीची फक्त एकच इच्छा असते ती म्हणजे तिचा सौभाग्य नेहमी तिच्या सोबत असो, याच्या व्यतिरिक्त तिला कोणत्याच गोष्टीची अपेक्षा नसते.

**गणपती देवा करीन तुझी सेवा नवस करीन रे देवा नवरी करीन रे**

**कपळाचा कुंकू दे जन्म भर आणि काय मागेन रे देवा आणि काय मागेन रे**

गोमंतकीय समाजात **कुंकू, गळ्यातला मणी, हाताची काकणा, पायातली पैंजण** ह्यांना सौभाग्याचे प्रतिक मानले जाते. ह्या सर्व गोष्टी नेहमी टिकून ठेवण्याची स्त्रियां भक्ती भावना, आराधना करून गणपती देवाकडे प्रार्थना करतात.

हिंदू धर्मामध्मे घरासमोर तुळस असणे हे महत्त्वाचे मानले गेलेले आहे. घरासमोर तुळस असल्यास कोणत्याही वाईट गोष्टी घरात प्रवेश करत नाही अशी मान्यता आहे म्हणून तुळशीचे रोप पानन पान फुलावे अशी प्रत्येक स्त्री ची इच्छा असते. स्त्री आपल्या मनाची व्यथा कोणलाच सांगत नाही. तिली फक्त एकच मैत्रिण असते ती म्हणजे घरासमोर असलेली तुळस. या तुळशी मातेला ती आपले विचार, मनात असलेली भिती, दुःख ह्या सर्व गोष्टी सांगते.

**दारातले तुळशी गे पान आन पान फुलसी गे पान आन पान फुलसी ॥**

**दोन दिवसाची आई तू माझी जन्माची सासू गं माझी जन्माची सासू गं ॥**

3परोक्त फुगडीमध्ये एकंदर मुलीच्या मनाची व्यथा व्यक्त केलेली आहे. जेव्हा मुलीचे लग्न व्हायचे असते तेव्हा ती आपल्या मनाला समजावते. आपल्या आई-बाबाला, बहिण-भाऊला सांगते की लग्न होईपर्यंतच तुम्ही माझ्याभोवती असणार आहात. लग्न झाल्यानंतर मात्र तिचा संसार फक्त सासू, ससूर, नडन, दिर यांच्याभोवतीच असणार आहे.

## ३.३.१.१ कौटुंबिक विषय

लग्नापूर्वी मुलीला कमी लेखली जाते. लग्न झाल्यानंतर नवऱ्याच्या, सासूसासऱ्याच्या जाचामुळे तिला नेहमी कष्ट भोगावे लागते. सासरी तिच्या हक्काचे कोणीच नसल्याने ती आपले मन मोकळे करूच शकत नाही. मुले झाल्यानंतर मात्र ती मानसिक दृष्ट्या सुखावते व नंतर तिच्या मुलाभोवतीच तिचे जीवन फिरते.

**कृष्णा घालितो लोळण यशोदा आली ती धावून**

**काय रे बाळा मागतोस तुजला देते मी आणून**

**आई मला चंद्र दे आणून त्याचा मला चेंडू दे बनवून**

**असल कसलं मागणं बाळा जगाच्या वेगळं**

उपरोक्त गीतातून आई आणि मुलाचे भावनीक गुंतवणूक झालेली दिसून येते. स्त्री आपल्या मुलाचे खूप लाड करते. छोट्या मुलाला कोणतीही समज नसल्याने तो ढोबळ मनाने जगावेगळे आईशी हट्ट करतो. शेवटी लाडीक लाटक्या रागाने ती मुलाला समजविते.

**बाजारातलों मसाला माव माजों पिवपाक बसतालों गो बाय गो पिवपाक बसतालों**

**बाजारातलें लवंग माय माजी सवंग झगडी करताली गो बाय गो झगडी करताली**

**दारातली कापशिण नडन माजी राक्षिण चाडियों करताली गो बाय गो चाडियों करताली**

**बाजारातलों चणों देर माजो शाणों चेडवांक भूलतालो गो बाय चेडवांक भूलतालों**

**गोड गोड साखर घो माजो भाङ्ग सांगता ते आयकतालो गो बाय गो सांगता ते आयकतालो**

उपरोक्त फुगडीतून कौटुंबिक वर्णन आलेले आहे. सास, ससूर, नडन, दिर ही सर्व मंडळी आपल्या घरात आपल्या सुनेशी कशाप्रकारे वावरतात हे दिसून येते. येथे स्त्रिने ससूरला मसाला, सासूला लवंग, नडनला राक्षिण आणि दिरला चणा यांची उपमा देऊन त्यांचा स्वभाव कसा आहे हे दर्शविलेले आहे.

शेवटी आपल्या पतिला तिने साखरीची उपमा देऊन तो तिच्याबरोबर कशाप्रकारे वावरतो हे सुद्धा दर्शविलेले आहे. या फुगडीगीतातून स्त्री मनात दडलेल्या भावना व्यक्त करीत आहे.

अशी काही फुगडीगीते आहेत ज्यातून स्त्रियांचे दुःख दिसून येते. स्त्रियांवर सासरी होणाऱ्या अत्याचारांचे दर्शन घडते उदाहरणार्थ --

**जिण जिण जिणेच्यो पदी गे जिण जिण जिणेच्यो पदी**

**दिसभर मायेच्यों गाळी गे दिसभर मायेच्यों गाळी**

**दिसभर गाळी गे रातभर तळी, रातभर तळी गे मुठभर वाडी**

**राती हाव जेयले गो सुंगटाच्या कडयेनं, मायेन माका बड्यले गो उस्क्याच्या बड्येनं**

**सदाच गो धिंगशाणा माजी मायची गो धिंगशाणा, माज्या कडयेची शाणपणा**

उपरोक्त फुगडीगीतातून सासरी केला जाणारा स्त्रीवर अत्याचार दिसून येतो. कितीही चांगल्या गोष्टी केल्या तरीही सासूच्या रागाचा सामना सुनेला करावाच  लागतो. शेवटी सर्व कामें करून सुद्धा तिला तिच्या हक्काचे जेवण सुद्धा मिळत नाही उलट दिवसभर सासूच्या बोलण्याने तिचे जीवन उद्ध्वस्त होते.

स्त्री असून सुद्धा स्त्रिचा आदर-सन्मान काही स्त्रियां करत नाहीत. आताच्या काळात ही स्थिती सगळीकडे पहायला मिळते.

**जावयेक हाव शिकयता वटयेन भाकर लिपयता**

**वटयेनची भाकर गोड गे जावयेचो काडलो झोड गे**

ज्या प्रमाणे सासरीच्या माणसांची स्तुती केली जाते त्याचबरोबर त्यांची थट्टा मस्करीसुद्धा फुगडीगीतांतून केली जाते. देराच्या पत्नीला स्वतःचे मोठेपण दाखविण्यासाठी तिचा तिरस्कार केला जातो, छोट्या छोट्या कारणांमुळे तिला टोमणे मारले जाते. लोकांसमोर तिची थट्टा केली जाते.

**शिरगावा बाहेर गावी एक फुलला नागुलकुडा एक फुलला नागुलकुडा ॥**

**फुलला नागुलकुडा लईराई आईचा सातवनी लईराई आईचा सातवनी ॥**

या फुगडीतून एकंदर लईराई देवीची जत्रा कशा प्रमाणे होते याचे वर्णन केलेले आहे. या फुगडीमध्ये ‘नागुलकुडा’ हा शब्द आलेला आहे. ‘नागुलकुडा’ एका फुलाच्या झाडाचे नाव आहे. हे फुल अनंताच्या फुलाप्रमाणेच दिसते आणि हे फक्त डोंगराळ भागातच आढळते. त्याचबरोबर वनस्पती म्हणूनसुध्दा याचा वापर केला जातो. त्याचबरोबर ‘आकुडली’ हा शब्द सुद्धा आलेला आहे. याचा अर्थ म्हणजे थंडी वाजणे. जेमतेम हा शब्द आता जास्ततर कोणीच वापरत नाहीत.

### ३.३.१.२ पुराणातील कथांचे प्रतिबिंब

काही फुगडीगीतातून पौराणिक कथा सांगितल्या जातात. पद्य स्वरूपात ही गीते असली तरी त्या गीतातून कथा सांगितली जाते.

**अशी नेन्टेली बाई सिता ॥ अशी नेन्टेली बाई सिता ॥**

**सिता गेली गे नयेच्या वाळार ॥ सिता गेली गे नयेच्या वाळार ॥**

या फुगडीगीतामधून पौराणिक कथेचे वर्णन केलेले दिसून येते. लहान असताना जेव्हा सिता एका नदीच्या तटावर जाते, तेव्हा तिथे तिला एक धनुष्य बाण मिळतो. तेव्हा ती आपल्या वडिलांना म्हणजे राजा जनकाला हाका मारून बोलाविते. तेव्हा राजा जनक तिथे येतो आणि सितेला काय झाले ते विचारतो. तेव्हा सिता सांगते की तिला धनुष्य बाण मिळालेला आहे. तेव्हा राजा जनक तिला सांगतो की तो धनुष्य बाण काढून तुळशीच्या पुढे ठेवून त्याला नमस्कार कर .

चिडविण्याच्या उद्देशाने सुद्धा काही फुगडीगीते म्हटली जातात. वयात आलेल्या मुला-मुलींची थट्टा-मस्करी करणे हाच ह्या गीतांचा उद्देश असतो. गावातील मुलांची नावे घेऊन मुलींना चिडविले जातात. उदाहरणार्थ-

### ३.३.१.३ थट्टास्पर फुगडीगीते

**तांबडो तुवालों खानार वडयलों**

**तुवालों खय गेलों गो पिया तुवालों खय गेलों**

**भोमचें चेडें दिसता बरें**

**चेडवांचेर लायण्यों मारता गो (सुप्रिया) चेडवांचेर लायण्यों मारता**

या फुगडीमध्ये भोम गावाचा उल्लेख आलेला आहे. त्याच बरोबर स्त्रियां मुलांच्या नावाने मुलींना चिडवून त्यांची थट्टा मस्करी करतात हे सुद्धा दिसते.

शेवटी झेमाडो या नावाच्या फुगडी प्रकाराने फुगडीची सांगता होते. यामध्मे यमक, शब्दांची जुळवाजुळव करण्याचा प्रयत्न केलेला आहे. विनोदी आणि हास्यास्पद पद्धतीनी सासूची मस्करी करून ही फुगडी घातली जाते.

**झॅम झॅम झॅमाडों**

**सुर्याच्या पोरसान आमडों**

**सुर्याची बायल मात्शी हांगसर ये**

**माका मात्सो राजू दे**

फुगडीगीतांची निर्मिती स्त्रियांकडून झालेली असून त्यांचे प्रकटीकरण सुद्धा स्त्रियांच मौखिक परंपरेने करीत आहेत. जीवन जगत असताना आलेले अनुभव ती फुगडीगीतांतून मांडते.

## ३.३.२ भाषिक अभ्यास

लोकगीतांमध्ये शब्दाची काटकसर झालेली पहायला मिळते. दैनंदिन जीवनात जे शब्द उच्चारले जातात तेच शब्द लोकसाहित्यात वापरले जातात.

उदाहरणार्थ – 'महादेव' म्हणण्याऐवजी 'म्हादेव' असा शब्द उच्चारला जातो.

औद्योगिकीकरणाचा माणसाच्या जीवनावर मोठा परिणाम झालेला आहे. आधुनिक काळात लोकांना शिक्षण मिळू लागले. दुसऱ्या भाषांची जाणिव लोकांना होऊ लागली. परदेशी भाषा माणूस बोलू लागले. त्याचा परिणाम लोकसाहित्यावर झाला. वर्तमानात इंग्रजी भाषेचा प्रभाव मोठ्या प्रमाणात लोकवाङ्मयावर झाला.

**प्रतिमांचा वापर**

लोकगीतांमध्ये प्रतिमा प्रतीकांचा वापर जास्त प्रमाणात केलेला आढळतो. कोणत्याही गीतांमध्ये प्रतिमांचा आणि प्रतिकांचा वापर हा केला जातोच, पण पूर्वीच्या काळात सुद्धा माणूस शिक्षित नसूनही वाङ्मयीन सौंदर्यावर त्यांचे प्रभुत्व होते हे दिसून येते.

गणपती देवा करीन तुझी सेवा नवस करीन रे देवा नवरी करीन रे

कपळाचा कुंकू दे जन्म भर आणि काय मागेन रे देवा आणि काय मागेन रे

सौभाग्यवती स्त्री ही देवाकडे हात जोडून प्रार्थना करते की जोपर्यंत तो आहे तिचा सौभाग्य तिच्यासोबत असू दे. इथे कपळाचा कुंकू हे सौभाग्यवती स्त्रीचे प्रतिक असते.

## ३.४ धालो

धालो उत्सव हा गोमंतकात पौष्य महिन्यात (जानेवारी-फेब्रुवारी) धालोच्या पारंपरिक मांडावर पाच, सात किंवा नऊ रात्रीच्या स्वरूपात धालो सादर केला जातो. मातृदेवता यांचा पूजनविधी या धालोत्सवात केले जातात. बायका दोन 'पातीत' म्हणजे रांगात एकमेकांसमोर उभ्या राहून गाण्याच्या तालावर मागे-पुढे होत नाचतात. धालोउत्सवात बायका अनेक खेळ खेळतात. या धाल्याच्या मांडावर शेवटच्या रात्री काही मुलींच्या अंगात अवसर येतो, त्यांना 'रंभा' असे म्हणतात. या धालोउत्सवात बायकांचा सहभाग असतो.

### ३.४.१ धालोगीते

पौष मासात कडाक्याची थंडी पडलेली असते अशा या दिवशांत फुल झाडांना बहर आलेला असतो. सगळीकडे तृप्ततेची भावना असते. याच पार्श्वभूमीत धालोत्सव हा गोमंतकीय स्त्रीयांचा उत्सव सुरु होतो. एकेकाळी हा उत्सव अकरा दिवस सुद्धा चालायचा. पण आता मात्र धकाधकीच्या जीवनामध्ये इतर कामातून वेळे काढून पाच दिवसापर्यंत आलेला आहे. कधीकाळी हाच उत्सव पाच सात नऊ अकरा अशा पध्दतीनं संपूर्ण रात्र रात्र जागवली जायची. स्त्रिया मांडावरती एकत्र जमायच्या.

मांड हा लोकसंस्कृतीचा उपासक. मांडाला चांगुलपणाची, मांगल्याची, पावित्र्याची संकल्पना जोडली गेलेली आहे.

धालोच्या दिवसात स्त्रियांच्या मनात उत्साह संचारायचा. कितीही कामे असली तरी लवकर आटपून धालाच्या मांडावर जायची. थंडेचे दिवस असल्याने अंगावर खांद्यावर कांबळ गोधड्या वगैरे लपेटून त्या लगबगीनं मांडावर जायच्या.

पूर्वी मांड हा शेणाने सारला जायचा. त्याचबरोबर मांडाच्या मधोमध मातीची तुळस असायची आणि त्या तुळशीला शेणाचा गिलावा काडून वेगवेगळया प्रकारच्या फुलांनी तुळशीला सजविले जायचे. आणि मग सगळया महिला सोबतीन उभ्या राहून घाराणे घालून धालोत्सवाला सुरुवात करायच्या. त्यानंतर वेगवेगळया प्रकारच्या फुगड्या घालून रात्रभर खेळायच्या पण शेवटच्या रात्री मात्र नृत्याबरोबर नाट्य करायच्या.

भोम गावात सुद्धा अशाचप्रकारे धालोत्सवाला केला जातो. तुळशीला सजवून सर्व स्त्रियां गाऱ्हाणे घालून धरतरी मातेला, ग्रामदेवतेला, कुळदेवतेला स्मरून मांडावर असलेल्या तुळशी वृदांवनासमोर गावातील मोठा जल्मी नारळ फोडतो आणि धालोत्सवाला सुरुवात होते.. त्यानंतर नारळाच्या कातळया करून उपस्थित असलेल्या सर्व स्त्रियांना दिले जाते. नंतर सर्व स्त्रियां पातिल्याने (अर्थ रांग) उभ्या राहतात आणि गीत  गातात.

**कार्तिक महिना कार्तिक महिना, मालन पुनवे आनन जाला गे**

**जाला जाल्यार बरे जाले तुळशी जागो आमी बेणू गे**

सुरुवातीला गीतामधून सखीयांना बोलावले जाते, त्याच्याही पूर्वी तुळस कशी करायची, रांगोळी रेखणं या सर्व प्रकारांमध्ये ह्या गीताची गुंफण केली जाते व पुढे पुढे नेऊन हे गीत लांबवले जाते. त्याच्याही पूर्वी जेव्हा गाऱ्हाणे घालून नारळ फोडून कातळया सर्व स्त्रियांना दिल्या जातात याच अनुशंगाने पुढील गीते आलेली आहेत.

**फोडिलो नारळ काढिल्या कातळ्या**

**वाटीली तुळशीविणा वना गे**

नारळ फोडून ज्या कातळया स्त्रियांना दिल्या जातात त्या कातळया शेवटच्या रात्रीपर्यंत पदराला बांधून ठेवायच्या असतात असा एक संकेत आहे. हे गीत म्हणून सख्यांना धालो खेळण्याचे निमंत्रणही दिले जाते. मांडावर दोन्ही बाजूला उभ्या असणाऱ्या दोन्ही रांगांमध्ये धरतरी माता, ग्रामदेवता खेळत आहेत असे कल्पून गीताव्दारे मांडाची जागा चंदनलेपाने गंधीत केली जाते.

**'गंदान मांड सारयला गो, गंदान मांड सारयला गो'**

धरतरी मातेला नमन करून त्यानंतर स्त्रियां मांडावर अनेक गीते म्हणतात. त्यानंतर रेघ बांधणी होते. 'रेघ बांधणी' म्हणजे दरदिवशी मांडावर धार्मिक गीते गाऊन संपल्यानंतर त्या मांडाची वयस्कर स्त्री राख घेऊन पहिल्या दिवसाची एक रेघ काढते. दुसऱ्या दिवशी दुसरी रेघ काढते. अशा रितीने धालो संपेपर्यंत ह्या रेघा काढल्या जातात. ही रेघ म्हणजे मर्यादाचे एक बंधन आहे त्याचबरोबर मांडावरील देवतांना दिलेला सन्मान आहे.

**दुडीचेर दुडी घेवून चल्या आमी साथ तीनशें गावच्यों नारी गे आमी खेळया गे मांडार वचून**

**चांदण्यात चांदणे पिट भर चांदणे चांदुल्या रातीच्यों राती गो बाई चांदुल्या रातीच्यों राती**

**या बाचेवर कोण देव निजला गे कृष्ण देव निजला गे राधा बाई घालता गे वारा गे बाई राधाबाई घालता गे वारा**

**राधा बाईच्या हातात किदे गे कृष्णाच्या गळ्यातल्यों माळो गें बाई कृष्णाच्या गळ्यातल्यों माळों**

**कृष्णाच्या गळ्यातल्यों माळों गे बाई फुलांचों वाटुल केलों गे बाई फुलांचों वाटुल केलों**

रात्रीच्या मंद चंद्रप्रकाशात विविध गीतांच्या आवाजाने वातावरण भारीत बनते. पौर्णिमेच्या दिवसांनी सगळीकडे चांदणं पडलेले असते. चांदण रात्रीच्या दिवसांनी धालाच्या मांडावर देव देवता येऊन आमच्या सोबत खेळत आहे असे मानून सर्व देवतांना स्मरून फुगड्या घातल्या जातात.

**रथ तुज्यों दाणीयों साडेतिनशी गुडीयों**

**रथात कोण देव बसला गं रथात कोण देव बसला गं**

**रथात बसली भोमची माता माणार खेळूंक आयल्या गं माणार खेळूंक आयल्या गं**

अशाप्रकारे पहिल्यांदा भोमच्या स्थळातील मातेला वंदन करून नंतर सर्व ग्राम देवांना वंदन केले जाते.

कळशी फुगडी, बेडूक फुगडी, आडवी फुगडी, उभी फुगडी, इत्यादी अश्या अनेक प्रकारच्या फुगडया घातल्या जातात. शेवटच्या रात्री मात्र नृत्याबरोबर नाट्यही सादर करतात. नवरा आणि नवरी बनून लग्नाची विधी करतात.

धालो संपल्यानंतर विविध विधी प्रकार करण्याची पद्धत आहे. त्यानंतर धालो समाप्तीची तयारी करतात. हा सारा भाग गंभीरवृत्तीने व श्रद्धेने केला जातो. धालोची सुरुवात शितल गंधीत चंदन तिळयाने होते तर धालोची शेवट शेणाचा टिळा भाळी लावून सारवलेल्या मांडाचे तीर्थ पिऊन होते.

धालोच्या मांडावरील प्रत्येक स्त्री एक दुसरीचा निरोप आलिंगन देऊन करते. त्यापूर्वी सुवासिनीने उखाणे घेण्याची पद्धत आहे. आपल्या नवऱ्याविषयीचा आदरभाव, प्रेम, जिव्हाळा सर्वांसमक्ष त्यावेळी व्यक्त केला जातो. धालो खेळायला पुढच्या वर्षी भेटूया असा निरोपही घेतला जातो.

आपल्या सौभाग्याचे रक्षण सृष्टीदेवतेने करावे अशी लोकश्रद्धा या पारंपरिक धालोत्सवातून व्यक्त झालेली आहे.  पुत्रप्राप्तीसाठी अपेक्षेने आलेल्या स्त्रिया मांड शिंपण्याच्या विधीवत कार्यक्रमात सहेतूक सहभागी होतात.

धालो हा गावातील समृद्ध सूचित करणारा कलाप्रकार आहे असे म्हणता येते.

## ३.५ लग्नगीते

'लग्न' हा एक संस्कार, विधी, समारंभ म्हणून मानला जातो पण खऱ्या अर्थाने लग्न विधी संस्कृतिदशक आहे.

'लग्न' हा मानवी जीवनातील भावनिक अनुबंधाचा आणि स्त्री-पुरुष यांच्या जीवनाचा महत्त्वाचा असा सोहळा असतो. लग्न हा कौटुंबिक समारंभ जरी असला तरी तो सामाजिक पातळीवर महत्त्वाचा मानलेला

आहे. कोणत्याही कार्याची सुरुवात ही देवाच्या स्मरणाने होते. लग्न कार्याची सुरुवात सुद्धा देवाला स्मरून केली जाते.

**सोन्याचे गे खाणये रुप्याचें गें दातें**

**दातें माणूक आपय आमच्या लक्ष्मी मायेक**

ह्या गीताने लग्नाच्या तयारीला सुरुवात होते. हासत खेळत देवदेवतांना वंदन करून नवरीचे वर्णन केले जाते. तिच्यासाठी आलेल्या दागिन्यांचे, आकर्षक  वस्त्रांचे, आदीं यांचे वर्णन येथे आलेले आहे. त्यानंतर ‘सांभार’ म्हणजे मसाला भाजण्याची एक विधी असते.

**सोनीयाची काय्ल गें रुप्याची दवली, सांबार भाजीता गे लक्ष्मी माया**

**सोनीयाची काय्ल गे रुप्याची दवली, सांबार भाजीता गे यजमान बाई**

‘सामार’ म्हणजे मसाला भाजण्यासाठीही देवता येतात. लग्नाच्या कार्याला सर्व देवांचे आवाहन केले जाते. मसाला भाजल्या नंतर जात्याची पूजा केली जाते.

**दातें मांडूनी गे दात्या केल्या तिबें, जाग्या देव उबों आमच्या कार्यालागी**

**जाग्या देवा तू जाऊ नका पयस, आसन घेऊन बस आमच्या कार्यालागी**

उपरोक्त गीतामध्ये दातं मांडून दात्याची पूजा केली जाते. ज्याप्रमाणे शेतामध्ये व्हय (रेघ घालणे) घातल्या जातात त्याचप्रमाणे दात्याच्या कडेला व्हय केली जाते आणि तिथे सर्व देवांना आमंत्रित केले जाते आणि त्या कार्याला तिथे उभे राहून आशीर्वाद द्या अशी प्रार्थना केली जाते. देवदेवतांचा आशीर्वाद घेतल्या नंतर घरातील वडीलधाऱ्यांचा आशीर्वाद घेतला जातो.

**पाच वातियो दिवो गे पेटोन थेयला पाऱ्यार, वडलांच्या थाऱ्यार उजवाड घातला**

**पाच वातियों दिवो गे पेटोन थेयला तुळशी पेडियेर, वडलांच्या थाऱ्यार उजवाड घातला**

घराच्या दोन्ही बाजूला दिवा पेटवून वडिलधाऱ्यांचा आशीर्वाद घेतला जातो कारण असे मानले जाते की जर त्यांची आठवण केली नाही तर कार्याला काही बाधा येऊ शकते. त्यानंतर पुढीची विधी असते ती म्हणजे 'घाणो' भरण्याची.

**घाणों भरीला गें खाणीये कुंभाचों**

**जाग्या देवाच्या नावान घाणों उल्लासलों वळीये पानार**

**योंगे जाग्या देवा तू आपल्या माना**

घाणो भरणे म्हणजे मुसळांनी कांडणे. येथे पुरुष असत नाही. येथे पहिल्यांदा जाग्याच्या देवतेला आवाहन केले जाते नंतर सर्व देवदेवतांचे. कधीकधी चुकून देवाचे आवाहन करायचे राहून गेल्यास शेवटी सर्व देवाच्या नावाने पुढील गीत म्हणून ती चूक सुधारली जाते.

**पाऊस पडला मोतियांचा, कोम रुजला हळदीचा**

**एक पानी हळदूळी दोन पानी पावली, तीन पानी हळदूळी काय कुटीया गेली**

उपरोक्त गीत हळद लवताना म्हटले जाते. एक पानी, दोन पानी, तीन पानी असे करीत हळद काडली जाते. आणि जो जो नातेवाईक येऊन त्यवेळी हळद लावतो त्याचे नाव घेतले जाते. हळद लावल्यानंतर पुन्हा ती हळद उतरविली जाते. नवऱ्याला आंघोळीला नेले जाते.

**मळ्यातले मळशेणी पाटातले पाटपाणी, भावाची बहीण न्हाऊ घालता पाणी**

**करवंती आदी पंटी, गंगेचें गे पाणी गंगेचें गे पाणी, न्हाऊ घालता करवली बाई**

उपरोक्त गीतातून बहीण भावाचे नाते दर्शविलेले आहे. रंगीत पाटावर भाऊ बसलेला आहे आणि बहीण त्याला आंघोळ घालित आहे. त्यानंतर दृष्ट काडली जाते.

**अरे अरे लिंबा तू खर आशिल्लो कोण स्थळी, हाव आशिल्लों बारां वरसां आनंद नगरी**

**आता आयलों बाळाच्या का मस्तकावरी, मस्तक कशें नितळ कम तशें निर्मळ**

**दिसें दिसें जाग्या देवा तुजे रऊळ स्थळ**

उपरोक्त गीतातून नवऱ्याची किंवा नवरीची दृष्ट काडली जाते. असे मानले जाते. हळदीच्या अंगावर दृष्ट लागते त्यामुळे प्रत्येक देवांची नावे घेऊन अंगातल्या प्रत्येक भागाची दृष्ट काडली जाते.

**सात समुंदरा भायर केळीच गे, धर गे बयणी धर गे बयणी लगनाचों करो**

**करों धरल्यार रें बनवा काय नगा देशी, दीन गे बयणी दीन गे बयणी भाटन बेसन**

**वारों वादळ येता बनवा मोडून रे जाई**

उपरोक्त गीत करवलीसाठीचं आहे. सात समुद्रपार असलेल्या बहिणिला भाऊ साद घालतो व तिला 'करा' धरायला सांगतो. तेव्हा ती त्याला अनेक प्रश्न विचारते. तेव्हा भाऊ तिला भाट बेसन देईन म्हणून संगतो पण वादळ आणि वारा येऊन ते मोडून जातील अशी बहीण सांगते. मग भाऊ थाली तामण देईन म्हणून सांगतो. ते सुद्धा चोर भांडाळ चोरून नेतील अशी बहीण सांगते. अशाप्रकारे अनेक वस्तू देण्याचे वचन भाऊ बहिणीला देतो.

लग्नगीते ही जमातीची गीते आहेत. त्यांच्या जीवनाच्या धारणा, श्रद्धा, अंधश्रद्धा यांचे निर्देशन करणारी असतात. प्रत्येक विधीत गावातील देवदेवतांचे अस्तित्व त्यांचे सान्निध्य मानले जाते. दाते दळताना, घाणो भरताना, मसाला भाजताना अशा प्रसंगी देवता स्वतः काम करीत आहेत असे चित्र लग्नगीतात दिसते.

लग्नगीतांमधून लोकसंस्कृतीचे दर्शन घडते.

## ३.५.१ भाषिक अभ्यास

लग्नगीतामध्ये उपमांचा वापर केलेला आहे. त्यामुळे लग्नगीते जीवंत आणि प्रभावी वाटतात. उपमांचा वापर केल्यामुळे लग्नगीते आकर्षित झालेली असून त्या गीतांना एक वेगळेच सौंदर्य प्राप्त झालेले आहे. उदाहरणार्थ__

**रुक्मीण पावली माटवां दारी**

**माटवांच्या परी रुक्मीण संतोष जाली**

येथे रुक्मीणी उपमा नववधूला दिलेली आहे. नववधू ही जणू रुक्मीणच आहे म्हणजे देवीच आहे असे येथे संबोधण्याचा प्रयत्न केला आहे.

**रेशमाची दोरी गे तांब्यांची गे गोली**

**उदक काडता लक्ष्मी नारायणाची जोडी**

इथे यजमान आणि यजमानीला लक्ष्मी आणि नारायणाची उपमा दिलेली आहे. कोणतेही शुभकार्य हे जोडप्याने करावयाचे असते. त्यावेळी त्या जोडप्याला स्वयंम देवी देवता येऊनच करीत आहे असे मानून त्यांना लक्ष्मी नारायणाची उपमा दिलेली आहे.

आधुनिकतेचा प्रभाव लग्नगीतांवर झालेला दिसत नाही. अगदी प्राचीन शब्द लग्नगीतांमध्ये आढळताना दिसून येते. काळाच्या ओघात काही शब्द गहाळ झालेले आहेत. उदाहरणार्थ__ **बनवा** - या शब्दाचा अर्थ भाऊ असा आहे.

## ३.६ बालगीते

बालगीते म्हणजे लहान मुलांची गाणी. ताल आणि ठेका यांना या बालगीतात जास्त महत्त्व असते. त्याचबरोबर यमकाच्या जुळवा जुळवीवर जास्त भर दिला जातो. लहान मुलांचे जीवन हे एका मातीच्या गोळ्याप्रमाणे असते. जसा आपण त्याला आकार देतो तसाच तो घडत जातो. जसा कुंभार मातीच्या गोळ्याला आकार देऊन मग त्याला बट्टीत भाजून परिपक्व अशी मजबूत मडकी बनवितो तसाच लहान मुलांच्या निरागस, अजाण मनावर बालगीते संस्कार घडवित असतात.

### ३.६.१ आशयनिष्ठ अभ्यास

**यॅते यॅते यॅते यॅते खय रे मोरा खय रे मोरा**

**मामा ना घरा बाबाचो कोण घाली चारा कोण घाली चारा**

**चारा खाता पाणी पिता उडून जाता मोरा आपल्या घरा उडून जाता मोरा आपल्या घरा**

लहान वयात मुलांना मामाची, मामाच्या गावची असीम ओढ असते. पण काही कारणामुळे दरवेळी मामाच्या घरी जाऊ शकत नसल्याने आई त्याला चंद्र हा सुद्धा तुझा मामा आहे असे सांगते. त्यामुळे लहान मुलं नेहमी चंद्राला मामा म्हणून हाका मारतात आणि त्याच्याकडे मागणी करतात.

**चानी मामा चानी मामा भोभो दी भोभो दी**

**राव माज्या पुतानों भाजोनी भाजोनी**

मोठे झाल्यानंतर मुलांचे भावविश्व जसे पुस्तकी शिक्षाणाच्या भोवती गुंतते तसेच लहाच असताना त्यांचे भावविश्व चिऊ, माऊ, काऊ, गाई-गुरे, झाडे-वेली या सर्वांभोवती वाढत असते. **'एक घास काऊचो, एक घास चिऊचो'** असे म्हणून मुलाला भरणारी आई नकळत त्याला निसर्ग पशु पक्षी यांची ओळख करून देते.

लहान मुलांची आकलन शक्ती आणि स्मरणशक्ती कमी असते. त्यामुळे बालगीतातून पशू-पक्षी यांची उपमा देऊन बालमनावर संस्कार केले जातात. उदाहरणार्थ__

**तुपात पडली माशी चांदोबा राहीला उपाशी**

असे म्हणून लहान मुलांना समजविण्याचा प्रयत्न केला जातो की अन्न हे परब्रम्ह आहे. अन्नाचा तिरस्कार करू नये. दिलेले अन्न खाल्ले नाही तर त्यामध्ये माशी पडणार आणि चांदोबा सारखे उपाशी राहणार. हे सांगून त्यांच्या मनात भय निर्माण केला जातो की दिलेले अन्न जर खाल्ले नाही तर उपाशीच राहणार.

**काणी यें काणियें कोतवा मातारीच्या नातवा**

**मातारी पडली उताणी**

**उकलून धरले पुतानी पेज लावली सुनानी**

**उमरें खणले जावयानी नागोन येलें धुवानीं**

उपरोक्त गीत हे आजी आपल्या नातवंड्यांना म्हणून दाखवत असते. हे एक कथागीत आहे. गाण्याच्या माध्यमातून घडलेली कथा सांगण्याचा प्रयत्न केलेला आहे. आजी जेव्हा आजारी पडली तेव्हा कशाप्रकारे व कोणी तिची मदत केली याचे वर्णन ती ह्या गीतामध्ये करते.

**अटक मटक चवळी चटक,**

**चवळी जाली गोड गोड, जिबेचा आला फोड फोड**

**फोड काही फुटेना, डॉक्टर मामा उटेना**

**डॉक्टर मामा उटला, जिबेचा फोड फुटला**

उपरोक्त गीत हे एक खेळगीत आहे. लहान असताना अधिकतर मुले हे गाणे म्हणून खेळ खेळतात. त्याचबरोबर दुसरा अर्थ सुद्धा या गीताच्या द्वारे व्यक्त होतो. तो जसा की लहान मुलांना डॉक्टरची खूप भिती वाटते. डॉक्टरकडे जाऊया असे म्हटले की त्यांच्या मनात एक भय निर्माण होतो तो म्हणजे डॉक्टर त्यांना इंजेक्शन मारणार. मुले जर आजारी पडली तर डॉक्टरकडे जाऊया म्हटल्याबरोबर आम्ही चांगले आहोत असे सांगतात. एकंदर ह्या गीतातून नकळतपणे लहान मुलांच्या डॉक्टरच्या प्रती असलेल्या मानसिकतेचे वर्णन केलेले आहे.

## ३.६.२ भाषिक अभ्यास

बालगीते ही मुलांसाठी तयार केलेली असतात. त्यामुळे त्याची भाषा ही अगदी सोपी आणि साधी असते. ताल आणि सुरांचा बालगीतामध्ये विशेष लक्ष दिले जाते. ज्यामुळे मुलांना ती गाणी सहज लक्षात राहतात. बालगीतांद्वारे मुलांना समजणार, त्यांना आकलन होणार अशा भाषेचा वापर करून मुलांवर संस्कार केले जाते.

बालगीतांमध्ये यमकांचा जास्त वापर केला जातो. जेणेकरून मुलांना ती आकर्षक वाटतात.

उदाहरणार्थ – **धुकर पडलों <u>ओंकण्यान</u>**

**तेकां बडयलें <u>तोडक्यान</u>**

अशाप्रकारे यमकांचा वापर केला जातो. त्याचबरोबर शब्दांची पुनरावृत्ती सुद्धा बालगीतांचा एक मोठा भाग आहे.

उदाहरणार्थ – **पोदेर पोदेर <u>पाव पाव</u>**

**दुकरा फाटल्यान <u>धाव धाव</u>**

पुनरावृत्ती करून गीतांना आकर्षित केले जाते जेणेकरून मुलांचे लक्ष त्याच्याकडे वेधले जाते.

## ३.७ समारोप

मौखिक परंपरेने चालत आलेल्या लोकगीतांच्या स्वरूप विशेषांची चर्चा केली. लोकगीतांना शेकडो वर्षांची परंपरा लाभलेली असून मौखिक परंपरेने एका पिढीपासून दुसऱ्या पिढीकडे संक्रमित होत आहे. लोकगीतांतून लोकमनाचे, त्या मनातील विविध भाव-भावनांचे, विचारांचे आणि जीवनाकडे पाहण्याच्या दृष्टीने प्रतिबिंब पडलेले आहे तसेच लोकजीवन पद्धतीचे आणि लोकसंस्कृतीचेही दर्शन लोकगीतांतून घडते.

लोकगीतांचा कर्ता हा अनामिक असून हा समूह मनाचा अविष्कार आहे. भोम गावात लोकवाङ्मयाचा संपन्न असा वारसा मिळालेला आहे. लोकगीतांची संपन्नता लाभलेली आहे. फुगडीगीते, धालोगीते, लग्नगीते, बालगीते हे लोकगीताचे प्रकार भोम गावात आढळतात.

भोम गावातील लोकगीतांतून दुःख, जीवन जगण्यासाठी करावे लागणारे संघर्ष यासारख्या भावना व्यक्त होतात पण प्रसन्नता, आनंद, उत्साह, मस्करी, भक्तिमयता, या भावनांचे चित्रण जास्त प्रमाणात व्यक्त होते. त्याचबरोबर जीवनातील दुःख किंवा संघर्षाला विनोदी ढंगाने सांगण्याची पद्धतही पहायला मिळते.

## ३.८ निष्कर्ष

१. भोम गावातील मौखिक परंपरेने चालत आलेल्या लोकगीतांतून उत्साह, मौज, भक्ती, टीका या गोष्टींचे प्रकटीकरण होते.
२. लोकगीते ही पुरातन काळापासून चालत आलेली आहेत त्यामुळे त्यात शब्दांची प्राचीन रुपे सापडतात.
३. लोकगीतांची भाषा चालती बोलती असल्याकारणाने तेथील बोलीभाषेची वैशिष्ट्ये गीतात दिसून येतात.
४. धालोगीतांतून आणि फुगडीगीतातून स्त्री आपल्या मनातील भावना व्यक्त करताना दिसून येते.
५. भोम गावातील लग्नगीते ही विधीं गीते असून तेथील लोकांना लोकसंस्कृतीशी जोडून ठेवणारी आहेत.

## संदर्भ

[i] १ कालभूत डॉ. पुरुषोत्तम. ‘‘लोकसाहित्य स्वरूप आणि विवेचन’’. विजय प्रकाशन नागपूर. पहिली आवृत्ती : १० जानेवारी २००७. पृ. क्र. १०१

[ii] २ कालभूत डॉ. पुरुषोत्तम. ‘‘लोकसाहित्य स्वरूप आणि विवेचन’’. विजय प्रकाशन नागपूर. पहिली आवृत्ती : १० जानेवारी २००७. पृ. क्र. १००

[iii] ३ कालभूत डॉ. पुरुषोत्तम. ‘‘लोकसाहित्य स्वरूप आणि विवेचन’’. विजय प्रकाशन नागपूर. पहिली आवृत्ती : १० जानेवारी २००७. पृ. क्र. १००

## श्रेयनामावली

१. हर्षदा गावडे, वरचा वाडा भोमा, वय : २२, मोठी जल्मी यांच्या घराण्यातील नाथ
२. स्वाती नाईक, मधला वाडा भोमा, वय : ३४, सामान्य नागरिक
३. लतिका गावडे, नागझर वाडा भोमा, वय : २१, मोठी जल्मी या कुटुंबातील सदस्य

# प्रकरण ४

# भोम गावातील लोककथा

## प्रकरण ४

# भोम गावातील लोककथा


४.१ प्रस्तावना ........ ५१

४.२ लोककथा ........ ५१

४.२.१ दैवत कथा ........ ५२

४.२.२ प्राणिकथा ........ ५७

४.२.३ अद्भूतरम्य कथा ........ ५९

४.२.४ वास्तव कथा ........ ६१

४.३ भाषिक अभ्यास ........ ६२

४.४ समारोप ........ ६३

४.५ निष्कर्ष ........ ६३

संदर्भ ........ ६४

# प्रकरण ४

# भोम गावातील लोककथा

## ४.१ प्रस्तावना

लोककथा या मौखिक परंपरेने एका पिढीपासून दुसऱ्या पिढीकडे संक्रमित होत असतात. गोमंतकातील लोकवाङ्ग्यातील लोककथा या अतिप्राचिन आहेत त्यामुळे लोककथांमधून इतिहासाचा, संस्कृतीचा शोध घेता येतो. त्याचबरोबर स्थानिक लोकभाषेचा अभ्यास करता येतो.

लोककथांच्या माध्यमातून समाजाला बोध देण्याचे कार्य केले जाते. प्रत्येक समाजाची आपली एक कथनशैली असते, त्याच कथनशैलीत लोककथा सांगितल्या जातात. भोम गावातील लोककथा या गद्द स्वरुपाच्या आहेत. त्याचबरोबर भोम गावात दैवतकथां जास्त प्रमाणात आढळतात. बहुतांशी लोककथांना नावे नसतात, त्याचबरोबर कथनदम्यानही नावे सांगितली जात नाही.

## ४.२ लोककथा

लोकसाहित्यात लोककथांचे स्थान अतिशय महत्त्वाचे आहे. ज्या काळात मनोरंजनाची कोणतीच साधने उपलब्ध नव्हती; तेव्हापासून कथा रंजनाचे महत्त्वाचे कार्य करीत आहेत. लोककथा या मौखिक परंपरेने अगदी अनादी काळापासून चालत आलेल्या आहेत. कथा ही वेगवेगळया स्वरूपात प्राचीन काळापासून लोकमनावर आपले प्रभुत्व गाजवीत आहे. भारत हा कथाप्रिय देश आहे. लोककथांचा जनक म्हणून भारत देशाची ओळख आहे. या कथांमधून रंजन आणि बोध केलेला आढळतो. अशुभनिवारण, फलप्राप्ती, संकटाचे निवारण व्हावे अशी प्रयोजने लोककथांच्या निर्मितीमागे दिसतात.

लोककथांमधून तत्कालीन समाजजीवनाचे, त्यांच्या मानसिकतेचे, धार्मिक समजुतीचे, संस्कृतीचे दर्शन घडते. भारतीय लोककथेच्या परंपरेत दोन प्रकार दिसून येतात एक ग्रंथनिविष्ट लोककथा व दुसरी परंपरेने चालत आलेली लोककथा. मौखिक परंपरेने चालत आलेली कथा ही व्यक्ती आणि प्रदेशानुसार मूळ कथेत

बदल स्वीकारून विस्तारत जाणारी व रंजन, उद्बोधनाची पूर्ती करणारी वैशिष्ट्यपूर्ण असते. या कथेत सामूहिक मनाचे, आशा-आकांक्षांचे, श्रद्धा-संकेतांचे दर्शन घडते. या कथांमधून समूहमनाचा आविष्कार होत असतो.

लोककथांचे अनेक प्रकार आहेत. दैवतकथा, प्राणिकथा, अद्भूतरम्य कथा, दंतकथा, बोधकथा, वास्तवदर्शी कथा, इत्यादी. जिथे लोकांची वस्ती आहे तिथे तिथे लोककथा जन्माला येत असतात कारण कथेच्या माध्यमातून लहान मुलांना बोध किंवा निती शिकविणे, त्याचबरेबर कथेच्या माध्यामातून अनुभव सांगणे, मनोरंजन करण्यासाठी सुद्धा कथा सांगितल्या जातात. भोम गावात सुद्धा अशाच प्रकारच्या कथा आढळतात.

## ४.२.१ दैवत कथा

दैवत कथा ह्या प्रत्येक जमातीमध्ये आढळतात. दैवतकथांमध्ये प्रामुख्याने दोन प्रकार आढळतात ते म्हणजे दैवतांच्या माहिमा सांगणाऱ्या कथां आणि दैवतांच्या स्थापने विषयांच्या कथा. या दोन्ही प्रकारांमधून स्थानिक लोकसंस्कृतीची त्याचबरोबर लोकांच्या जीवनजाणिवांचे दर्शन घडते.[i]

## ४.२.१.१ दैवतांच्या स्थापना विषयांच्या लोककथा

भोम हा छोटासा गाव असून त्याला संपन्न अशी लोकसंस्कृती लाभलेली आहे. त्यातील अविभाज्य घटक म्हणजे तेथील दैवत होय. नारायणदेव, सतीदेवी, सातेरी देवी, गाडगस, रामपुरुष, नागझरकर, भिरमो, मल्लिकार्जुन अशा दैवतांची स्थापित मंदिरे या छोट्याश्या भोम गावात आहेत. अर्थातच जिथवर या लोकदैवतांचा वास आहे तिथे त्यांच्या कथा, त्यांच्या महिमा सांगणाऱ्या आख्यायिका समाजामध्ये आढळतात.

### लोककथा १ मल्लिकार्जुन देवाची स्थापना

भोम गावात जास्त वस्ती गावडा समाजाची आहे. त्याचबरोबर कोणत्याही कार्याला त्यांना पहिला मान दिला जातो. त्याचबरोबर या गावडा समाजात दोन उपजाती आहेत ‘ मोठा जल्मी आणि छोटा जल्मी ‘ . देवाचे कोणतेही कार्य त्यांच्या सांगितल्या शिवाय केले जात नाही व त्यांच्या होकारा शिवाय कोणतेही काम होत नाही.

भोम गावात गावडा समाजाची वस्ती जास्त प्रमाणात डोंगराळ भागात आढळतात. तिथेच रामपुरुष, मल्लिकार्जुन देवांची मंदिरे आहेत. ह्याच मल्लिकार्जुन देवाच्या मंदिराच्या स्थापनेविषय ची पुढील लोककथा.

पयलीं आमच्या लोकांक मल्लिकार्जुनाचे दर्शन घेवपाक काणकोण वयचें पडतालें. तेकां लागून एक दिस वडल्यां जल्म्यांन आनी धाकट्या जल्म्यांन मेळून काणकोण वचून मल्लिकार्जुन च्या देवळान वचून प्रसाद घेतलों. थयं तिच्यानी देवाक सांगलें की देवां आमच्या कसलेय काम आसल्यार धावोन धावोन हांगां येवचें पडतां, इतलें पयस येवपांक आतां आमचेंकडें जायनां, तेकां लागून देवा तूच आमच्या म्हऱ्यांन यों.

देवांन तिंकां येतलों मनून सांगलें. मागिरवडलें जल्मीं आनी धाकडें जल्मीं परत घरां येयलें. एक दिस मल्लिकार्जुन देव काणकोणसून चलत येयलों. तेन्ना तेकां पयलीं म्हादेव मेवळो. तेनीं म्हादेवाक सांगले की हांव हांगां रावपाक येयला, तेन्ना म्हादेवान मल्लिकार्जुनाक वाट दाकोपाखातीर गाडगस देवाक उलों मारून आपयलों आनि गाडगस देवाक सांगलें की आमच्या देवाक सगळयां वयरं वरून तेकां बरों सों जागों दीं.

तेन्नां गाडगस देवान सरियांसून मल्लिकार्जुन देवाक वयल्या वाड्यार येलें. थयं तांकां बरों सों जागों सोदून तेंकां भय रावपाक दिलें.

या कथेचा मतितार्थ असा, गावडा समाजातील लोकांचा मूळ दैवत हा मल्लिकार्जुन देव आहे. पूर्वी मल्लिकार्जुन देवाचे मंदिर हे काणकोण मध्ये होते. आणि त्यांच्या दर्शनासाठी किंवा कोणताही प्रसाद घेण्यासाठी या समाजातील लोकांना काणकोण मध्ये जावे लागायचे. तेव्हा भोम गावातील या गावडा समाजातील मोठ्या आणि छोट्या जल्मी यांनी मिळून काणकोण मध्ये जावून प्रसाद घेतला, देवाला सांगितले की देवां आमच्या बरोबर तुम्ही आमच्या गावी या. तिथे देवाने त्यांना होकार दिला. काही दिवसांनी मल्लिकार्जुन देव कोणकोणहून भोम गावी आले. तिथे त्यांनी महादेव देवाला भेट दिली आणि सांगितले की ते

इथे राहण्यासाठी आलेले आहेत. तेव्हा महादेव देवांनी गाडगस देवाला हाक मारली आणि त्यांना सांगितले की मल्लिकार्जुन देवाला गावाच्या वर नेऊन राहण्यासाठी जागा शोधून दे. तेव्हा गाडगस देवांनी सरियांमधून (पायऱ्यांच्या वाटेने) गावच्या उंच्च स्थळी नेऊन त्यांना जागा दिली व तिथेच मल्लिकार्जुन देव स्थापित झाले.

या कथेतून लोक चा भावार्थ, श्रद्धा या गोष्टींचे दर्शन घडते. समाजातील कोणत्याही लोकांना आपले दैवत हे आपल्या जवळ हवे असते. जिथे त्यांचा व्यवसाय, त्यांची वस्ती असते त्या ठिकाणी त्यांना आपला देव हवा असतो. पूर्वी व्यवसायामुळे गावडा समाज स्थलांतरीत होऊन भोम गावात आले असावे, त्यामुळे काणकोण मधील मल्लिकार्जुन देव भोम गावात स्थापित झालेला आहे.

आताच्या काळात जिथे मल्लिकार्जुन देवाची स्थापना झालेली आहे तिथे त्या जागेला वरचा वाडा दे नाव दिलेले आहे. ज्या वाटेने मल्लिकार्जुन देव वरच्या वाड्यावर गेले होते त्याच वाटेने दसऱ्याच्या वेळी पालखित बसून खाली येतात आणि पहिल्यांदा महादेवाच्या भेटी जातात. वरच्या वाड्यावर जाण्यासाठी दोन रस्ते आहेत, एक पायऱ्यांची वाट आणि दुसरी सरळ सपाट वाट. पण ज्या वाटेने मल्लिकार्जुन गेले होते ती वाट पवित्र मानली जाते, व कोणतेही शुभकार्य म्हणजे जेव्हा लग्न झाल्यानंतर दांपत्य वरच्या वाड्यावर जातात तेव्हा ती सरसपार वाटेने पात नाही कारण ती वाट आता अशुभ मानली जाते त्यामुळे पायऱ्यांच्या रत्यावरून त्यांना नेले जाते. अशी भावना या कथेमागे दडलेले आहे.

लोक संबंधाची काही सांस्कृतिक संदर्भही या कथेत आढळतात. जसे देवाला विचारणे म्हणजे कौल घेणे अथवा प्रसाद घेणे. म्हणजे देवाचा अवसर ज्याच्यावर येतो त्यावेळी त्यांनी जे काही सांगितलेले ते देवाचा शब्द म्हणून मानतात. लोकांवर जेव्हा वाईट प्रसंग ओढवतो किंवा अडी-अडचणींच्या वेळी देवाला प्रश्न विचारून त्याचे निरसन करणे ही पद्धत गोमंतकात जास्ततर समाजामधून आढळते.

**लोककथा २ गाडगस देवाची स्थापना**

गाडगस देवांनं मल्लिकार्जुन देवांक तेंची जागा दाकयलीं आनी तांका थयं बसयलों. तांकां थयं बसयतगीर गाडगस देवांनं मल्लिकार्जुन देवांक म्हटलें की आतां आपुण वयतां आनी देव चलपाक लागलों.

हें आयकनां फुडें मल्लिकार्जुन देवांनं गाडगस देवांक उलो मारून रावयलों. मल्लिकार्जुन देवांन गाडगस देवांक म्हटलें की आरें तूं म्हाकां हांगां एकटों साणून खयं वयतां ? तूं खयं वचू नाका तू आता माज्या फडयान रांव. त्या दिसापासन गाडगस देव मल्लिकार्जन देवाच्या मकार रावतां.

या कथेचा मतितार्थ असा, गाडगस देवाने मल्लिकार्जुन देवाला त्यांची जागा दाखवली आणि आपण जातो म्हणून सांगितले. तेव्हा मल्लिकार्जुन त्यांना जाऊ नकोस म्हणून सांगितले आणि इथेच आपल्यासोबत आपल्या समोर रहा म्हणून सांगितले.

गाडगस देव हा देवचार आहे. मल्लिकार्जुन देवांचा शब्द पाळून आजही गाडगस देव त्यांच्या समोर स्थित आहे. आजही त्यांचे प्रतिक म्हणून पाषाणाचा दगड मल्लिकार्जुन देवाच्या मंदिराच्या समोर आहे. गाडगस देवाचे ते प्रतिक नष्ट होऊ नये म्हणून गावातील लोकांनी प्रसाद घेऊन त्यांच्या भोवती घुमटी तयार केलेली आहे.

**लोककथा ३ म्हारु देवाची उत्पत्तीची कथा**

गाडगस देव वों पयलीं गावभर भोवतालों आनी गावाचेंर नज़र दवरीतालों. आता गाडगस देव थयंच उरलों. मुनोन गाडगस देवान म्हारु देवाक तयार केलों.

आनी म्हारु देवांक सांगलें की आयचान तू सगळ्या गावाचेंर नजर दोवरीतलों.

या कथेचा मतितार्थ असा, पूर्वी गाडगस देव गावभर फिरायचा, गावाची रक्षा करायचा. पण मल्लिकार्जुन देवाने गाडगस देवाला आपल्या समोर ठेवले त्यामुळे तेथून त्यांना जाता येत नव्हते म्हणून गाडगस देवाने म्हारु देवाची उत्पत्ती केली. आणि त्यांना सांगितले की पूर्ण गावांवर त्यांनी नजर ठेवायची म्हणजे संपूर्ण गावाची रक्षा करायची.

नागझर वाड्यात म्हारु देव स्थित आहे. नागझर वाड्यामध्ये वडाचे मोठ्ठे पेड आहे. त्या पेडाच्या मागे म्हारु देवाची छोटीशी मुर्ती आहे. त्या पेडाच्या मागे स्त्रियांना जाता येत नाही फक्त पुरुषच तिथे जाऊ शकतात. प्रत्येक दिवशी सायंकाळी तिथे दिवां लावायचा असतो. तेव्हा नेहमीं तेथील मोठया जल्मांच्या कुटुंबाचा पुरुष येऊन तिथे दिवा लावतो.

## ४.२.१.२ दैवतांच्या महिमा सांगणाऱ्या कथा

**लोककथा ४ कामळ्यो देवाची कथा**

एक दिसां एक मनीस रातीच्या वेळार धाड्यार गेलो. त्या दिसांनी लोकांनी थय भात भरून दवरलेले. देवाक दिल्यांशिवाय लोक थयसून भात घरा घेवन येय नासलें. त्या दिसां त्या मनशान थयं वचून भात चोरपाचें ठरयलें. भर राती तेणीं थयच्यान एक पोटली चोरली आनि थरच्यान येवपाक लागलों. तो वाट चलता चलता, पूण तेजीं वाट सोपन सोपना. तो वाट चलतां चलतां फातोड जाली. तेन्ना एका गावकऱ्यान तेकां थय पयले. तो मनीस घामाघूम जाल्लों. तें गावकऱ्याक कळलें की देवाक हेका हांगाच आडोन दवरला.

या लोककथेचा मतिमार्थ असा, एक माणूस भर रात्री चोरी करण्यासाठी शेतात जातो. त्या दिवसांनी गावकऱ्यांनी भात एकत्र करून ठेवलेले होते. आणि देवाला दिल्याशिवाय गावकरी भात घरी घेऊन यायचे नाही. त्या दिवशी त्या माणसाने तेथील भाताची एक पिशवी काडून चालू लागला. तो चालत होता पण त्याला

वाट मिळत नव्हती. चालता चालता पहाट तेव्हा एका गावकऱ्याने त्याला बघितले. तो माणूस खूप दमला होता. त्याला पाहून त्या गावकऱ्याला समजलें की देवाने याला इथेच अडवून ठेवलेले आहे.

एकंदर या कथेतून कामळ्यो देवाची महिमा दिसून येते. कामळयों देव हा भोम गावातील शेतीची राखण करतो. कामळ्यों देवाच्या भरवश्यावर गावकरी आपले धान्य तिथे ठेवतात. एकंदर भक्तिचे आणि विश्वासाचे दर्शन या लोककथेतून घडते

शेतकरी अनेक पिढ्यापासून शेताचा व्यवसाय करत असल्याकारणाने त्यांच्या अनुभवातून वलोकसमाजातून काही लोकसमजुती निर्माण झालेल्या आढळून येतात.

१. शेती व्यवसायातील कोणत्याही कामाची सुरुवात ही पुजाविधीने होते.
२. पिक कापल्यानंतर त्या पिकाची पूजा केल्याशिवाय ते पिक घरी नेले जात नाही.

## ४.२.२ प्राणिकथा

प्राणिकथा हा कथाप्रकार अत्यंत प्राचीन काळापासून चालत आलेला आहे. ह्या कथांमध्ये वास्तवाचा आधार नसतो. म्हणून प्राणिकथांना कल्पितकथा या नावाने सुद्धा ओळखले जाते. प्राणिकथांमधून प्राण्यांच्या द्वारे लहान मुलांच्या मनावर संस्कार घडविले जातात. लहान मुलांना प्राणी जास्त आवडतात त्यामुळे शेवटी सांगितलेली शिकवण लक्षात राहते.[ii]

**लोककथा ५ कोल्हा आणि कोल्हीची कथा**

एक आशिल्लों कॉलो अनि एक आशिल्ली कोली. कोली मनपाक लागली ‘‘कोल्या कोल्या आमी आयज डोंगरार या’’. कोल्यान मटले ‘‘ या गें कोलिये’’.

कॉलो उडी मारीत मारीत डोंगरार धावत गेलों. पून कोली आपली शुशागात चलत गेली. वयता वयता कॉल्याक मोवाचें झाड दिसलें. तो तुरतुरीत झाडार चडलों आनि मोव खावपाक लागलों.

कोलियेन कोल्याक मटले,’’ कोल्या माका बीन इल्लें मोव दी मरें’’. कोल्यान तिका मोंव दिलें. कोलियेन मोंव खाल्लें पूण कोल्याक सांगलें ‘‘ आरे तें शेणान पडले’’ कोल्यान दुसऱ्या फावटी वडयलें. परत तिणें बेगीन बेगीन खाल्लें आनि मनपाक लागली ‘‘ आरें ते मातीयेन पडले’’. अशें करीत करीत कोलीयेन मेण एकटाय केलें. त्या मेणाचें तिणें घर बानले. आनि कोल्यान शेणाचें घर बानलें.

एक दिस मोट्टो पावस येयलों आनि कोल्याचें घर वावून गेलें. तो कोलियेच्या घरा येयलों आनि कोल्याक मनपाक लागलों ‘‘ कोलिये कोलिये माका इल्लों जागोंदी मगें’’ कोलियेन तेका आपल्या एका रुमान जागों दिलों. त्या रुमान कोलियेच्यों कोमड्यों आशिल्ल्यों. कोल्याची मजात जाली. तेणीं सगळयों कोमड्यों खाल्ल्यों आणि सकाळीफुडें धावलों. कोलियेक कोल्याचें कारास्तान कळलें. तिणें तेका बरी बुद शिकोपाची ठरयली.

एका दिसां कोलियेन गावभर जेवण दवरलें. कोलियेक फूल गॅरेन्टी आसली की कोलों येतलों मुनोन. कोलों लिपोन कोलियेगेर येयलों आनि माळीयेय बसून जेवपाक लागलों. कोलियेन तेकां दिस्त पळयलें आनी लास्टाक चुलींची गरम गरम कोलती कोल्याच्या शेपटेक लायलीं. लास्टाक कॉलो हाय हूय करीत करीत पळत सुटलों.

ही एक बोधकथा दिसून येते. या कथेच्या शेवटी काहीतरी बोध म्हणजे काहीतरी सांगण्याचा प्रयत्न केलेला आहे. त्याचबरोबर या कथेमध्ये अद्भुतरम्यता व काल्पनिकता खूप प्रमाणात आलेली दिसून येते. उदाहरणार्थ :- कोल्ही सर्वांना जेवायला बोलावले त्याचबरोबर कोल्ही आणि कोल्हा स्वतः शेणाचे आणि मेणाचे घर तयार करतात, इत्यादी.

या कथेमधून माणसांना म्हणजे समाजाला काहीतरी सांगण्याचा प्रयत्न केलेला दिसून येतो. उदाहरणार्थ माणसांनी कधीही स्वार्थी होऊ नये. असे म्हणता येते की 'जो दुसऱ्यांसाठी जगला तो जगला, आणि जो स्वतःसाठी जगला तो मरण पावला.' कोल्हा आणि कोल्ही यांचे उदाहरण देऊन समाजामध्ये असलेल्या सुष्ट आणि दुष्ट माणसांचे चित्रण केलेले आहे.

कोल्हा फक्त स्वतः बद्दलच विचार करतो. तो दुसऱ्यांना त्रास देऊन स्वतः आनंदीत राहण्याचा प्रयत्न करतो. पण दुष्टपणा काही जास्त वेळ टिकत नाही. शेवटी कोल्ह्याला त्याच्या वाईट कर्माचे फळ प्राप्त होते. यातून समजाला हेच सांगण्याचा प्रयत्न केलेला आहे की चांगल्या कर्माची फळे चांगलीच असणार आणि वाईट काम केले तर त्याचे फळ सुद्धा वाईटच असणार. जो दुसऱ्याबद्दल वाईट विचार करतो त्याचे कधीही चांगले होणार नाही हे या कथेतून सांगण्याचा प्रयत्न केलेला आहे.

### ४.२.३ अद्भूतरम्य कथा

अद्भूतरम्य कथा जगातील सर्वच देशात आढळतात. मनोरंजनाचा हेतू समोर ठेवून या कथांचा उगम झालेला असतो. अद्भूत कथांची रचना ही साधी व सरळ न राहता त्यात गुंतागुंतीचा जास्त प्रमाणात वापर केलेला असतो.[iii] ज्या वस्तूंचा वापर दैनंदित जीवनात शक्यच नाही त्या सारख्या अनेक वस्तूचा आधार घेऊन अद्भूतकथांतून चमत्कार दाखवून लोकांना आकर्शित करून त्यांना आशर्यचकित करून अद्भूतरम्यतेच्या जगात नेले जाते. या कथांचा प्रमुख उद्देश फक्त हा असतो की अद्भूतरम्य विश्वाचे दर्शन घडवून मनोरंजन करणे आणि दुसरा उद्देश असतो तो हा की त्या कथांतून चांगल्या आणि वाईट गुणांविषयी समाजाला शिकवण देणे.

**लोककथा ६ घमंडी राजाची कथा**

या कथेमध्ये पुरुषसत्ताक व्यवस्थेचे वर्णन केलेले दिसून येते. राजाचा जो मुलगा आहे त्याचे प्रतिक घेऊन समाजाला पुरुष प्रधान व्यवस्थेचे वर्णन केलेले आहे. आधुनिक काळात ज्याप्रमाणे पुरुष स्त्रियांकडे फक्त वासनेच्या दृष्टीकोणातून पाहतात त्याचप्रमाणे या कथेत सुध्दा राजाच्या मुलाच्या द्वारे आजच्या परिस्थितीचे वर्णन केलेले आहे.

स्त्रियांनी फक्त घराचीच कामे करावी, तिने फक्त मुलाबाळांचाच सांभाळ करावा असा समाजाचा समज आहे. त्याचबरोबर पुरुष फक्त स्त्रीकडे उपभोगण्याची एक म्हणूनच पाहतात याचे वर्णन सुध्दा या कथेतून आलेले आहे.

त्याचबरोबर या कथेचा दुसऱ्या दृष्टीकोणातून विचार केला तर असा अर्थ जाणवतो की स्त्रियांनी जर आपल्या मनात कोणताही निश्चय ठामपणे केला तर ती गोष्ट ही करुनच दाखवते, याचे दर्शन सुद्धा या कथेतून घडते. आज पर्यंत स्त्रियांना दुर्बळ मानले जाते पण स्त्रियांनी एखादा निश्चय मनामध्ये केला तर तिला कोणीही अडवू शकत नाही स्वयं देव जुध्दा तिला अडवू शकत नाही. उदहरणार्थ: ज्या प्रमाणे सावित्रीने आपल्या पतिचे प्राण परत आणले होते.

आपला संसार कसा जपून ठेवायचा हे स्त्रियांना पुरेपूर माहित असते. त्याचबरोबर घरकामांबरोबर स्त्रियां बाहेरील कामे सुध्दा करू शकते याचे दर्शन सुद्धा या कथेमध्ये आढळते. त्याचबरोबर स्त्रियां पुरुषांवर अवलंबून न राहता स्वतःचा संसार सुद्धा सांभाळू शकते हे सुध्दा आपल्याला दिसून येते.

## ४.२.४ वास्तव कथा

### लोककथा ७ चंद्र, सुर्य आणि वाऱ्याची कथा

एका गावान बरें जोडपें रावतालें. तिंका तीन भुरगीं आशिल्ली. चेड्यांचे नाव सुर्य आनी चंद्र आनि चेडवाचें नाव वारें अशें आशिल्लें. वडलों चडों सुर्य हो खूप मदान आसलों आनि वारें हे खूप सूबेद आसलें पून धाकटों चडों चंद्र मात थंड आनि उग्गी आसतालों.

एक दिस राजा गावान जेवण दवरता आनि सगळ्यांक आपयता. जान्टी आसल्या कारणान त्या जोडप्याकडे वचपाक जाय नाशिल्लें. तिंच्यानी आपल्या भुरग्यांक चलां मुनोन सांगलें आनि लास्टाक तिंका सांगलें की येतना किदें आमका खावपाक हाडा.

थय वचून सुर्य आनी वारें जेवपाक लागले. चंद्राक मात आपल्या आवय बापायची याद येयली. तेणी आपले जाङड चिरले आनि तेतून वडें भरलें. घरा येवन जोडप्यान भुरग्यांक विचारले. सुर्यान आनि वाऱ्यान काय हाडूना मुनोन तिंका दोगांकूय श्राप दिलों की सुर्य सद्दी कडकड्या वतान करपतलों, वारें झाडा पेडां तोडून वयतलें. लास्टाक चंद्राक विचारले चंद्रान तिंका आपले जाड़ड कापून वडें दिलें तेन्ना तिच्यानी तेका आशीर्वाद दिलों की तू सद्दा थंड आनी शितलतायेन वयतलों.

या कथेच्याद्वारे समाजाला बोध देण्याचे कार्य केलेले आहे. चमत्कारीकतेचा वापर या कथेमध्ये जास्तप्रमाणात केलेला आहे. त्याचबरोबर ही कथा काल्पनिक आहे हेही दिसून येते. पण आजच्या आधुनिक पिढीसाठी ही कथा फार महत्त्वाची आहे.

आजची आधुनिक पिढी आपल्या आई-वडिलांकडे दुर्लक्ष करीत आहे हे दिसून येते. त्यामुळे आपल्या आई-वडिलांचा आदर, सन्मान करीत नाही. उलट त्यांना त्रास देतात, त्यांचे काहीही ऐकत नाही, त्यांना प्रतिउत्तर देतात.

आताच्या आधुनिक पिढीला आई-वडिलांचे महत्त्व जाणवत नाही. आई-वडिल हे देवाचे प्रतिक असतात. साक्षात देव सगळया ठिकाणी असू शकत नाही म्हणून त्यांनी प्रत्येकाच्या आयुष्यात आई-वडिलांची निर्मिती केलेली आहे आणि म्हणूनच त्यांचे स्थान देवाहूनही वर मानले जाते.

जी मुले आपल्या आई-वडिलांचा सन्मान करीत नाही त्यांचा आदर करीत नाही त्या मुलांचे कधीही चांगले होत नाही कारण आई-वडिलांची सेवा केल्याने पुण्य प्राप्त होते नाही तर नर्खाप्रमाणे त्यांची अवस्था होऊ शकते असा या कथेत सांगण्याचा प्रयत्न केलेला आहे.

उदाहरणार्थ: सुर्य आणि वारे ही दोघेही फक्त स्वतःचाच विचार करतात. स्वतःच्या आई-वडिलांचा विचार देखिल ती दोघेही करत नाही. पण चंद्र मात्र आपल्या आई वडिलांच्या शब्दांचा मान राखतो. त्यांचा आदर करतो. त्यामुळे त्याला चांगले फळ प्राप्त होते आणि सुर्याला आणि वाऱ्याला शिक्षा मिळते.

त्याचबरोबर ही कथा वास्तवदर्शी आहे हे सुद्धा दिसून येते कारण चंद्र, सुर्य आणि वारा यांना जो शाप, आशीर्वाद दिला होता तो आजही पहायला मिळतो. चंद्र नेहमीच रात्रीच्या वेळी शांत आणि शीतल वेळेवर दिसतो. सुर्य हा नेहमीच कडक व तापलेला असतो व वारा ही जेव्हा तेव्हा मोठयाने येऊन सगळीकडे उद्धवस्त करून जाते.

## ४.३ भाषिक अभ्यास

लोककथेमध्ये काही असे शब्द आलेले आहे ज्यांचा मराठीमध्ये उच्चार करायला जमत नाही. उदाहरणार्थ: जांग हा शब्द. या शब्दाचा अर्थ म्हणजे पायाच्या वरतीचा भाग असा आहे.

आधुनिकीकरणामुळे काही इंग्रज शब्द सुद्धा कथांमध्ये आलेले आहेत. उदाहरणार्थ- लास्ट, फूल, गॅरेन्टी, इत्यादी.

## ४.४ समारोप

लोककथा या मौखिक परंपरेने लोकजीवनात प्रचलित झालेल्या असून त्यांच्यामागे कित्येक वर्षांची परंपरा असते. लोककथातून लोकजीवनाचे प्रतिबिंब पहायला मिळते. लोककथा या मनोरंजनासाठी निर्माण केलेल्या असतात त्याचबरोबर लोककथांच्या माध्यमातून अद्भूतरम्यता, प्राणि, पशु, पक्षी यांचा आधार घेऊन समाजाला बोध देण्याचे करण्याचे कार्य केले जाते.

भोम गावात अनेक प्रकारच्या लोककथा आढळतात. उदाहरणार्थ- दैवतकथा, प्राणिकथा, अद्भूत कथा, इत्यादी. ह्या कथांच्या माध्यमांतून समाजातील लोकांच्या मनावर संस्कार करण्याचे काम केलेले आहे त्याचबरोबर नैतिक शिकवण देण्याचा सुद्धा प्रयत्न केलेला आहे.

## ४.५ निष्कर्ष

१. आधुनिकतेचा परिणाम लोककथांवर झालेला आहे. इंग्रजी शब्द लोककथांमध्ये आलेले आहेत. उदाहरणार्थ, लास्ट, गॅरेन्टी

२. भोम गावाच्या लोकवाङ्मयातून सांस्कृतिक इतिहासाची उकल होते. लोककथांतील दैवत कथांच्या माध्यमातून सांस्कृतिक इतिहासाची जाणिव होते.

३. लोककथांचा निर्माण हा मनोरंजनासाठी केलेला असतो पण मनोरंजनाचा आधार घेऊन लोककथांच्या द्वारे समाजाला नैतिक शिकवण देण्याचा प्रयत्न केलेला आहे.

४. लहान मुले ही निरागस मनाची असतात. ज्याप्रमाणे कुंभार मातीच्या गोळ्याला आकार देत असतो त्याचप्रमाणे लहान मुलांच्या मनाला, त्यांच्या बुद्धीला लोककथा आकार देण्याचे कार्य करतात. लोककथांच्या माध्यमातून बालमनांवर संस्काराचे बीज रुजविले जाते.

## संदर्भ

[i] १ व्यवहारे, डॉ. शरद. “ लोकवाङ्मय रुप-स्वरूप”. रजत प्रकाशन, औरंगाबाद, सप्टेंबर १९९१. पृ. क्र. १२३

[ii] २ कालभूत डॉ. पुरुषोत्तम. “लोकसाहित्य स्वरूप आणि विवेचन”. विजय प्रकाशन नागपूर. पहिली आवृत्ती : १० जानेवारी २००७. पृ. क्र. २२८

[iii] ३ व्यवहारे डॉ. शरद. “लोकवाङ्मय रुप- स्वरूप”. रजत प्रकाशन, औरंगाबाद. द्वितीयावृत्ती : २६ जानेवारी २०१२. पृ. क्र. १४५

## श्रेयनामावली

१. संकिता नाईक, नागझर वाडा भोमा, वय : ४२, कलाकार
२. मोहित गावडे, वरचा वाडा भोमा, वय : २२, गावडा समाज यांचा भाचा
३. हर्षदा गावडे, वरचा वाडा भोमा, वय: : २२, मोठी जल्मी यांच्या घराण्यातील नाथ
४. मयुर नाईक, नागझर वाडा भोमा, वय : २१, सामान्य नागरिक
५. मिलण गावडे, नागझर वाज भोमा, वय : ४८, मोठी जल्मी यांच्या कुंटुंबातील व्यक्ती

# प्रकरण ५

# भोम गावातील लोकनाट्य

# प्रकरण ५

## भोम गावातील लोकनाट्य

**५.१ प्रस्तावना** ........ ६६

**५.२ लोकनाट्य** ........ ६६

**५.३ गोमंतकीय लोकनाट्य** ........ ६७

**५.३.१ गोमंतकीय कालो** ........ ६८

**५.३.२ गवळणकाला** ........ ६९

**५.४ भोम गावातील कालोत्सव** ........ ७०

**५.४.१ भोम गावातील कालोत्सवाचे स्वरूप** ........ ७१

**५.४.२ भोम गावातील लोकनाट्य ( गवळणकाला )** ........ ७२

**४.४.३ लोकनाट्यातील पात्रे** ........ ७४

**५.४.४ लोकनाट्यात वाजविली जाणारी वाद्ये** ........ ७५

**५.४.५ गवळणकाल्याचे सादरीकरण** ........ ७६

**५.५ समारोप** ........ ७६

**५.६ निष्कर्ष** ........ ७६

**संदर्भ** ........ ७७

# प्रकरण ५

# भोम गावातील लोकनाट्य

## ५.१ प्रस्तावना

ग्रामीण भागात अनेक लोककलाप्रकार सादर केले जातात. या कलाप्रकारातून लोकांचे मनोरंजन व प्रबोधन केले जाते. लोकनाट्याचा अंतर्भाव हा प्रामुख्याने लोकसाहित्यात केला जातो. लोकनाट्याचा संबंध हा विधीशी निगडित असतो. लोकनाट्याचे अनेक प्रकार असतात. उदाहरणार्थ- गोंधळ, जागरण, लळीत, दशावतार, गोपाळकाला, गवळणकाला, इत्यादी.

गोमांतकात लोकनाट्य हे विशिष्ट दिवशी, विधी, काळात सादर केले जाते. गोमंतकीय लोकनाट्याच्या क्षेत्रात कालो या काल्यात समाविष्ट ‘संकासुरकालो’ किंवा ‘रातकालो’ किंवा ‘बाळक्रीडाकालो’, ‘गवळणकालो’, पेरणी जागोर, रणमाले यां सर्वांचा समावेश होतो.

भोम गावात गवळणकालो हे लोकनाट्य सादर केले जाते. याच्याबदल इथे चर्चा केली जाणार आहे.

## ५.२ लोकनाट्य

वैज्ञानिक प्रगतीमुळे समाजाची बुध्दिनिष्ठा वाढत चालली आहे. त्यामुळे धर्मश्रद्धांना गौण स्वरूप येऊ लागले आहे. पण ईश्वरविषयक श्रद्धा मात्र पूर्णपणे नाहीशी झालेली दिसत नाही.

लोकनाट्य ही प्रतिवर्षी ठराविक तिथीला पुनः पुन्हा होत असल्यामुळे भगताला तीव्रपणे प्रेक्षकजाणीव होऊ लागते.

लोकमानसाचा आविष्कार करणारी नाट्यकला ही नृत्यकलेतून जन्माला आली असावी. रंगमंचावर सादर होणाऱ्या नाटकापेक्षा ‘लोकनाट्य’ हा लोककलाप्रकार वेगळा आहे. आजही ग्रामीण भागात सण-उत्सव, समारंभ, विधी कर्माच्या प्रसंगी लोकनाट्ये खेळली जातात.

लोकनाट्याची संहिता अलिखित स्वरूपाची असते त्यामुळे ती सादर करणाऱ्या लोककलाकाराप्रमाणे वाकते, वळते, तिच्यात उत्स्फूर्त अशी भर पडत जाते. लोकनाट्याचा आधार घेऊन समाजाला नैतिक शिकवण दिली जाते.

लोकनाट्याचा जन्म विधी आचरणातून झालेला असल्यामुळे त्याची बैठक धार्मिकतेवर आधारलेली आहे. लोकनाट्यात प्रामुख्याने धार्मिक आणि पौराणिक कथाभाग स्विकारलेला आहे. धर्मविधी, दैवताची उपासना, देवस्थानाचा उत्सव याशी लोकनाट्य निगडित राहिलेली आहेत असे डॉ. शरद व्यवहारे म्हणतात.[i]

## ५.३ गोमंतकीय लोकनाट्य

गोमंतक ही कलेची भूमी असून विविध कला प्रकार गोमंतकात आढळतात. इथल्या लोकांनी जोपासलेले कलाप्रकार या प्रदेशाचे नाविन्य दर्शविणारे आहेत. गोमंतकात लोकनाट्य कलाप्रकाराला खूपच महत्त्व आहे.

हे लोकनाट्य प्रकार गोमंतकात कोणत्या काळात उदयास आले हे सांगणे खूपच अवघड आहे. कारण गोमंतकीय लोकनाट्य प्रकार हे देवांच्या कृतींशी निगडित विधीना अनुसरून आहेत. आज देवता उपासनेचा भाग म्हणून त्याचे प्रचलन होताना आढळते.

गोमंतकात लोकनाट्य सादरीकरण विशिष्ट दिवशी तिथी/ वेळी/ काळात, सणा उत्सवाला बोधात्मक, मनोरंजनातून, आविष्कृत होत असतात. गोमंतकीय लोकनाट्याच्या क्षेत्रात कालो या काल्यात समाविष्ट ‘संकासुरकालो’ किंवा ‘रातकालो’ किंवा ‘बाळक्रीडाकालो’, ‘गवळणकालो’, पेरणी जागोर, रणमाले यां सर्वांचा समावेश होतो.

उपरोक्त लोकनाट्यपरंपरेतील विविधप्रकार गोमंतकात आविष्कृत होताना विशिष्ट शैलीतून विधीचे आचरण ही समूहमनाने जोपासलेली लोकजीवनातील परंपरा आहे.

## ५.३.१ गोमंतकीय कालो

गोमंतकात लोकनाट्य परंपरेतील 'कालो' हा उत्सव महत्त्वाचा मानला जातो. गोमंतकात 'कालो' या संबोधनाने सर्वत्र परिचित असलेला हा प्रकार गावच्या देवस्थानाच्या धार्मिक देवकृत्याशी निगडित आहे. गावच्या देवते समोर विशिष्ट एका काळात / तिथीला 'कालो' सादर केला जातो.[ii]

गोमंतकात 'कालो' याला 'बाळक्रीडा/बाळक्रीडी कालो', 'रातकालो', संकासुर/दशावतार कालो', या व्यतिरिक्त खांडोळा येथे 'कड्डातलो कालो', सावईवेऱ्यात 'सख्याहरि कालो वेगवेगळ्या नावाने 'कालो' संबोधिला जातो. असे 'कालो' या एकाच उत्सवाचे विविध नामप्रकार आढळतात.

गोमंतकात उपरोक्त लोकनाट्य प्रकाराला 'कालो' नावाने संबोधित असल्याने त्यातील 'कालो' या नामकरणाचे वेगवेगळे अर्थ सापडतात.

"श्रीकृष्णाने सवंगड्यांसह अनेक पदार्थ एकत्र कालवून खाल्ले. या पदार्थाला 'काला' असे नाव आहे. माणूस जर कलकलाट करीत बोलत असेल तर 'किते कालो करताले' या कोकणी वाक्प्रचारत 'कलकलाट' या अर्थाने काला आलेला आहे. तसेच 'कालो' म्हणजे सगळी रात जागवणे.

गोमंतकात 'कालो' उत्सव' हा एका दिवसाचा नसून तो दोन दिवसांचा असतो. पहिल्या दिवशी रात्री वर उल्लेखित वेगवेगळ्या नावाने संबोधित 'कालो', दुसऱ्या दिवशी पहाटे 'गोपाळकालो' आणि दुपारी 'गवळणकालो' असा हा 'कालोत्सव' आहे.

गोमंतकात रात्रीचा जो 'कालो' केला जातो, त्याच्या दोन प्रकारच्या सादरीकरण पध्दती आढळतात. एक बाळक्रीडी काल्याची हरिदासी पध्दत आणि दुसरी संकासुर किंवा दशावतारी काल्याची दशावतार पध्दत आहे.

गोमंतकीय गवळण काल्यात संगीत ठासून भरलेले आहे. बहुतांश भाग हा पद्यमय असून, नृत्य आविष्कृत होत असलेला हा काला वैशिष्ट्यपूर्ण आहे.

## ५.३.२ गवळणकाला

गोमंतकीय कालोत्सव परंपरेत स्थित असलेला ‘गवळणकाला’ हे लोकनाट्य महत्त्वपूर्ण आहे. प्रांतानुसार विधीवत परंपरेत फरक जरी असला, तरी गावच्या ग्रामदेवतेसमोर दरवर्षी गवळणकाला करणे याला देवकार्यात फार महत्त्व आहे.

प्रत्येक गावच्या परंपरेनुसार ठरलेल्या विशिष्ट एका तिथीला कालोत्सव होतो. भोम गावात सुद्धा अशाचप्रकारे कालोत्सव साजरा केला जातो. आदल्या दिवशी ‘काला’ आणि दुसऱ्या दिवशी दुपारी ‘गवळणकाला’ असा हा दोन दिवस कालोत्सव साकारला जातो. पौराणिक नाटकाने कालोत्सवाची सुरुवात होते, तर दुसऱ्या दिवशी श्रीकृष्णाच्या गवळणकाल्याने त्याची सांगता होते.

गवळणकाल्याच्या सादरीकरणात बहुतेक ठिकाणी समानता असली, तरी गावच्या विधी परंपरेत प्रांतानुसार बदल आढळतो. श्रीकृष्णाच्या बालजीवनावर आधारित असलेल्या गवळणकाल्याला ग्रामदेवकार्यात खूपच महत्त्व आहे.

गोमंतकात प्रचलित असणाऱ्या अनेक लोकनाट्यापैकी ‘गवळणकाला’ हे लोकनाट्य दिवसाउजेडी दुपारी केले जाते म्हणून त्याला ‘दिसकाला’ असेही संबोधले जाते. तसेच ‘गवळणकाला’ श्रीकृष्णाच्या बालजीवनावर आधारित असल्याने त्याला ‘बालकाला’ असेही म्हटले जातात. अशा ‘गवळणकाला’ या लोकनाट्य संदर्भात पूढील व्याख्या पाहता येतील.

१. “गवळणकाला म्हणजे कृष्ण कथा गायन, नृत्य आजची संगीतिका व समुहनृत्य म्हणजे गवळणकाला.
२. “लहानशा नाटकाचे स्वरूप असलेला हा काला संपूर्णपणे कृष्णलीलेवर आधारलेला असतो. कृष्ण, राधा, यशोदा, गोप-गोपी यांची वर्णने गवळणकाल्यात येतात.
३. “गवळणकाला कृष्ण लीलेवर आधारित असून, कृष्ण, राधा, गोपी, यशोदा, पेंट्या आणि कृष्णाचे मित्र सवंगडी यांच्या सहकार्याने हा काला सादर केला जातो.
४. “गवळणकाला हा कृष्ण राधा आणि गोपगवळणी यांच्या बालक्रीडांशी निगडीत आहे. राध आणि कृष्ण यांचे प्रेम गोपगवळणीशी बालकृष्णाच्या चाललेल्या खोड्या गवळणकाल्यात असतात.

वरील सर्व व्याख्यांचा परामर्श घेता असे जाणवते की, गवळणकाला यात श्रीकृष्णाचे बालजीवन चरित्र दर्शविले जाते. कथा कोणतीही असली तरी चालेल, पण त्यात श्रीकृष्णाचे बालजीवन, श्रीकृष्णाने गोप-गोपींची केलेली चेष्टा, मस्करी, पराक्रम, लहानपणीच्या रासलीला, हे दाखविणारे चरित्र म्हणजे 'गवळणकाला' होय.

या सर्व प्रकाराला लोकांची अफाट गर्दी होत असल्याने लोकांचे मनोरंजन व्हावे, यासाठी श्रीकृष्णाच्या बालरूपी लीलांचे वर्णन दाखवून, भगवंताचे दर्शन नाट्यातून लोकांना घडावे यातून गवळणकाला या लोकनाट्याची सुरुवात झालेली आढळते. रात्रीचा 'कालो' संपल्यानंतर दुसऱ्या दिवशी दुपारी 'गवळणकाला' करण्याची परंपरा आहे. ग्रामदेवतेच्या धार्मिक कार्याशी गवळणकाल्याला फार महत्त्व आहे.[iii]

गवळणकाल्यातून केवळ धार्मिक कृत्यच नव्हे तर सामाजिक बांधिलकीही त्यातून बांधली जाते. सर्व जातीचे लोक या काला उत्सवात सहभागी होत असतात. गवळणकाल्यात श्रीकृष्णाचे पात्र करणारी व्यक्ती कोणत्या जाती-धर्माची आहे हे न जुमानता त्या व्यक्तीला श्रीकृष्णाच्या रुपात पाहून सर्व लोक त्याला शरण जातात.

श्रीकृष्णाच्या पात्राकरवी फोडलेली दहीहंडी, त्याने खाल्लेले दही मोठ्या भक्ती भावनेने प्रसादाच्या रुपात लोक त्याचे सेवन करतात. तसेच श्रीकृष्णाचे पात्र केलेल्या व्यक्तीची मंदिरात नेऊन पूजा केली जाते. या ठिकाणी श्रीकृष्णाची भूमिका साकारणाऱ्या व्यक्तीच्या व्यक्तिगत जीवनाशी कसलाही संबंध नसतो, तिथे असते फक्त भक्ती आणि श्रध्दा.

समाजाला सुसंस्कृत करण्याचे कार्य श्रीकृष्णाकरवी केले जाते. भक्तीरसाच्या वातावरणातून सामाजिक बांधिलकी जोपासण्याचे काम गवळणकाल्यातून होताना आढळते.

## ५.४ भोम गावातील कालोत्सव

भोम गावातील कालोत्सव हा नेहमी एका विशिष्ट तिथीच्या दिवशी साजरा केला जातो. आदल्या दिवशी 'काला' आणि दुसऱ्या दिवशी दुपारी 'गवळणकाला' असा हा दोन दिवस कालोत्सव साकारला जातो.

पौराणिक नाटकाने कालोत्सवाची सुरुवात होते, तर दुसऱ्या दिवशी श्रीकृष्णाच्या गवळणकाल्याने त्याची सांगता होते.

भोम गावात एकूण सात वाडे आहेत. प्रत्येक वर्षी एका एका वाड्याला कालोत्सवाची जबाबदारी दिली जाते. त्याप्रमाणे त्या वाड्यातील लोकांनी काल्याच्या पहिल्या दिवशी रात्री पौराणिक नाटक करावयाचे असते. पण दुसऱ्या दिवशी मात्र गवळण काला हा छोट्या मुलानी एकत्र मिळून कराव्याचा असतो.

## ५.४.१ भोम गावातील कालोत्सवाचे स्वरूप

भोम गावात कालोत्सवाच्या दिवशी सातेरी देवीला दागदागिण्यांनी सजविले जातात. त्या दिवशी गावातील प्रत्येक सौभाग्यवती स्त्री सातेरी देवीच्या मंदिरात जाऊन ओटी भरतात. त्यानंतर रात्री १२ वाजून झाल्यानंतर सातेरी देवीच्या भाऊला म्हणजे नारायण देवाला नेण्यासाठी गावातील पुरोहीत आणि मोठा जल्मी नारायण देवाच्या मंदिरात जातात आणि त्यांना पालखीत बसवून सातेरी देवीच्या मंदिरात आणून मंदिराच्या मध्यभागी बसवितात.

असे मानले जाते की सातेरी देवी आणि नारायण देव एकामेकांना भेटतात आणि एकत्र बसून पहिल्या दिवशी नाटक बघतात. नाटक रात्री उशिरापर्यंत चालते. नंतर पहाटे ४.३० वाजता सातेरी देवीला रथात बसवून नारायण देवाच्या मंदिरात नेले जाते.

त्यानंतर दुसऱ्या दिवशी ३ किंवा ३.३० वाजता गौळणकाला सुरु होतो. हा काला छोटी मुले एकत्र येऊन करतात. हा गौळणकाला मुख्यतः नारायण देवासाठी सादर केला जातो. गौळण काला संपल्यावर दोल, ताशे वाजवून नारायण देवाची मूर्ती खाली उतरवली जाते व पालखीत बसवून पुन्हा त्यांना त्यांच्या मंदिरात नेले जाते.

त्यानंतर सातेरी देवीला रथात बसवून नाचत गाजत ढोल ताशे वाजवित मंदिरात आणले जाते. नाचत नाचता पहिल्यांदा येऊन ती महादेव देवाला भेट देते नंतर रथ पुढे आणला जातो. त्यानंतर सातेरी देवीला पालखित बसवून मंडपाच्या व्दारे मंदिरात नेले जाते. मग रात्री पुन्हा एक नाटक सादर केले जाते.

## ५.४.२ भोम गावातील लोकनाट्य ( गवळणकाला )

गौळणकाला हा श्रीकृष्णाच्या लीलेवर आधारलेला असतो. लहान असतात श्रीकृष्णाने केलेल्या बालक्रिडांचे दर्शन गौळणकाल्याच्या माध्यमाने केले जाते. नैतिक शिकवण त्याचबरोबर मनोरंजन हे गौळण काल्याचे उद्दिष्ट आहे.

कालोत्सवाच्या दुसऱ्या दिवशी गौळणकाला करणे हा देवकार्याचा एक भाग झालेला आहे. दुपारच्या वेळी गौळणकाला केला जातो. गावातील छोटी मुले एकत्र येतात आणि गौळणकाला सादर करतात.

भोम गावत संगीत हा गौळण काल्याचा मोठा बाज आहे. संगीतामुळे गौळणकाल्याला अधिक सौंदर्य। प्राप्त झालेले आहे. गौळण काल्याची सुरुवात ही सातेरी देवीची नांदी म्हणून केली जाते.

**जयतू जय श्री सातेरी माते, जोडूनी कर नमितो तुजला**

**चरणी देवा मानुनी, यश दे यश दे यश दे आम्हा ||**

**अज्ञान अपुल्या बालकांना, सुज्ञ करून देई ज्ञान,**

**आस अमुची पुरवूनिया, नमन तव पदी हे जय हे जय हे आम्हा ||**

ही नांदी शेकडो वर्षापासून चालत आलेली आहे. आणि गावकरी ती जतन करून ठेवलेली आहे. नांदी म्हटल्यानंतर गौळण काला सुरु होतो.

सर्वप्रथम जे दृश्य दाखविले जाते ते म्हणजे कृष्ण जन्म झाल्यानंतर गोकुळात सर्व गौळणी आनंदाने नाचत आहेत.

**दृश्य १**

सर्वप्रथम सगळ्या गौळणी येतात आणि नाचू लागता, तेव्हा सगळ्या गौळणी मिळून म्हणतात _

**गौळणी : ( गीत )   किती सांगू मी सांगू कुणाला**

**आज आनंदी आनंद झाला**

**अष्टमीच्या रात्री गं यमुनेच्या काठी गोकुळ अवतरले**

**चंद्रमाची सुर्यमाची नक्षत्र तस्यांनी जग हे लखलखले**

हे गाणे म्हणून सगळ्या गौळणी उत्साहाने उत्सव साजरी करतात.

**दृश्य २**

छोटा बालगोपाळ अंगणात बसलेला असतो. यशोदा हाका मारीत मारीत बाहेर येते.

**यशोदा : कृष्णा कृष्णा कुठं आहे रे बाळा.. लवकर ये.. कृष्णा**

तेव्हा यशोदा कृष्णाला अंगणात बसलेला आहे ती पाहते. आणि त्याच्या पुढे जाते. कृष्णाच्या तोंडाला माती लागलेली असते. ते पाहून ती त्याला विचारते_

**यशोदा : कृष्णा काय करतो ?? तुज्या तोंडाला माती का आहे? तू माती खाल्ली ?**

तेव्हा कृष्णा यशोदेला सांगतो की

**कृष्णा : नाही आई, मी माती खाली नाही**

यशोदेला खूप राग येतो व ती कृष्णाला मारायला जाते. तेव्हा कृष्णा धावून धावून गीत म्हणतो.

**कृष्णा : ( गीत ) आई मज मारु नको**

**नाही नाही मी खादली माती गं**

शेवटी यशोदा कृष्णाल पकडते आणि त्याच्यावर एक काठी मारते.

**यशोदा : खोटं बोलेल ? खोटं बोलेल?**

असे म्हणून ती कृष्णाला मारते. या दृश्याच्या माध्यमातून समाजाला नैतिक शिकवण देण्याचा प्रयान केलेला आहे. जर खोटे बोलले तर शिक्षा ही मिळतेच.या माध्यमातून मुलांवर संस्कार करण्याचे कार्य केले गेले आहे.

## ४.४.३ लोकनाट्यातील पात्रे

**१. कृष्ण**

कृष्ण हा देवकी आणि वसुदेव यांचा पुत्र असतो. पण यशोदा आणि नंदाच्या घरी त्याचे लालन-पालन झाले.

**२. राधा**

राधा ही कृष्णाची परमप्रिया असते. कृष्ण अगदी लहान असताना ज्या गोपिकांबरोबर खेळत असे त्यांपैकी एक राधा असते. राधेचे कृष्णावर मनापासून प्रेम असते.

**३. बलराम**

बलराम हा कृष्णाचा मोठा भाऊ असतो. बलराम हा खूप बलवान असतो. त्याचबरोबर त्याला खूप राग सुद्धा येतो.

**४. यशोदा**

यशोदा ही कृष्णाची आई असते. कृष्णावर ती अफाट प्रेम करीत असे. एकही क्षण जर कृष्णा तिच्या डोळ्यांसमोरून दूर गेला तर तिचा जीव कासाविस होत असे.

**५. पेंद्या**

पेंद्या हा कृष्णाचा प्रिय मित्र असतो. तो एका गवळ्याचा मुलगा असतो. नेहमी आपल्या गाईगुरांना घेऊन तो वनात चारायला जात असतो. पेंद्या कृष्णावर खूप प्रेम करीत असतो. जर त्याला कृष्ण कुठे दिसला नाही तर तो कावराबावरा होत असे.

**६. सुधामा**

सुधामा हा कृष्णाचा मित्र असतो. कृष्णाबरोबर गाईगुरांना फिरवायला त्यांच्यासोबत नेहमी तो जात असे.

**७. इतर सवंगडी, इतर गौळणी**

## ५.४.४ लोकनाट्यात वाजविली जाणारी वाद्ये

भोम गावामध्ये गवळणकाला हा संगिताचा बाज घेऊन रंगमंचावर सादर केला जातो. गवळकाला या लोकनाट्यात तीन प्रकारची पारंपरिक वाद्ये वाजविली जातात. पायपेटी, तबला आणि झांज.

### १. पायपेटी

पायपेटी ही पायाच्या सहाय्यान भाता मारून हाताने वाजविली जाते. पायाने भात्याद्वारे हवा भरून पितळी कंपन तयार करणाऱ्या (सूर) शिट्ट्यांच्या मार्फत सुरेल ध्वनी निर्माण होतो. या वाद्यात डावीकडील बाजूकडून सुरुवात केल्यास प्रथम २ व नंतर ३ असे काळ्या पट्ट्यांचे तीन समूह असतात. भारतीय संगीतात या बाजाच्या पेटीचा गायकाला साथ देण्यासाठी किंवा एकलवादनासाठी उपयोग होतो.

### २. तबला

तबला हे एक संगीतात वापरले जाणारे चामड्यापासून तयार केले जाणारे तालवाद्य आहे. तबला हे जोडी वाद्य आहे. तबला हे दोन भागांची असते. जो व्यक्ती काम करण्यास उजव्या हाताचा वापर करतो त्याच्या उजव्या हातास तबला व डाव्या हातास डग्गा असतो. तालवाद्यातील अतिशय प्रगत अथवा उन्नत बोल हे तबल्याचे प्रमुख वैशिष्ट्य आहे. तबलावादक हा तबलजी वा तबलिया म्हणून ओळखले जातात.

### ३. झांज

झांज हे वाद्य पितळ तांबे किंवा कांस्य या धातूपासून बनविले जाते. झांजेचे दोन समान भाग असतात. झांजेचे हे दोन्ही भाग तयार करुन त्या एका दोरीच्या दोन टोकांना बांधल्या जातात. जेव्हा या दोन चकत्यांचा एकमेकांवर विशिष्ट पद्धतीने आघात केला जातो तेव्हा नाद निर्माण होतो. जास्त प्रमाणात झांज हे वाद्य सहाय्यक वाद्य म्हणून वापरले जाते. लय दाखविण्यासाठी या वाद्याचा वापर केला जातो.

### ५.४.५ गवळणकाल्याचे सादरीकरण

भोम गावातील गवळणकाला या लोकनाट्याचे सादरीकरण हे कालोत्सवाच्या दुसऱ्या दिवशी दुपारच्या वेळी केले जाते. गवळणकाला हे लोकनाट्य सातेरी देवीच्या मंडपात सादर केले जाते. मंडपाच्या अखेरीस मोठ्ठे रंगमंच आहे. त्या रंगमंचाला दोन प्रवेश द्वार आहेत. या दोन्ही प्रवेश द्वारातून कलाकार प्रवेश करतात. रंगमंचाच्या पुढे प्रेक्षकवर्ग बसलेले असतात.

गवळणकाला या लोकनाट्याची सुरुवात नारायण देवाची आरती करून होते. आरती झाल्यानंतर लोकनाट्यातील प्रत्येक कलाकार रंगमंचावर येऊन सातेरी देवीची नांदी म्हणतात. नांदी संपल्यावर प्रत्यक्ष लोकनाट्याची सुरुवात होते. लोकनाट्यात श्रीकृष्णाचे बालजीवन दर्शविले जाते. त्याचबरोबर त्या दृश्याच्या माध्यमातून समाजाला नैतिक शिकवण देण्याचे कार्य केले जाते.

गवळणकाल्याच्या शेवटी जो कृष्णाचे पात्र करतो त्याच्या द्वारे मंडपाच्या मध्यभागी असलेली मडकी फोडली जाते नंतर तेथिल लोक प्रसाद म्हणून त्या मडकीत असलेले पोहे, गुळ, आणि खाजे ग्रहण करतात.

## ५.५ समारोप

लोकनाट्य ही एक व्यापक आणि आदिम संकल्पना आहे. भोम गावात सुद्धा गवळणकाला हे लोकनाट्य आदिम काळापासून चालत आलेले आहे. छोट्या मुलांच्या द्वारे या लोकनाट्याचे सादरीकरण केले जाते. लोकनाट्याच्या द्वारे समाजाला नैतिक शिकवण देण्याचा प्रयत्न केला जातो.

## ५.६ निष्कर्ष

१. गोमंतकात कालोत्सव म्हणताना त्यात समाविष्ट असलेला रात्रीचा कालो, दुसऱ्या दिवशी पहाटेचा गोपाळकालो आणि दुपारच्या वेळी गवळणकालो अशी कालोत्सवाच्या संदर्भात एक साखळी आढळून येते.

२. गोमंतकीय गवळणकाला हा कृष्ण लीलेवर आधारित असून, कृष्ण, राधा, गोपी, यशोदा, पेंद्या आणि कृष्णाचे मित्र सवंगडी यांच्या सहकार्याने हा काला सादर केला जात असतो.

३. भोम गावातील जास्ततर लोकवाङ्मय हे कोंकणी भाषेत आहे पण गवळणकाला हे लोकनाट्य मात्र मराठी भाषेत सादर केले जाते कारण ह्या लोकनाट्यात मराठी नाट्य संहितेचा आधार घेतलेला असतो.

४. भोम गावातील गवळणकाला हा वेगवेगळया नाट्य संहितेचा आधार घेऊन सादर केला जातो. त्याचबरोबर मराठीत प्रचलित असलेल्या गौळणींचा देखिल वापर लोकनाट्यात केला जातो.

५. भोम गावातील लोकनाट्यातून अनेक प्रसंगाच्या माध्यमातून सामाजाला नैतिक शिकवण देण्याचा प्रयत्न केलेला आहे.

## संदर्भ

[i] १ व्यवहारे, डॉ. शरद. “ लोकवाङ्मय रुप-स्वरूप”. रजत प्रकाशन, औरंगाबाद, सप्टेंबर १९९१. पृ. क्र. १६८

[ii] २ खेडेकर, विनायक विष्णू. “लोकसरिता : गोमंतकीय जनजीवनाचा समग्र अभ्यास”. कला अकादमी गोवा, मार्च १९९३. पृ. क्र.२१७

[iii] ३ व्यवहारे, डॉ. शरद. “ लोकवाङ्मय रुप-स्वरूप”. रजत प्रकाशन, औरंगाबाद, सप्टेंबर १९९१. पृ. क्र. १९६

## श्रेयनामावली

१. संकिता नाईक, नागझर वाडा भोमा, वय : ४२, कलाकार

२. स्वप्निल नाईक, मधलावाड भोमा, वय : ३५, सामान्य नागरिक

३. बाबुसो गावडे, रंदेरवाडा भोमा, वय : ७५, मोठा जल्मी या घराण्यातील सदस्य

४. मोहनदास गावडे, वरचा वाडा भोमा, वय : ४७, मोठा जल्मी या घराण्यातील सदस्य

# प्रकरण ६

# भोम गावातील इतर संकीर्ण वाङ्मय

# प्रकरण ६

# भोम गावातील इतर संकीर्ण वाङ्मय


६.१ प्रस्तावना ........................................ ७९

६.२ उखाणा ........................................ ७९

६.२.१ उखाण्याची वैशिष्ट्ये ........................................ ८०

६.२.२ उखाण्याचे प्रकार ........................................ ८०

६.२.३ भाषिक अभ्यास ........................................ ८३

६.३ म्हणी ........................................ ८४

६.३.१ म्हणींची वैशिष्ट्ये ........................................ ८४

६.३.२ आशयनिष्ठ अभ्यास ........................................ ८५

६.४ वाक्प्रचार ........................................ ८७

६.४.१ आशयनिष्ठ अभ्यास ........................................ ८८

६.४.२ भाषिक अभ्यास ........................................ ९०

६.५ समारोप ........................................ ९०

६.६ निष्कर्ष ........................................ ९१

संदर्भ ........................................ ९१

# प्रकरण ६

## भोम गावातील इतर संकीर्ण वाङ्मय

### ६.१ प्रस्तावना

लोकसाहित्यातील मौल्यवान आणि समृद्ध अशी परंपरा लोकोक्तीला लाभलेली आहेत. समाजातील लोकांच्या भाव-भावना, राग-लोभ, चांगले-वाईट यांचे वर्णन अतिशय कमी शब्दात पण चटकदार शब्दांत वर्णन म्हणी आणि वाक्प्रचार यांच्या द्वारे केले जाते. त्याचबरोबर उखाण्याच्या माध्यमातून मनोरंजन करून, बुद्धीला आवाहन देऊन व ज्ञानात भर घालून उखाणी घातली जातात.

लोकसाहित्यात उखाणी, म्हणी आणि वाक्प्रचार यांचे महत्त्वपूर्ण स्थान आहे कारण त्यातून रुढी-परंपरा, समाजाच्या भावभावना, आचार-विचार, मनोरंजन आदीचे सतत दर्शन घडत असते.

### ६.२ उखाणा

उखाणे म्हणजे एकप्रकारचे बौद्धिक कोडे होय. प्राचिन काळापासून कोड्यांची परंपरा ही अस्तित्वात आहे. मनोरंजन करणे, बुद्धीला आवाहन करणे, त्याचबरोबर ज्ञानात भर घालणे असे अनेक उद्देश या कोड्यांच्या मागे आहेत.[i]

प्रश्नोत्तर या प्रकारचे कोड्यांचे स्वरूप असते. प्रश्नाच्या स्वरूपात कोडे विचारले जाते. व त्याच्याच मागे उत्तर दडलेले असते. अगदी काव्यमय पद्धतीचे कोड्यांचे स्वरूप असते. धार्मिक, सामाजिक, सांस्कृतिक किंवा व्यावहारिक संदर्क घेऊन कोडे तयार केले जाते त्याचबरोबर वाङ्मयीन सौंदर्याने सुद्धा कोड्याला नटवले जाते.

उखाणे घालण्याची किंवा घेण्याची परंपरा फार प्राचीन आहे. उखाणा कधी भव्य दिव्य विचार बोलून दाखवितो तर कधी थट्टा-मस्करी करतो तर कधी ऐकणाऱ्या व्यक्तीला कोड्यात टाकतो.

## ६.२.१ उखाण्याची वैशिष्ट्ये

१. गोपन हा उखाण्यांचा प्राण आहे.[ii]

२. उखाण्यामागे दीर्घ परंपरा आहे.[iii]

३. ज्ञान आणि मनोरंजन हेच उखाण्याचे उद्देश आहेत.[iv]

४. उखाणे बुद्धीला आणि विचाराला चालना देणारे असतात.

५. मोजक्या व सोप्या शब्दांत उखाण्याची रचना असते पण त्यामागे मोठा विचार, रहस्य दळलेले असते.

## ६.२.२ उखाण्याचे प्रकार

उखाणा हा गद्य-पद्य मिश्रीत असा प्रकार आहे. त्याची घडण सुबक व नेटकी असते. रचना सहज सोपी व उत्स्फूर्त अशी असते. उखाण्याला कोडी या नावाने सुद्धा ओळखले जाते. नाव घेण्याचे उखाणे, खेळातील उखाणे, मनोरंजनात्मक उखाणे असे सामान्यतः प्रकार आढळतात.

## ६.२.२.१ नाव घेण्याची उखाणी

ग्रामीण भागातील स्त्रियांमध्ये लांबलचक उखाणे घेण्याची प्रथा आहे. भोम गावात सुद्धा लग्न झाल्यानंतर जेव्हा नववधू घरामध्ये प्रवेश करते तेव्हा तिने नाव घेतले पाहिजे ही प्रथा आहे. तेव्हा नववधू नवऱ्याचे नाव म्हणजे उखाणा घेते, त्यात एक लयबद्धता, नादमयता असते त्याची रचना वैशिष्ट्यपूर्ण असते. उखाण्यामधून पती, सासर-माहेर, सासू-सासरे, दीर, नणंदा जावा यांचाही उल्लेख आढळतो.

नावाची उखाणे ही दोन्ही म्हणजे वधूही घेते आणि वरही घेतो. यातील समृद्ध भाग स्त्रियांच्या उखाण्यांचा आहे. यातून स्त्रियांची काव्यशक्ती, रसिकता दिसून येते. ही नावे ऐकण्यासाठी बाल, तरुण, वृद्ध इतर सर्व मंडळी जमतात. विविधता, नावीन्यता, त्यात असून स्त्रियांची रसिकता, लयबद्धता, चमत्कृती अशी वाक्यरचना उखाण्यातून पहायला मिळते.

**खाण तशी माती**

**(सुरज) माझे पती**

**आणि मी त्यांची सौभ्याग्यवती**

अर्थपूर्ण शब्दरचना हे या उखाण्याचे वैशिष्टय आहे.

**धाड्यार पिकतां उकडें भात**

**(विष्णू) चो वागड आसू सातूय जन्मान**

उपरोक्त फुगडीमधून शेतीचा उल्लेख आलेला आहे. भोम गावात शेती हा मूळ व्यवसाय आहे. भोम गावात दोन प्रकारची शेती आढळते. वायङण आणि सरदार. वायङण हे दोन्ही गर्मीच्या दिवसात आणि पावसात दिवसात शेती करायचे. पण सरदार हे फक्त पावसाच्या दिवसांनीच शेती केली जाते.

पूर्वी सरदार ही शेती जास्त प्रमाणात करायची. पण काळाच्या ओघात आता ती कमी होत चाललेली आहे. धाड्यार फक्त उकड्या भाताची शेती करायची. ह्या उखाण्यातून ते संदर्भ सापडतात.

भोम गावातील शेतकऱ्यांचे वृक्षांवर जीवापाड प्रेम असते. म्हणून सानिध्यात येणाऱ्या छाया, फळे, लाकूड देणाऱ्या वृक्षांचा उल्लेख उखाण्यातून केला जातो.

**पिपळाच्या झाडार, बसला पक्षी**

**(सुर्या) नाव घेता, देवाक दवरून साक्षी**

नाव घेण्याच्या उखाण्याच्या प्रकारात पुरुषांचेही उखाणे वैशिष्ट्यपूर्ण तसेच कल्पनेने नटलेले आहेत. पत्नीचे नाव घेण्यासाठी क्वचित प्रसंगी पुरुषही उखाण्यांचा वापर करताना दिसून येतो.

**फुलान फुल जायेचे**

**(सुप्रिया) माजें मोगाचें**

पुरुषांची उखाणी ही जास्त लांबलचक असत नाही. साध्या सोप्या आणि सुटसुटीत प्रकारे पुरुष उखाणे घेतात.

### ६.२.२.२ खेळातील उखाणी

काही उखाणी अशीही आहेत ज्यात गोपनीयता जास्त प्रमाणात असते आशय वरवर व्यक्त केलेला असतो. त्या आधारे गोपन ओळखावयाचे असते. अशाप्रकारची उखाणी दिसायला साधी असली तरी बुद्धीला चालना देणारी असते.

प्रश्नविरहीत उखाणा कोड्यासारखाच असतो पण त्याची साधी, सोपी, सुटसुटीत आणि ठसकेबाज असते. त्याचे स्वरूप गद्य किंवा पद्यात्मक असून ताल, लय, नाद, आणि यमक जोडून उखाण्यांची रचना केली जाते. या उखाण्यात एकजण उखाणा सांगतो तर दुसरा या उखण्याचे उत्तर देतो. मनोरंजन आणि ज्ञान हेच या उखाण्यांचा उद्देश असतो.

**एक दादलों भायर उभों आसा,**

**तेन्नाच पावस पडतां पूण तेजें केस मात्तूय भिजना.. किदयाक ?**

ह्याचे उत्तर, **कारण त्याला केस नसतात.** अशा प्रकारे थट्टा मस्करी करून कोडी म्हणजे उखाणी घातली जातात.

काही उखाण्यांची रचना प्रतिमा वापरून केलेली असते. उदाहरणार्थ__

**बत्तीस चिऱ्यामधी एक नागीण नाचता**

उपरोक्त कोड्याचे उत्तर **जीभ आणि दात** आहे. बत्तीस चिऱ्यामधी म्हणजे बत्तीस दातामध्ये, नागीण म्हणजे जीभ. जीभ नागीणप्रमाणे दातामध्ये नाचत असते असा याचा अर्थ आहे. जीभेला नागीणीची आणि दाताला चिऱ्यांची उपमा दिलेली आहेत.

## ६.२.३ भाषिक अभ्यास

भोम गावात उखाणी ही मराठी आणि कोंकणी या दोन्हीं भाषेचा आधार घेऊन घेतली किंवा घातली जातात. उखाणी ही कलात्मक पद्धतीने घेतली जातात. यमक जुळविण्याचा प्रयत्न उखाण्यामध्ये केला जातो.

त्याचबरोबर खेळण्यासाठी जी उखाणी घातली जातात ज्यांना कोडी असेही म्हटले जाते त्यातून उपमांचा जास्त प्रमाणात वापर केला जातो. त्याचप्रमाणे नाद, लय, ताल आणि यमक यांच्याकडेही जास्त लक्ष दिले जाते. उदाहरणार्थ__

**आराटून ताराटून बानलों भरों**

**माजे कोण ऊमाणे सांगता तिंका कट्टीभर सरों**

या उखाण्यातून यमकाचा वापर केलेला दिसून येतो. भरों आणि सरों हे शब्द शेवटी यमकाच्या सहाय्याने जुळविलेले आहेत ज्याच्यामुळे लय, नाद आणि ताल निर्माण झालेला आहे.

काही उखाण्यातून व्यवसायाचे रूप सुद्धा दिसून येते. उदाहरणार्थ__

**धाड्यार पिकतां उकडें भात**

**(विष्णू) चो वागड आसू सातूय जन्मान**

या उखाण्यातून भोम गावातील शेतीचा उल्लेख आलेला आहे. त्याचबरोबर स्त्रीचे आपल्या पतिप्रती असलेले निर्मय प्रेम-भाव व्यक्त होताना दिसून येते.

## ६.३ म्हणी

म्हणी म्हणजे समाजाचा आरसा होय. म्हणी ह्या मोठ्या किंवा लांबलचक असत नाही तर त्या मोजक्या शब्दात व सुटसुटीत असतात. म्हणींच्या द्वारे समापाला शिकवण देण्याचे कार्य केले जाते. म्हणी ह्या सुटसुटीत असल्या तरीही त्यामध्ये मोठा अर्थ दडलेला असतो.

'म्हण' हा शब्द 'भग' (बोलणे) या धातूपासून आला आहे. आभाणक म्हणजे 'म्हण', 'म्हणणे' या क्रियेवरून 'म्हण' हा शब्द बनला असून लोकांनी वारंवार म्हटलेले वचन किंवा वाक्य असा याचा अर्थ. 'म्हणी' या अनेकवचनी शब्दाचे एकवचन 'म्हण' असे असून हा 'म्हण' शब्द संस्कृत धातू 'भण' म्हणजे बोलणे यापासून अपभ्रष्ट होऊन बनला आहे. जे वाक्य किंवा वचन वारंवार म्हणण्यात येते ती 'म्हण' होय.'

**दुर्गा भागवत** यांच्या मते "म्हण म्हणजे जनतेने आत्मसात केलेली उक्ती, मग तिचे मूळ साहित्यिक असो की लौकिक."[v]

**वि. का. भिडे** यांच्या मते "म्हणीत ज्ञान किंवा बोध, अल्प शब्दात्मकता, चटकदारपणा आणि जनसंमती पाहिजे."[vi]

**श्री. वा. गो. आपटे** लिहितात, "लघुता, व्यावहारिकता, चटकदारपणा आणि लोकमान्यता दे चार गुण म्हणीमध्ये असणे आवश्यक आहे."[vii]

या सर्व व्याख्यांचा परामर्श घेतला

## ६.३.१ म्हणींची वैशिष्ट्ये

१. म्हणी आकाराने जरी छोट्या असल्या तरी त्यातून रुढ होणारा आशय फार मोठा असतो.
२. म्हणींमुळे लोकांच्या मनावर नैतिक संस्कार होतात.
३. म्हणींचा संबंध संस्कृती, निसर्ग, आचरण, नैतिकता या गोष्टींशी असतो.
४. सत्यता आणि नवनवीनता ही म्हणींची महत्त्वाची वैशिष्ट्ये आहेत.
५. थेट मनाला भिडणारे सामर्थ्य हे म्हणींचे विशेष आहे.

## ६.३.२ आशयनिष्ठ अभ्यास

**आयज म्हाका, फाल्या तुका**

जगात कोणताही माणूस परिपूर्ण नसतो. एखादा माणूस कितीही सामर्थ्यवान असला तरी काहीतरी त्रूटी असतेच. जीवनात त्यालाही कोणत्या ना कोणत्या अडचणींना सामोरे जावे लागतेच. माणूस अडचणीत सापडल्यावर जवळच्या माणसांकडून मदतीची अपेक्षा असते. त्यावेळी जर त्याने मदत केली तर भविष्यात त्याची परतफेड होऊ शकते. जेव्हा त्यांना मदत हवी असेल तर मदतीला धावून जाता येईल, हा साधा जीवनव्यवहार आहे.

आज जे सुखात आहेत ते उद्या दुःखात असू शकता. सुख-दुःख कुणालाच विचासन येत नाही. संकटांचा सामना करण्यासाठी जवळच्या माणसांची मदत घ्यावी लागते. पण जर त्यांची मदत मिळाली नाही किंवा त्यांनी मदत करायला नकार दिला तर वाईट वाटते. आपल्यावर संकटे येणार नाहीत असेही काहींना वाटते, तेव्हा त्यांना अचूक इशारा देण्यासाठी ह्या म्हणीचा वापर केला जातो.

**आपली फाट आपल्याक दिसनां**

माणसाला स्वतःच्या उणीवा, दोष कधीच दिसत नाहीत. आपण सर्वगुणसंपन्न आहोत, असा काही माणसांचा भ्रम असतो. स्वतःच्या चुकांवर ते पांघरुण घालतात आणि दुसऱ्यावर टिकां करतात. माणूस हा परिपूर्ण नसतोच, तो चुकू शकतो हे लक्षात घ्यायला हवे.

आपल्या वागण्याचे निरिक्षण समाज नकळतपणे करतो. स्वतःच्या उणीवांकडे डोळेझाक करणारी माणसे समाजात दिसतात तेव्हा टोमणा मारून ह्या म्हणीचा वापर केला जातो.

**हागां घर जयटां आनि थयं भात शिजयता**

कुणी संकटात सापडले तर काही माणसांना आसुरी आनंद होतो. कुणाचे वाईट झाले तरी चालेल पण आपला फायदा व्हावा ही स्वार्थी विचारसरणी समाजात आढळते.

एखाद्याचे घर जळणे, त्याचे सारे कुटुंब रस्त्यावर येणे हे वाईट आहे. त्यांना मदतीला हात देण्याऐवजी काही माणसे आपला स्वार्थ साधतात. कुणाच्या दुःखाचे त्यांना काही वाटत नाही. समाजात अशा घृणास्पद विचारसरणीची माणसे पहायला मिळतात तेव्हा ही उपहासगर्भ म्हण वापरली जाते.

### आवय तशीं भुरगीं

कुटुंब व्यवस्थेत स्त्रीची भूमिका ही अधिक महत्त्वाची असते. मुलगी सासरी येताना माहेरहून संस्काराची शिदोरी घेऊन येते. आई- वडिलांनी केलेल्या चांगल्या संस्कारांचे दर्शन तिच्या वागण्याबोलण्यातून दिसते.

घराचे घरपण, सासर-माहेरचा स्नेहभाव जपण्याची जबाबदारी स्त्रीची असते. काही स्त्रीयां कुटुंब जोडण्याऐवजी कुटुंब फोडण्याचे काम करतात. तेव्हा मुलगी आईच्या वळणावर गेली असे म्हटले जाते तेव्हा टोमणा मारून ही म्हण वापरली जाते.

### तेणीं शेण  खाल्यार तू बिन शेण खातलों ?

कोणत्याही माणसाकडून कळत-नकळत एखादी वाईट गोष्ट घडण्याची शक्यता असते. एखाद्या माणसाने वाईट काम केले तर दुसरा त्याचे अनुकरण करून त्यात आणखी भर घालतो. अशी कृती आगीत तेल ओतण्यासारखी असते.

अशा वागण्याने माणसाले मोठे नुकसान होते. जशास तसे वागणे हे सगळीकडे उपयुक्त ठरत नाही. माणसाने प्रसंगानुरूप चांगले वागायला हवे, हा भाव ह्या म्हणीतून व्यक्त होतो.

### दुकानान गिरायक आनि मनशाचें मरण हे केन्नाच सांगून येयनां

ग्राहकाला राजा असे म्हटले जाते. त्याला कसलेही बंधन नसते, त्याला केव्हाही येण्याचे, कोणत्याही दुकानात जाण्याचे स्वातंत्र असते. दुकानदाराला सतत ग्राहकाची प्रतीक्षा करावी लागते.

मृत्यू हा कधीही कुणालाच सांगून येत नाही, तो कधी येईल याचाही भरवसा नसतो. मृत्यूविषयी निश्चितपणे सांगता येते नाही. तेव्हा माणसाला समजविण्यासाठी ह्या म्हणीचा वापर केला जातो.

**नाकां पूण खायनं दिसतां**

माणसाच्या जेवणाच्या वेगवेगळया सवयी असतात. काहील्या आवडी-निवडी घरातल्यां माणसांपेक्षा वेगळया असतात. काही शांत मनाने, आवडीने खातात व समाधानाने तृप्त होतात तर काही माणसे नाक मुरडत खातात.

काही माणसे जगण्यासाठी खातात तर काही खाण्यासाठी जगतात. काही माणसे पोटात जागा नसली तरी जिभेला समाधान होत नाही म्हणून खातात. अन्न किती खावे, कसे खावे हे त्यांना कळत नाही. तेव्हा उपहासाने ही म्हण वापरली जाते.

## ६.४ वाक्प्रचार

वाक्प्रचाराची निर्मिती अत्यंत सहजपणे लोकजीवनातून होत असते. लोकजीवनातील प्रदीर्घ अनुभवाची परंपरा आपल्याला वाक्प्रचारांच्या मागे दिसते.

वाक्प्रचार हे म्हणीं प्रमाणेच असतात. म्हणीपेक्षा वाक्प्रचारात मोजक्या व कमी शब्दांचा उपयोग केलेला असतो. 'वाक्' म्हणजे 'वाणी' आणि 'प्रचार' म्हणजे रूढी किंवा 'प्रघात'. त्यामुळे रूढीच्या लोकभाषेत रूळलेल्या भाषिक प्रयोगाला 'वाक्प्रचार' असे म्हणतात. एका विशिष्ट अर्थासाठी विशिष्ट शब्दांची जी योजना असते तिला वाक्प्रचार असे म्हणतात.[viii]

थोडक्यात अनेक संदर्भीय अर्थ व्यक्त करणारा शब्दसमुदाय म्हणजे वाक्प्रचार असे म्हणता येईल. वाक्प्रचारातील शब्दांना मूळच्या अर्थापेक्षा वेगळा अर्थ लाभलेला असतो.

विशिष्ट अर्थाने रूढ झालेल्या शब्दसमूहाला 'वाक्प्रचार' असे म्हटले जाते. अर्थातच या अर्थाला लोकमान्यता असते, उच्चारण करणाऱ्याला व ऐकणाऱ्याला तो अर्थ ज्ञात असतो. त्यामुळे वाक्प्रचाराचे संदर्भ चटकन लक्षात येतात.

विशिष्ट अर्थाने लोकजीवनात रूढ झालेल्या शब्दसमूहांना वाक्प्रचार असे म्हटले जाते. लोकांना ज्ञात असलेल्या माहितीतून लोकांच्या अनुभवातून हे वाक्प्रचार स्वाभाविकपणे निर्माण होतात.

लोकांच्या मान्यतेतून ते लोकजीवनात प्रचलित राहतात. त्यांच्या वापरातून मोजक्या शब्दात समर्पक विचार, भाव व कल्पना व्यक्त केल्या जातात. वाक्प्रचाराच्या निर्मितीत आणि प्रचलनात लोकस्मृती महत्त्वाची भूमिका बजावते.

वाक्प्रचार केव्हा आणि कसे निर्माण झाले याबद्दल ठामपणे सांगता येत नसले तरी त्याची परंपरा प्राचीन असून ते अनुभवातून निर्माण झाले आहेत.

## ६.४.१ आशयनिष्ठ अभ्यास

**नंदीबैल - अक्कल नसलेला**

नंदीबैल हा वाक्प्रचार तोमणे मारून म्हटला जातो. ज्याप्रमाणे नंदीबैल कोणत्याही प्रसंगी मान हालवतो त्याचप्रमाणे कोणत्याही प्रसंगी जो माणूस विचार केल्याशिवाय आपली मान हलवत असतो, त्याला नंदीबैल म्हटले जातात.

**रातीचों दिस केलों - खूप काम करणे**

ज्या पर्यंत जीव थकत नाही तोपर्यंत जे काम करतात तेव्हा त्यांना म्हटलें जाते की त्यांनी रात्रीचा दिवस केलेला नाही. भोम गावात ह्या वाक्प्रचाराचा जास्त वापर केला जातो. शेती हा मूळ व्यवसाय असल्या कारणाने तेथील लोक खूप परिश्रमी आहे. दिवसभर काम कष्ट करून श्रम करून माणूस जगतो. हे या वाक्प्रचारातून संबोधले जाते.

**बुधवंत**

हा वाक्प्रचार त्या माणसाला उद्देशून म्हटला जातो जो स्वतःला खूप हुशार समजतो. जो माणूस कुणालाही काही न विचारता स्वतः काम करतो आणि नंतर संकटात पडतो, कुणाचाही सल्ला न घेता स्वतःच पुढे सरून स्वतःला हुशार मानून कोणतेही काम करतो त्याला टोमणे मारून हा वाक्प्रचार वापरला जातो.

**छत्तीसाचों आकडों**

छत्तीसाचा आकडा म्हणजे एकामेकांचे शत्रू असा अर्थ आहे. संख्यादर्शक हे वाक्प्रचार असून तीन आणि सहा हे अंक ज्याप्रमाणे एकमेकांना बघत नाही त्याचप्रमाणे दोन माणूस जेव्हा एक मिनिट सुद्धा बघू शकत नाही, एकामेकांची उपस्थितीही ज्यांना नकोशी असते त्यांना बघून छत्तीसाचा आकडा हा वाक्प्रचार संबोधला जातो.

**बडायों मारता**

बड़ाया मारणे याचा अर्थ म्हणजे स्वतःकडे नसलेल्या गोष्टींची स्तुती करणे. समाजात अशीही काही माणसे असतात ज्यांच्याकडे काहीही नसते पण आपल्याकडे सगळे आहे असा ताव मारून मोठेपणाने सांगतात.

**गुड्याक मारप**

गुड्ड्याक मारप याचा अर्थ असा आहे की एखादी वस्तू जागेवर न ठेवता अस्तव्यस्त करून दुसरीचकडे ठेवणे. आजच्या काळात  ह्या प्रकारचा स्वभाव युवकांमध्ये जास्त प्रमाणात आढळताना दिसून येतो.

आजच्या युगात युवक आपल्याच कामात गुंग असतात त्यामुळे दुसऱ्या कोणत्याही कामाकडे त्यांचे लक्ष लागत नाही. जर कोणतेही काम त्यांना सांगितले तर ओभड धोबण पणाने काम केले जाते.

**कानाक पिळ घातली**

हा वाक्प्रचार माणूस तेव्हा वापरतो जेव्हा त्याला कोणताही निश्चय करावयाचा असतो. जर कोणी त्याचा विश्वास घात केला तर तेव्हा समजते आता आपण ते काम करू नये त्यासाठी ठाम निश्चय केला जातो तेव्हा ह्या म्हणीचा वापर सहपणे केला जातो.

**पोटान कावळे रडता**

ह्या वाक्प्रचाराचा अर्थ म्हणजे भूख लागणे. ह्या वाक्प्रचाराचा वापर माणूस तेव्हा करतो जेव्हा त्याला खूप भूख लागते. एकही क्षण जर तो जेवल्या शिवाय थांबला तर त्याला काही तरी होणार, त्याच्याकडे भुख सहन होत नाही तेव्हा ह्या वाक्प्रचाराला वापर केला जातो.

कधी कधी पोटान कावळे रडता याच्याऐवजी पोटान उंदिर थावता असेही म्हटले जाते.

## ६.४.२ भाषिक अभ्यास

भोम गावातील वाक्प्रचार हे जास्ततर कोकणी भाषेत आहेत. वाक्प्रचार हे छोटे असतात. एका शब्दात किंवा चार पाच शब्दात वाक्प्रचाराची रचना केली जाते.

वाक्प्रचार हे सरळ सोपे नसता उपमांचा वापर जास्त प्रमाणात केला जातो. उदाहरणार्थ__ बुधवंत, नंदीबैल

संख्येचा वापर करून सुद्धा वाक्प्रचार तयार केलेले आहेत. उदाहरणार्थ__ छत्तीसाचों आकडों

## ६.५ समारोप

समाजातील लोकजीवनात येणाऱ्या घटणांच्या आधारावर म्हणी, वाक्प्रचार आणि उखाण्यांचा उगम झालेला दिसून येतो. लोकवाङ्मयात म्हणी, वाक्प्रचार, उखाणे यांचे दालन फार समृद्ध आहे. दैनंदिन जीवनात समाजातील लोक वरील वाक्प्रचार, म्हणी, उखाणे यांचा सहज वापर करताना दिसून येतात.

उखाणी, म्हणी आणि वाक्प्रचार यांना प्राचीन परंपरा लाभलेली आहेत. नादमयता, विनोद, इत्यादी ह्यामध्ये आढळतात. उखाण्याचा संबंध हा बौध्दिकतेशी असतो तर म्हणी आणि वाक्प्रचार यांचा संबंध मानसिकतेशी असतो.

## ६.६ निष्कर्ष

१. म्हणी आणि वाक्प्रचार हे आकाराने जरी छोटे असले तरी ती आशयसंपन्न असते.
२. उखाणा, म्हणी आणि वाक्प्रचार यांना लोकजीवनातील संदर्भ लाभलेले आहेत.
३. लोकसाहित्यात उखाणी, म्हणी आणि वाक्प्रचार यांचे महत्त्वपूर्ण स्थान आहे कारण त्यातून रुढी-परंपरा, समाजाच्या भावभावना, आचार-विचार, मनोरंजन आदीचे दर्शन घडते.
४. उखाण्यांची रचना मोजक्या व सोप्या शब्दात असतात त्याचबरोबर काही उखाणी दीर्घ असतात. त्यामागे मोठा विचार व रहस्य दडलेला असतो, त्याच्यामुळे विचाराला, बुद्धीला चालना मिळते.
५. म्हणी, वाक्प्रचार आणि उखाणे यातून भोम गावातील व्यवसायाने दर्शन घडून येते.

## संदर्भ

---

[i] १. कालभूत, डॉ. पुरुषोत्तम. “लोकसाहित्य स्वरूप आणि विवेचन”. विजय प्रकाशन, १० जानेवारी २००७.पृ. क्र. २४२

[ii] २. कालभूत, डॉ. पुरुषोत्तम. “लोकसाहित्य स्वरूप आणि विवेचन”. विजय प्रकाशन, १० जानेवारी २००७.पृ. क्र. २६०

[iii] ३. व्यवहारे, डॉ. शरद. “ लोकवाङ्मय रुप-स्वरूप”. रजत प्रकाशन, औरंगाबाद, सप्टेंबर १९९१. पृ. क्र. २१९

[iv] ४. कालभूत, डॉ. पुरुषोत्तम. “लोकसाहित्य स्वरूप आणि विवेचन”. विजय प्रकाशन, १० जानेवारी २००७.पृ. क्र. २६०

[v] ५. कालभूत, डॉ. पुरुषोत्तम. "लोकसाहित्य स्वरूप आणि विवेचन". विजय प्रकाशन, १० जानेवारी २००७.पृ. क्र. २६४

[vi] ६. कालभूत, डॉ. पुरुषोत्तम. "लोकसाहित्य स्वरूप आणि विवेचन". विजय प्रकाशन, १० जानेवारी २००७.पृ. क्र. २६४

[vii] ७. कालभूत, डॉ. पुरुषोत्तम. "लोकसाहित्य स्वरूप आणि विवेचन". विजय प्रकाशन, १० जानेवारी २००७.पृ. क्र. २६४

[viii] ८. व्यवहारे, डॉ. शरद. " लोकवाङ्मय रुप-स्वरूप". रजत प्रकाशन, औरंगाबाद, सप्टेंबर १९९१. पृ. क्र. २३१

**श्रेयनामावली**

१. गमती गावडे, नागझर वाडा भोमा, वय : ७०, धाकट्या जल्मी या कुटुंबातील व्यक्ती
२. मिलण गावडे, नागझर वाडा भोमा, वय : ४८, मोठ्या जल्मी या कुटुंबातील व्यक्ती
३. शोभा भोमकर, गावठण वाडा भोमा, वय : ५०, धाकट्या जल्मी या कुटुंबातील व्यक्ती
४. प्रिती भोमकर, नागझर वाडा भोमा, वय : ३५, सामान्य नागरिक
५. सिंतिया गावडे, नागझर वाडा भोमा, वय : २१, धाकट्या जल्मी या कुटुंबातील व्यक्ती
६. मंदा नाईक, काळी माती भोमा, वय : ४६, सामान्य नागरिक
७. संकिता नाईक, नागझर वाडा भोमा, वय : ४२, कलाकार
८. यशोदा नाईक, गावठण वाडा भोमा, वय : ८०, सामान्य नागरिक

## समारोप

'भोम गावातील लोकवाङ्मयाचा अभ्यास' असा प्रबंधिकेचा विषय असून फोंडा तालुक्यातील 'भोम' गावाच्या लोकवाङ्मयाचा अभ्यास करण्याचा . लोकवाङ्मय हे मौखिक परंपरेतून पिढ्यान पिढया संक्रमित होत असते. त्याचा कर्ता हा अनामिक असतो आणि लोकवाङ्मयात काळानुसार परिवर्तन होत असते.

भोम फोंडा गावातील लोकवाङ्मयाचा अभ्यास या प्रबंधिकेच्याद्वारे केला गेलेला आहे. एकूण पाच प्रकरणाद्वारे याचा अभ्यास केलेला आहे.

पहिल्या प्रकरणात लोकसाहित्याचे स्वरूप, लोकसाहित्याची व्याप्ती, लोकसाहित्याचे महत्त्व, लोकसाहित्याची लक्षणे, इत्यादींचा अभ्यास करून लोकवाङ्मयाचे स्वरूप, व्याख्या, इत्यादींचा सुद्धा अभ्यास केलेला आहे.

दुसऱ्या प्रकरणात भोम गावातील एकूण लोकगीतांचा अभ्यास करून फुगडीगीते, धालोगीते, लग्नगीते, बालगीते अशी लोकगीतांची विभागणी करून त्या लोकगीतांचा आशयनिष्ठ अभ्यास आणि वाङ्मयीन अंगाने अभ्यास केलेला आहे.

तिसऱ्या प्रकरणात भोम गावातील लोककथांचा आशयनिष्ठ अभ्यास, सांस्कृतिक अभ्यास आणि सामाजिक अंगाने अभ्यास केलेला आहे.

चौथ्या प्रकरणात भोम गावातील गवळणकाला या लोकनाट्याचा सादरीकरणाच्या अंगाने अभ्यास केलेला आहे आणि पाचव्या प्रकरणात भोम गावातील म्हणी, उखाणे, वाक्प्रचार यांचा आशयनिष्ठ आणि सामाजिक अंगाने अभ्यास केलेला आहे.

## निष्कर्ष

१. भोम गावातील लोकसाहित्य हे आदि काळापासून एका पिढीकडून दुसऱ्या पिढीकडे संक्रमित होत आहे. त्यामुळे शब्दाची प्राचीन रुपे त्यात पहायला मिळतात.

२. भोम गावातील लोकवाङ्‌ग्यात असे काही शब्द आढळतात ज्यांचा दैनंदिन जीवनात वापर केला जात नाही. फक्त लोकगीतांच्या माध्यमातून त्या शब्दांचा वापर केला जातो. उदाहरणार्थ- आकुडली, नागुलकुडा.

काही माणसांना ह्या शब्दांचा अर्थ देखिल माहित नाही.

३. औद्योगिकरणामुळे लोकांच्या जीवनात मोठा प्रभाव पडलेला दिसून येतो. दैनंदिन जीवनात इंग्रजी भाषेचा जास्त प्रमाण वापर झाल्याने लोकवाङ्‌ग्यात आधुनिकतेचा परिणाम झालेला दिसून येतो. उदाहरणार्थ- लास्ट,

४. लोकगीतांतून साकार झालेल्या प्रतिमां वाङ्मयीन मूल्यांनी समृद्ध आहेत. संपन्न प्रतिमासृष्टी, कल्पनाशक्ति, चांगली शब्दयोजना, लालित्य, इत्यादी समर्पक असे गुण लोकगीतांतून आढळतात.

५. लोकगीते व लोकजीवन हे एकरूप असे वाटतात. त्यामुळे लोकांची जगण्याची पद्धती, लोकांचे आचार-विचार, लोकसंस्कृती इत्यादींचे प्रतिबिंब विविध प्रतिमांतून उमटताना दिसून येते.

६. स्त्रीजीवनाच्या विविध छटा लोकगीतांतून विविध प्रतिमांद्वारे आणि शब्दकळाद्वारे व्यक्त झालेल्या आहेत. चार भिंतीत राहून आपल्या कौटुंबिक विश्वात रमणारी स्त्री संवेदनशील आहे त्याचबरोबर सहनशील सुद्धा आहे. दैनंदिन जीवनातील घटना, त्यातून येणारे विविध अनुभव, लग्नासारखे विविध समारंभ, कौटुंबिक नाती-गोती यातच तिचे भावविश्व रमून गेलेले आहेत.

७. कोकणी भाषा ही भोम गावातील लोकांची मातृभाषा असल्याकारणाने जास्ततर लोकवाङ्‌ग्य हे कोकणी भाषेत आहे पण कोंकणी भाषा ही मराठी भाषेशी जवळ असल्याकारणाने मराठीचा वापर देखील लोकवाङ्मयात झालेला आढळून येतो.

८. भोम गावाच्या लोकवाङ्‌ग्यातून सांस्कृतिक इतिहासाची उकल होते. लोककथांतील दैवत कथांच्या माध्यमातून सांस्कृतिक इतिहासाची जाणिव होते.

९. लोककथांचा निर्माण हा मनोरंजनासाठी केलेला असतो पण मनोरंजनाचा आधार घेऊन लोककथांच्या द्वारे समाजाला नैतिक शिकवण देण्याचा प्रयत्न केलेला आहे.

१०.लहान मुले ही निरागस मनाची असतात. ज्याप्रमाणे कुंभार मातीच्या गोळयाला आकार देत असतो त्याचप्रमाणे लहान मुलांच्या मनाला, त्यांच्या बुद्धीला लोककथा आकार देण्याचे कार्य करतात. लोककथांच्या माध्यमातून बालमनांवर संस्काराचे बीज रुजविले जाते.

११.गोमंतकात कालोत्सव म्हणताना त्यात समाविष्ट असलेला रात्रीचा कालो, दुसऱ्या दिवशी पहाटेचा गोपाळकालो आणि दुपारच्या वेळी गवळणकालो अशी कालोत्सवाच्या संदर्भात एक साखळी आढळून येते.

१२.गोमंतकीय गवळणकाला हा कृष्ण लीलेवर आधारित असून, कृष्ण, राधा, गोपी, यशोदा, पेंद्या आणि कृष्णाचे मित्र सवंगडी यांच्या सहकार्याने हा काला सादर केला जातो.

१३.भोम गावातील जास्ततर लोकवाङ्मय हे कोंकणी भाषेत आहे पण गवळणकाला हे लोकनाट्य मात्र मराठी भाषेत सादर केले जाते कारण ह्या लोकनाट्यात मराठी नाट्य संहितेचा आधार घेतलेला असतो.

१४.भोम गावातील गवळणकाला हा वेगवेगळया नाट्य संहितेचा आधार घेऊन सादर केला जातो. त्याचबरोबर मराठीत प्रचलित असलेल्या गौळणींचा देखिल वापर लोकनाट्यात केला जातो.

१५.भोम गावातील लोकनाट्यातून अनेक प्रसंगाच्या माध्यमातून सामाजाला नैतिक शिकवण देण्याचा प्रयत्न केलेला आहे.

१६.म्हणी आणि वाक्प्रचार हे आकाराने जरी छोटे असले तरी ती आशयसंपन्न असते.

१७.उखाणा, म्हणी आणि वाक्प्रचार यांना लोकजीवनातील संदर्भ लाभलेले आहेत.

१८.लोकसाहित्यात उखाणी, म्हणी आणि वाक्प्रचार यांचे महत्त्वपूर्ण स्थान आहे कारण त्यातून रुढी-परंपरा, समाजाच्या भावभावना, आचार-विचार, मनोरंजन आदीचे दर्शन घडते.

१९.उखाण्यांची रचना मोजक्या व सोप्या शब्दात असतात त्याचबरोबर काही उखाणी दीर्घ असतात. त्यामागे मोठा विचार व रहस्य दडलेला असतो, त्याच्यामुळे विचाराला, बुद्धीला चालना मिळते.

२०.म्हणी, वाक्प्रचार आणि उखाणे यातून भोम गावातील व्यवसायाने दर्शन घडते.

## संदर्भग्रंथ


१. आखाडकर, विनायक विठ्ठल फडते. "लोककलानंद". विठ्ठल कला आणि सांस्कृतिक मंडळ आखाळा तिसवाडी-गोवा, १३ नोव्होंबर २०११

२. कानोळकर, डॉ. बाळकृष्णाजी. "गोमंतकीय साहित्यातील शोधस्थळे". गोमंतक मराठी अकादमी, मार्च २००८

३. कालभुत, डॉ. पु. मा. "लोकनाट्य उद्गम आणि विकास". विजय प्रकाशन, नागपूर, २७ नोव्हेंबर १९९७

४. कालभूत, डॉ. पुरुषोत्तम. "लोकसाहित्य स्वरूप आणि विवेचन". विजय प्रकाशन, १० जानेवारी २००७

५. खेडेकर, विनायक विष्णू. "गोवा लग्नाख्यान". पद्मगंधा प्रकाशन, पुणे, २८ सप्टेंबर २०१२

६. खेडेकर, विनायक विष्णू. "लोकसरिता : गोमंतकीय जनजीवनाचा समग्र अभ्यास". कला अकादमी गोवा, मार्च १९९३

७. ढेरे, रा. चिं."लोकसंस्कृतीचे उपासक". पद्मगंधा प्रकाशन, जानेवरी १९९६

८. भागवत, दुर्गा. "लोकसाहित्याचे स्वरूप", वरदा बुक्स, सेनापती बापट मार्ग, १९५४

९. भवाळकर, तारा. "लोकसाहित्याच्या अभ्यासदिशा". स्नेहवर्धन प्रकाशन, पुणे, २००९

१०.व्यवहारे, डॉ. शरद. " लोकवाङ्मय रुप-स्वरूप". रजत प्रकाशन, औरंगाबाद, सप्टेंबर १९९१

११.शेळके, डॉ. भास्कर. "संशोधन : स्वरुप आणि व्याप्ती". शब्दश्री प्रकाशन जुन्नर, २८ ऑगस्ट २०१३

१२.सहस्रबुद्धे, अनिल. "लोकसाहित्य संशोधन पध्दती" दस्ताने रा, १९९७.

# परिशिष्ट्ये

परिशिष्ट १ ........ ९८

गोव्याचा राजकीय नकाशा ........ ९८

परिशिष्ट २ ........ ९९

गोव्याचा प्रशासकीय नकाशा ........ ९९

परिशिष्ट ३ ........ १००

परिशिष्ट ४ ........ ११७

# परिशिष्ट १

## गोव्याचा राजकीय नकाशा

# परिशिष्ट २

## गोव्याचा प्रशासकीय नकाशा

# परिशिष्ट ३

## फुगडीगीते

१. जिण जिण जिणेच्यो पदी गे जिण जिण जिणेच्यो पदी

दिसभर मायेच्यों गाळी गे दिसभर मायेच्यों गाळी

दिसभर गाळी गे रातभर तळी

रातभर तळी गे मुठभर वाडी

राती हाव जेयले गो सुंगटाच्या कडयेनं

मायेन माका बड्यले गो उस्क्याच्या बड्येनं

सदाच गो धिंगशाणा माजी मायची गो धिंगशाणा

माज्या कडयेची शाणपणा

२. तांबडो तुवालों खानार वडयलों

तुवालों खय गेलों गो पिया तुवालों खय गेलों

भोमचें चेडें दिसता बरें

चेडवांचेर लायण्यों मारता गो पिया चेडवांचेर लायण्यों मारता

३. श्रीगणेशा म्हादेवा काय गवर जाता माहेरा काय गवर जाता माहेरा

जाता तैशी जाऊ दे कपळ भर टिळा तिला लावू दे

श्रीगणेशा म्हादेवा काय गवर जाता माहेरा काय गवर जाता माहेरा

जाता तैशी जाऊ दे हातभर चुडा तिला घालू दे

श्रीगणेशा म्हादेवा काय गवर जाता माहेरा काय गवर जाता माहेरा

जाता तैशी जाऊ दे पायातली पैजण तिला घालू दे

४. गणपती देवा करीन तुझी सेवा नवस करीन रे देवा नवरी करीन रे
कपळाचा कुंकू दे जन्म भर आणि काय मागेन रे देवा आणि काय मागेन रे
गणपती देवा करीन तुझी सेवा नवस करीन रे देवा नवरी करीन रे
गळयातले मंगळसूत्र दे जन्म भर आणि काय मागेन रे देवा आणि काय मागेन रे

५. दारातले तुळशी गे पान आन पान फुलसी गे पान आन पान फुलसी ॥
दोन दिवसाची आई तू माझी जन्माची सासू गं माझी जन्माची सासू गं ॥
दारातले तुळशी गे पान आन पान फुलसी गे पान आन पान फुलसी ॥
दोन दिवसाचा बाबा तू माझा जन्माचा ससूर माझा जन्माचा ससूर ॥
दारातले तुळशी गे पान आन पान फुलसी गे पान आन पान फुलसी ॥
दोन दिवसाची बहीण तू माझी जन्माची नडन माझी जन्माची नडन गं ॥
दारातले तुळशी गे पान आन पान फुलसी गे पान आन पान फुलसी ॥
दोन दिवसाचा भाऊ तू माझा जन्माचा देर माझा जन्माचा देर ॥

६. कृष्णा घालितो लोळण यशोदा आली ती धावून
काय रे बाळा मागतोस तुजला देते मी आणून
आई मला चंद्र दे आणून त्याचा मला चेंडू दे बनवून
असल कसलं मागणं बाळा जगाच्या वेगळं

७. बाजारातलों मसाला माव माजों पिवपाक बसतालों गो बाय गो पिवपाक बसतालों
बाजारातलें लवंग माय माजी सवंग झगडी करताली गो बाय गो झगडी करताली
दारातली कापशिण नडन माजी राक्षिण चाडियों करताली गो बाय गो चाडियों करताली
बाजारातलों चणों देर माजो शाणों चेडवांक भूलतालो गो बाय चेडवांक भूलतालों
गोड गोड साखर घो माजो भाङ्‍ सांगता ते आयकतालो गो बाय गो सांगता ते आयकतालो

८. शिरगावा बाहेर गावा एक फुलला नागुलकुडा एक फुलला नागुलकुडा
फुलला नागुलकुडा लईराई आईचा सातवनी लईराई आईचा सातवनी
लईराई माझे आई तू तय्येर न्हाऊ गेलीस तू तय्येर न्हाऊ गेलीस
ओल्याने आकुडली आई नेसली पितांबर आई नेसली पितांबर
नेसली पितांबर आईने लाविली आढविचिरी आईने लाविली आढविचिरी
लाविली आढविचिरी आईने भरीला हिरवा चुडा आईने भरीला हिरवा चुडा
भरीला हिरवा चुडा आईने माळिली मोगऱ्या फाती आईने माळिली मोगऱ्या फाती
माळिली मोगऱ्या फाती आई चालली उमखणातून आई चालली उमखणातून
चालली उमखणातून आई बैसली पालखीत आई बैसली पालखीत
बैसली पालखीत आई चालली मंदिरात आई चालली मंदिरात
चालली मंदिरात आई बैसली मकरात आई बैसली मकरात

९. अशी नेन्टली बाई सीता (२) सीता गेलीगे नयेच्या वाळार (२)

सीतेक मिळला धनुष्य बाण (२) सीतेन बाप्पाला साद केला (२)

साद वाऱ्याच्या दुल्लाने गेला (२) सीतेन दुसरा साद केला (२)

साद पाण्याच्या लाटाने गेला (२) सीतेन तिसरा साद केला (२)

साद बाप्पाच्या कानी गेला (२) बाप्पा गडबडी धाऊन आले (२)

धुये कसले संकष्ट आले (२) बाप्पा मिळला धनुष्य बाण (२)

धुये दवर गे तुळशीच्या पेडयेर (२) धुये उखलगे आखंडे बोटान (२)

धुये घाल गे नमस्कार (२)

**धालोगीते**

१०.आंब्या तुजो ताळों ताळो मोडूनी रथ घडविला

मल्लिकार्जुन देवाचा रथ घडविला

आंब्या तुजो ताळों ताळो मोडूनी रथ घडविला

सातेरी देवीचा रथ घडविला

११.कार्तिक महिना कार्तिक महिना, मालन पुनवे आनन जाला गे

जाला जाल्यार बरे जाले तुळशी जागो आमी बेणू गे

कार्तिक महिना कार्तिक महिना मालन पुनवे आनन जाला गे

जाला जाल्यार बरे जाले तुळशी खूट आमी लावू गे

कार्तिक महिना कार्तिक महिना मालन पुनवे आनन जाला गे

जाला जाल्यार बरे जाले तुळशी रोप आमी लाव गे

कार्तिक महिना कार्तिक महिना मालन पुनवे आनन जाला गे

जाला जाल्यार बरे जाले तुळशी हळद कुंकू आमी लावू गे

कार्तिक महिना कार्तिक महिना मालन पुनवे आनन जाला गे

जाला जाल्यार बरे जाले तुळशी ओटी आमी भरू गे

१२.दुडीचेर दुडी घेवून चल्या आमी साथ तीनशें गावच्यों नारी गे आमी खेळया गे मांडार वचून

चांदण्यात चांदणे पिट भर चांदणे चांदुल्या रातीच्यों राती गो बाई चांदुल्या रातीच्यों राती

या बाचेवर कोण देव निजला गे कृष्ण देव निजला राधा बाई घालता गे वारा गे बाई राधाबाई घालता गे वारा

राधा बाईच्या हातात किदे गे कृष्णाच्या गळयातल्यों माळो गें बाई कृष्णाच्या गळयात्ल्यों माळों

कृष्णाच्या गळयात्ल्यों माळों गे बाई फुलांचों वाटुल केलों गे बाई फुलांचों वाटुल केलों

## लग्नगीते

**१. मसालों भाजता :-**

सोनीयाची काय्ल गें रुपीयाची दवली

सांबार भाजीता लक्ष्मी माया

सोनीयाची काय्ल गें रुपीयाची दवली

सांबार भाजीता गे यजमान बाई

**२. लामण दिवों :-**

पाच वातियो दिवो गे पेटोन थेयला पाऱ्यार

वडलांच्या थाऱ्यार उजवाड घातला

पाच वातियों दिवो गे पेटोन थेयला तुळशी पेडियेर

वडलांच्या थाऱ्यार उजवाड घातला

**३. बायची पुजा :-**

रेशमाची दोरी गे तांब्यांची गे गोली

उदक काडता लक्ष्मी नारायणाची जोडी

पाच पानाचो  विडो गे गंदाचो गे तिळो

पयलों भौमान केलों गंगे मातेचो

पाच पानाचो  विडो गे गंदाचो गे तिळो

दुसरों भौमान केलों जाग्या देवाचों

पाच पानाचो  विडो गे गंदाचो गे तिळो

तिसरो भौमान केलों सातेरी मातेचों

पाच पानाचो  विडो गे गंदाचो गे तिळो

चौथों भौमान केलों सर्व देवांचों

**४. घाणों भरता :-**

घाणों भरीला गें खाणीये कुंभाचों

जाग्या देवाच्या नावान घाणों उल्लासलों वळीये पानार

योरें जाग्या देवा तू आपल्या माना

घाणों भरीला गें खाणीये कुंभाचों

म्हादेव देवाच्या नावान घाणों उल्लासलों वळीये येतें

घाणों भरीला गें खाणीये कुंभाचों

गणपती देवाच्या नावान घाणों उल्लासलों वळीये पानार

योरें गणपती देवा तू आपल्या माना

**५. हळद लावता :-**

पाऊस पडला मोतियांचा

कोम रुजला हळदीचा

एक पानी हळदूळी दोन पानी पावली

तीन पानी हळदूळी काय कुटीया गेली

तीन पानी हळदूळी काय कुटीया गेली

चार पानी हळदूळी पाच पानी पावली

सहा पानी हळदूळी काय पालीया गेली

सहा पानी हळदूळी काय पालीया गेली

सात पानी हळदूळी आठ पानी पावली

नऊ पानी हळदूळी काय मरीया गेली

नऊ पानी हळदूळी काय मरीया गेली

पाच पानी हळदूळी चडली उजव्या आडार

येता यजमानी कायती हळद काडी

येता करवली कायती हळद काडी

येता मामा कायती हळद काडी

येता मामी कायती हळद काडी

येता काकी कायती हळद काडी

येता आत्या कायती हळद काडी

पाच पानी हळदूळी देवली डाव्या आडार

येता यजमानी कायती हळदी उतरी

**६. दृष्ट काडता :-**

अरे लिंबा अरे अरे लिंबा

तू खर आशिल्लो कोण स्थळी

अरे हाव आशिल्लों बारां वरसां आनंद नगरी

आता आयलों बाळाच्या का मस्तकावरी

मस्तक कशें नितळ कम तशें निर्मळ

दिसें दिसें जाग्या देवा तुजे रऊळ स्थळ

दिसें दिसें जाग्या देवा तुजे रऊळ स्थळ

अरे अरे लिंबा अरे अरे लिंबा

तू खर आशिल्लो कोण स्थळी

हाव आशिल्लों बारां वरसां आनंद नगरी

आता आयलों बाळाच्या का खान्यावरी

खान तशें नितळ कम तरों निर्मळ

दिसें दिसें शांतादुर्गा देवी तुजे रऊळ स्थळ

दिसें दिसें शांतादुर्गा देवी तुजे रऊळ स्थळ

आता आयलों बाळाच्या का कमरावरी

कमर कशें नितळ कम तशें निर्मळ

दिसें दिसें सातेरी देवी तुजे रऊळ स्थळ

दिसें दिसें सातेरी देवी  तुजे रऊळ स्थळ

आता आयलों बाळाच्या का गुडग्यावरी

गुडगे कशें नितळ कम तशें निर्मळ

दिसें दिसें शांतादुर्गा देवी तुजे रऊळ स्थळ

दिसें दिसें शांतादुर्गा देवी तुजे रऊळ स्थळ

आता आयलों बाळाच्या का पाऊलावरी

मस्तक कशें नितळ कम तशें निर्मळ

दिसें दिसें शांतादुर्गा देवी तुजे रऊळ स्थळ

दिसें दिसें शांतादुर्गा देवी तुजे रऊळ स्थळ

लिंबू चालला वावता वेळे

लिंबाने कापडा दवरली आंब्याच्या ताळयेर

**७. नाणेंतर :-**

मळयातले मळशेणी मळयातले मळशेणी

पाटातले पाटपाणी पाटातले पाटपाणी

भावाची बहीण न्हाऊ घालता पाणी

बहीणीची करवली न्हाऊ घालता पाणी

करवंती आदी पंटी

गंगेचें गे पाणी गंगेचें गे पाणी

न्हाऊ घालता करवली बाई

न्हाऊ घालता करवली बाई

**८. माटवान पावतगीर :-**

रुक्मीण पावली माटवां दारी

माटवांच्या मरी रुक्मीण संतोष जाली

रुक्मीण पावली माटवां दारी

माटवांच्या मरी रुक्मीण संतोष जाली

**९. द्रिष्ट काडता :-**

राई म्हणता चेदा घरी

उभ्यो जाल्यों गोवरी

दाखय दिवली काय तप करी २

तपसे करयीता २

मन हौसे लाभली २

तेथे देऊ सुने पाशी २

सुने पाशी अरदरंग २

सावित्री मनहंसा २

दे लोण उतरीता लक्ष्मी नारायण २

लोन अशें उतरीता मिठाचे सागर २

दोनी हाती कांकण ओवर वलच्या सोडा

खायचे गे गे पान

कोकणचे गे मीठ

ही आई माऊली काय द्रीष्ट काडी

१०.बाशिंग सोडयताना :-

बास्काचे बाशिंग पडू २

आबोल्याचे पाच गणू २

ये बाशिंग सोडय रे गोवर्धन पाच दिसां २

**बालगीते**

१. अटक मटक चवळी चटक

चवळी जाली गोड गोड

जिबेला आला फोड फोड

फोड काही फुटेना

डॉक्टर मामा उटेना

डॉक्टर मामा उटला

जिबेचा फोड फुटला

२. आंगश्यों मांगश्यों

कितले बॉबे

कोणाकोणा दिलें

मम्मा दिलें

पप्पाक दिलें

उल्लेलें सगळें बिलून खालें

३. काणी यें काणियें कोतवा मातारीच्या नातवा

मातारी पडली उताणी उकलून धरले पुतानी

उमरें खणले जावयानी पेज लावली सुनानी नागोन येलें धुवानीं

४. एक होता भोपळा आकाराने वाटोळा

त्यात बसली म्हातारी म्हातारी गेली लेकीकडे

लेकीने केले लाडू लाडू जाले घट घट

मातारी झाली लटलट

५. चानी चानी मामा भोभो दी

राव माज्या पुतानों भाजोनी

६. बी बाये बी तमतची बी

माका नाका तुका नाका

दिदिक वरून दी

७. पोदेर पोदेर पाव पाव

दुकरा फाटल्यान धाव धाव

धुकर पडलों ओंकण्यान

तेकां बडयलें तोडक्यान

## उखाणी

१. खाण तशी माती

(रमेश) माझे पती

आणि मी त्यांची सौभ्याग्यवती

२. धाड्यार पिकतां उकडें भात

(सुरेश) चो वागड आसू सातूय जन्मान

३. पिपळाच्या झाडार, बसला पक्षी

(सुर्याचे) नाव घेता, देवाक दवरून साक्षी

४. फुलान फुल जायेचे

(सुप्रिया) माजें मोगाचें

५. एक दादलों भायर उभों आसा,

तेन्नाच पावस पडतां पूण तेजें केस मात्तूय भिजना.. किदयाक ?

उत्तर :- खड्डो आसता

६. बत्तीस चिऱ्यामधी एक नागीण नाचता

उत्तर :- जीभ

७. आराटून ताराटून बानलों भरों

माजे कोण ऊमाणे सांगता तिंका कट्टीभर सरों

उत्तर :- आमाडों

## म्हणी

१. आयज म्हाका, फाल्या तुका

२. आपली फाट आपल्याक दिसनां

३. हागां घर जयटां आनि थयं भात शिजयता

४. आवय तशीं भुरगीं

५. तेणीं शेण  खाल्यार तू बिन शेण खातलों ?

६. दुकानान गिरायक आनि मनशाचें मरण हे केन्नाच सांगून येयनां

७. नाकां पूण खायनं दिसतां

## वाक्प्रचार

१. नंदीबैल - अक्कल नसलेला

२. रातीचों दिस केलों - खूप काम करणे

३. बुधवंत

४. छत्तीसाचों आकडों

५. बडायों मारता

६. गुड्याक मारप

७. कानाक पिळ घातली

८. पोटान कावळे रडता

## लोककथा

### १. मल्लिकार्जुन देवाची स्थापना

पयलीं आमच्या लोकांक मल्लिकार्जुनाचे दर्शन घेवपाक काणकोण वयचें पडतालें. तेकां लागून एक दिस वडल्यां जल्म्यांन आनी धाकट्या जल्म्यांन मेळून काणकोण वचून मल्लिकार्जुन च्या देवळान वचून प्रसाद घेतलों. थयं तिच्यानी देवाक सांगलें की देवां आमच्या कसलेय काम आसल्यार धावोन धावोन हांगां येवचें पडतां, इतलें पयस येवपांक आतां आमचेंकडें जायनां, तेकां लागून देवा तूच आमच्या म्हऱ्यांन यों.

देवांन तिंकां येतलों मनून सांगलें. मागिरवडलें जल्मीं आनी धाकडें जल्मीं परत घरां येयलें. एक दिस मल्लिकार्जुन देव काणकोणसून चलत येयलों.  तेन्ना तेकां पयलीं म्हादेव मेवळो. तेनीं म्हादेवाक सांगले की हांव हांगां रावपाक येयला, तेन्ना म्हादेवान मल्लिकार्जुनाक वाट दाकोपाखातीर गाडगस देवाक उलों मारून आपयलों आनि गाडगस देवाक सांगलें की आमच्या देवाक सगळ्यां वयरं वरून तेकां बरों सों जागों दीं.

तेन्नां गाडगस देवान सरियांसून मल्लिकार्जुन देवाक वयल्या वाड्यार येलें. थयं तांकां बरों सों जागों सोदून तेंकां भय रावपाक दिलें

### २. गाडगस देवाची स्थापना

गाडगस देवांनं मल्लिकार्जुन देवांक तेंची जागा दाकयलीं आनी तांका थयं बसयलों. तांकां थयं बसयतगीर गाडगस देवांनं मल्लिकार्जुन देवांक म्हटलें की आतां आपुण वयतां आनी देव चलपाक लागलों.

हें आयकनां फुडें मल्लिकार्जुन देवांनं गाडगस देवांक उलो मारून रावयलों. मल्लिकार्जुन देवांन गाडगस देवांक म्हटलें की आरें तूं म्हाकां हांगां एकटों साणून खयं वयतां ? तूं खयं वचू नाका तू आता माज्या फुड्यान रांव. त्या दिसापासून गाडगस देव मल्लिकार्जुन देवाच्या मुकार रावतां.

### ३. म्हारु देवाची उत्पत्तीची कथा

गाडगस देव वों पयलीं गावभर भोवतालों आनी गावाचेंर नज़र दवरीतालों. आता गाडगस देव थयंच उरलों. मुनोन गाडगस देवान म्हारु देवाक तयार केलों.

आनी म्हारु देवांक सांगलें की आयचान तू सगळ्या गावाचेंर नजर दोवरीतलों.

### ४. कामळ्यो देवाची कथा

एक दिसां एक मनीस रातीच्या वेळार धाड्यार गेलो. त्या दिसांनी लोकांनी थय भात भरून दवरलेले. देवाक दिल्यांशिवाय लोक थयसून भात घरा घेवन येय नासलें. त्या दिसां त्या मनशान थयं वचून भात चोरपाचें ठरयलें. भर राती तेणीं थयच्यान एक पोटली चोरली आनि थरच्यान येवपाक लागलों. तो वाट चलता चलता, पूण तेजीं वाट सोपन सोपना. तो वाट चलतां चलतां फातोड जाली. तेन्ना एका गावकऱ्यान तेकां थय पयले. तो मनीस घामाघूम जाल्लों. तें गावकऱ्याक कळलें की देवाक हेका हांगाच आडोन दवरला.

## ५. कोल्हा आणि कोल्हिची कथा

एक आशिल्लों कॉलो अनि एक आशिल्ली कोली. कोली मनपाक लागली “कोल्या कोल्या आमी आयज डोंगरार या”. कोल्यान मटले “ या गें कोलिये”.

कॉलो उडी मारीत मारीत डोंगरार धावत गेलों. पून कोली आपली शुशागात चलत गेली. वयता वयता कॉल्याक मोवाचें झाड दिसलें. तो तुरतुरीत झाडार चडलों आनि मोव खावपाक लागलों.

कोलियेन कोल्याक मटले,” कोल्या माका बीन इल्लें मोव दी मरें”. कोल्यान तिका मोंव दिलें. कोलियेन मोंव खाल्लें पूण कोल्याक सांगलें “ आरे तें शेणान पडले” कोल्यान दुसऱ्या फावटी वडयलें. परत तिणें बेगीन बेगीन खाल्लें आनि मनपाक लागली “ आरें ते मातीयेन पडले”. अशें करीत करीत कोलीयेन मेण एकटाय केलें. त्या मेणाचें तिणें घर बानले. आनि कोल्यान शेणाचें घर बानलें.

एक दिस मोट्टो पावस येयलों आनि कोल्याचें घर वावून  गेलें. तो कोलियेच्या घरा येयलों आनि कोल्याक मनपाक लागलों “ कोलिये कोलिये माका इल्लों जागोंदी मगें” कोलियेन तेका आपल्या एका रुमान जागों दिलों. त्या रुमान कोलियेच्यों कोमड्यों आशिल्ल्यों. कोल्याची मजात जाली. तेणीं सगळयों कोमड्यों खाल्ल्यों आणि सकाळीफुडें धावलों. कोलियेक कोल्याचें कारास्तान कळलें. तिणें तेका बरी बुद शिकोपाची ठरयली.

एका दिसां कोलियेन गावभर जेवण दवरलें. कोलियेक फूल गॅरेन्टी आसली की कोलों येतलों मुनोन. कोलों लिपोन कोलियेगेर येयलों आनि माळीयेय बसून जेवपाक लागलों. कोलियेन तेकां दिस्त पळयलें आनी लास्टाक चुलींची गरम गरम कोलती कोल्याच्या शेपटेक लायलीं. लास्टाक कॉलो हाय हूय करीत करीत पळत सुटलों.

### ६. चंद्र, सुर्य आणि वाऱ्याची कथा

एका गावान बरें जोडपें रावतालें. तिंका तीन भुरगीं आशिल्ली. चेड्यांचे नाव सुर्य आनी चंद्र आनि चेडवाचें नाव वारें अशें आशिल्लें. वडलों चडों सुर्य हो खूप मदान आसलों आनि वारें हे खूप सूबेद आसलें पून धाकटों चडों चंद्र मात थंड आनि उग्गी आसतालों.

एक दिस राजा गावान जेवण दवरता आनि सगळ्यांक आपयता. जान्टी आसल्या कारणान त्या जोडप्याकडे वचपाक जाय नाशिल्लें. तिंच्यानी आपल्या भुरग्यांक चलां मुनोन सांगलें आनि लास्टाक तिंका सांगलें की येतना किदें आमका खावपाक हाडा.

थय वचून सुर्य आनी वारें जेवपाक लागले. चंद्राक मात आपल्या आवय बापायची याद येयली. तेणी आपले जाङड चिरले आनि तेतून वडें भरलें. घरा येवन जोडप्यान भुरग्यांक विचारले. सुर्यान आनि वाऱ्यान काय हाडूना मुनोन तिंका दोगांकूय श्राप दिलों की सुर्य सद्दी कडकड्या वतान करपतलों, वारें झाडा पेडां तोडून वयतलें. लास्टाक चंद्राक विचारले चंद्रान तिंका आपले जाड़ड कापून वडें दिलें तेन्ना तिच्यानी तेका आशीर्वाद दिलों की तू सद्दा थंड आनी शितलतायेन वयतलों.

# परिशिष्ट ४

## छायाचित्रे

श्री मल्लिकार्जुन देवस्थान



**श्री मल्लिकार्जुन देव**

**रामपुरुष मंदिर**

**गाडगस देव**

**श्री सातेरी माता**

**कामळ्यों देव**

**घुमटी**

**देवा आवय**

गवळण काला